December 2013

December 31

.

इतके साधे -- इतके अचूक ! ( खरे तर अचूक, धारदार, पॉइंटेड -- हे सगळे शब्द इथे चुकीचे आहेत ! )

My younger grand daughter SHREYA'S drawing.

सर्व फ्रेंडसना नववर्षासाठी शुभेच्छा !

' अभिनय, कल्याण ' या संस्थेला आणि तुम्हा सर्वांना नवीन वर्षासाठी शुभेच्छा !

५० वा प्रयोग दि.२९ डिसेंबर बालगंधर्व,पुणे दु.१२.30

अलिबाबा आणि चाळिशीतले चोर

December 30, 2013 at 7:57pm

काल ‘ अलिबाबा आणि चाळिशीतले चोर ‘ हे डॉ. विवेक बेळे लिखित आणि अजित भुरे दिग्दर्शित एक धमाल-मस्त नाटक पाहिले ! मी एका खेड्यात होतो नोकरीनिमित्त, तिथल्या टेलर दुकानाचे नाव होते ‘ दिलखुश ‘ टेलर्स ! ते नाव आठवले ! कारण मी दिलखुश झालो ! इंटेलिजेंट संवादांचा बहारदार तडका ! या नाटकाचे निर्माते आहेत अजित भुरे ( माझ्या‘ ढोलताशे ‘ या नाटकाचा नायक साकारणारा ) आणि महेश मांजरेकर. ‘ ढोलताशे ‘ तली आणखी एक भूमिका करणारा विद्याधर जोशी माझा जुना मित्र. खरे तर त्याच्यासाठीच मी या नाटकाला गेलो ! त्याचा यातला अभिनय तर अप्रतिम आहेच, शिवाय माझा मित्र आनंद इंगळे ( ज्याच्या एका टीव्ही कार्यक्रमात मी सहभागी झालो होतो ), राजन भिसे ( माझ्या ‘ दिनकर पुरोहितचा खून ‘ या टीव्हीवर झालेल्या नाटकात एक महत्त्वाची भूमिका करणारा ), आणि सीमा देशमुख ( माझ्या ‘ डावेदार ‘ या नाटकात जिने एक महत्त्वाची भूमिका केली ) यांनीही यात सिक्सर्स आणि फोर्स मारण्याची जबाबदारी सहज पार पाडलेली आहे ! बाकीचे कलाकार माझ्या नीट माहितीतले नसले तरी त्यांनीही तोडीस तोड धमाल उडवलेली आहे ! अर्थात, हे सगळे ज्या शाळेचे खेळ दाखवतात त्या शाळेचे मुख्याध्यापक ( दिग्दर्शक ) अजित भुरे आहेत, हा मुद्दा अधोरेखितच करायला हवा ! नेपथ्यकार काय जादू करू शकतो, ते, यातले प्रदीप मुळ्यांचे नेपथ्य पाहून कळू शकेल ! सर्व दृष्टींनी अप्रतिम निर्मिती ! विषय म्हणाल तर माझ्या ‘ बुद्धिबळआणि झब्बू ‘ या नाटकात होता तोच काहीसा ! स्त्री-पुरुष संबंधांतले भूमिगत प्रवाह ! लाजवाब सादरीकरण ! जबरदस्त गर्दी खेचणारे नाटक ! इतक्या मोठ्या संखेने आलेला प्रेक्षकसमूह, हे असे सणसणीत संवाद डोक्यावर घेतो, हे पाहून, एक लेखक या नात्याने मला फारच आनंद झाला ! फक्त एक थोडे न्यून वाटले, तेही सांगतो. तीन जोडपी आणि एक अविवाहित पुरुष –असे हे मित्रमैत्रिणी – भूमिगत आकर्षणांचे खेळ

खेळणारे. सगळ्यांना असे काही घडत असावे,असे संशय आहेतच. तरीही त्यांची मैत्री शाबूत आहे, हे जरा पटले नाही. पण लेखकाला प्रश्न पडला असावा की एवढा दोष पत्करला नाही तर एकत्र आणणार कसे हे नमूने ? जनरली मित्रामित्रांत इतकी लाईनबाजी होत नाही, असे माझे निरीक्षण सांगते. ओपन मॅरेजच्या कल्पनेतसुद्धा – पती व पत्नी विवाहबाह्य संबंध ठेवू शकतात पण त्या त्या व्यक्ती वैवाहिक जोडीदाराच्या ओळखीच्या वा माहितीच्या असता कामा नयेत, अशी अट असते. पण नाटक इतके मजेदार आहे की प्रेक्षक ही शंका सोडून द्यायला तयार होतात ! सर्व तांत्रिक अंगेही नाटकाची मजा वाढवणारी – छान आहेत ! भरपूर करमणुकीचे आणि मुख्य म्हणजे ‘ आज ‘ चे नाटक !

जे. कृष्णमूर्ती काही कुणाशी पंगा घेण्यासाठी बोलत होते असे दिसत नाही पण त्यांना अत्यंत घाण शिव्या देणारी माणसे मी पाहिलेली आहेत !

खते, फवारण्या, लौकर पिकण्यासाठी आणि चांगले दिसण्यासाठी वापरली जाणारी रसायने -- दुधाबरोबरच हाही डोस चालूच असतो !

५० वा प्रयोग दि.२९ डिसेंबर बालगंधर्व,पुणे दु.१२.30
अभिनंदन ! नक्की येणार !

मृत्युंजय सूर्यपुत्र -- अहो, तुम्ही म्हणताय तेच हे स्टेटस म्हणते आहे -- दुधात भेसळ करून लोकांची मुले मारणाऱ्यांना घाण शिव्या देण्याऐवजी उपरोधाने लिहिले आहे इतकेच ! माणसांची मुले मरतील याची ज्यांना लाज नाही त्यांना जनावरांच्या जीविताची काय किंमत असणार आहे ?

खूप दिवसांनी सुंदर, अति-उदास हसू आले !

पण काय हो, कधी कधी तरी असू शकतो का, नकार म्हणजे होकार ? ते कसे ओळखावे ? एवढी वर्षे, स्त्रियांनाही आवडणारे हिंदी सिनेमे हेच शिकवताहेत हो !

माझी नसलेली कॉमेंट गंमत म्हणून देतोय -- स्त्रियाच पुरुषांना सीरियल्सचे व्यसन लावतात -- त्यांवर विचार करणे त्यांना जमत नाही -- ते काम पुरुष करतात !

कितना इनाम लगाई सरकार हमपर??? पूरे पचास हजार ....

त्या वेळी ५०,००० / -- ठीक होते -- आता एवढ्यासाठी कोण धावाधाव करेल ?

अहो, आमरण उपोषण असते ते -- सोडावे लागतेच -- नाही तर मरेल ना माणूस !

तो एक प्रसिद्ध ज्योक आठवा -- न्यायाधीशांनी पतीला विचारले की तुम्ही घटस्फोट मागण्याचे मुख्य कारण काय ? तर पती म्हणाला, " लग्न, हेच ! "

तिकडची गाढवे खूप विद्वान असतात, असे ऐकून होतो -- आज दर्शन घडवलेत ! धन्यवाद ! असे जबरदस्त शिल्पकाम पाहून पाहून कोण साधा गाढव राहील ? इकडच्या गाढवांना अजून कलेचे महत्त्वच कळलेले नाही !

आपण अपेक्षा ठेवाव्यात अशा इतरांच्या अपेक्षांना आपण बळी पडतो !

आज लाईट उद्या सीरियस !

मला सुचलेले उत्तर इथे सांगण्यासारखे नाही -- त्यामुळे, सॉरी !

-- आणि ' मुख्यमंत्री गणप्या गावडे ' मधला भरत जाधव !

सगळे नीट असूनही आणि परिसाची इच्छा असूनही, संपर्काभावी काही व्यक्तींचे सोने करायचे राहूनच जाते !

आणि इथे भरत जाधवचा एक येऊन गेला ना पिक्चर -- त्यातले त्याचे नाव बहुतेक गणप्या गावडे होते --

मी माझ्या व्यक्तिगत मानसिक विदीर्णतेत व्यग्र असलो तर मला सौंदर्य दिसू / जाणवू शकत नाही -- हे पाहता, ते कितपत व्यक्तिसापेक्ष असते -- हा प्रश्न प्रस्तुत ठरतो --

इथे सगळे देवनागरीचे द्वेष्टे दिसताहेत ! निषेध नोंदवत आहे !

वाईट हेतू, माज, बेफिकिरी -- असे काहीही नसूनही, मनात नसताना, ' दुसऱ्यांची मने संभाळण्यासाठी ', अनेक गोष्टी करत राहणे -- योग्य की अयोग्य ?

शिक्षणाचा प्रसार, कामांचे व्यापताप, वेळेचे नियोजन करावे लागणे, दिवसाला फक्त २४ तासच असणे -- या कारणांमुळे खूप वेळा निर्भीड व्हावे लागते --

आता म्हण म्हणजे एक साठवलेले शहाणपण असते, हे विसरता येत नाही !

.मी वर दिलेली म्हण आहे मराठीत -- खात्री करून घेतली --

." त्यांची ही पूजेची वेळ असते -- तुम्ही एक तासाभराने फोन करा " -- असे निर्भीडपण म्हटलेले पटवून घेतले जाते -- पण, " त्यांची ही कथा, कादंबरी, कविता वाचायची वेळ असते -- तुम्ही एक तासाभराने फोन करा " -- असे निर्भीडपणे म्हटले तर, " माजलाय भडवा ! " -- अशीच प्रतिक्रिया येण्याची शक्यता जास्त !

आकांक्षा नसलेला माणूस सापडणे अवघड आहे. कलावंत, अभ्यासक, संशोधक यांना खूप एकांत लागतो -- त्यांना भीड फेकून देणे भागच पडते. याला रोग म्हणता येईल ?

भीड भिकेची बहीण -- अशी काही म्हण आहे का ?

AWISHKAR'S dear Sitaram Mama
त्यांना माझा आदरपूर्वक नमस्कार कळवा ! माझ्या पाच नाटकांची मामांनी काळजी घेतली !

आपल्याला सगळ्यांना शहाणे म्हणायचे असेल तर आरती प्रभू वेडा होता ! पण ते उलटे असण्याचीच शक्यता जास्त आहे !

भटाला दिली ओसरी अन भट हात पाय पसरी..(ही मराठीतली म्हण आहे...जातीला उद्देशून नाही आहे. कृपया गॆरसमज करू नये.)
त्या बिचाऱ्याच्या डोक्यात, घर म्हणजे ओसरी -- हेच बिंबले गेले !

चीनमध्ये लोकांनी ' आपापल्या ' मुलांच्या डीएनए चाचण्या घेतल्या आणि सगळे आपापल्या डोक्यांना हात लावून बसले !

घनिष्ट नाही -- घनिष्ठ --असा शब्द आहे -- ट नाही ठ --

मंजिरी, तो वेगळा प्रश्न आहे -- तो प्रश्न येऊ शकतो म्हणून आपण रिजिडच राहावे का -- आणि रिजिड राहण्याचा ताण उगीचच का सहन करत राहावे ?

लोकांना हाताने चौकोन वा गोल काढायला सांगून पाहा -- शेवटच्या भागात कंटाळल्यामुळे अनेकांची रेषा बिघडते -- ज्यांची नाही बिघडत त्यांना या पोस्टमधला प्रॉब्लेम येत नाही --

पुण्यातून चिमण्या निघूनच गेल्या आहेत ! आता, चिमणी म्हणजे काय, हे मुलांना फोटो दाखवूनच शिकवावे लागणार आहे ! छान आहे फोटो !

पूर्वी के. एन. सिंग असायचा अशा पोषाखात ! ( तो कोण माहिती आहे ना ? )

उनका -- " कहीं पे निगाहें कहीं पे निशाना " -- होता है !

नको -- मला नको ते सुचते हो -- पुढे जातो --

सुनील, शांत आणि उत्साही होण्यापूर्वीची ही स्टेज आहे !

मी झोपून उठल्यावर काही बोललो की वाद निर्माण होतात तर झोपून उठल्यावर एक तासभर मी बोलणारच नाही -- असा उपाय काढणे ! -- थोडक्यात म्हणजे, नेमके कारण पाहायचे टाळणे --

माझ्या नाटकातल्या एका पात्राचा संवाद -- " अर्पणपत्रिका लिहून झालीय, आता बाकीचे पुस्तक लिहिले की झाले ! " -- हे अर्थात फक्त तुमच्या लाईट शेवटाबरोबर !

आभास, आतापर्यंतच्या चर्चेचा चांगला परामर्ष ! तुमच्या मूळ दोन स्टेटसमध्ये परिभाषेवरच चर्चा खोळंबेल, असे वाटल्याने -- " मला वाटते, हा प्रश्न -- जगण्यातली आणि कलेतली सर्जकता वेगवेगळी असते का आणि हवीय तरी कशाला सर्जकता -- असा मांडून घेऊन बोलू या -- त्यात सगळे येईल." -- असे मी ते सोपे करून घेतले, पण त्यामुळे

गोंधळ अधिकच वाढलेला दिसतोय. अजूनही सर्जकता म्हणजे काय, या विषयाच्या अधिक खोलात ही चर्चा जाऊ शकेल, असे वाटते. सर्जकता ही कितपत व्यक्तिगत असते, हा मुद्दाही चर्चिला जावा.

माणसाच्या डोक्यातले अराजक आणि विश्वातले अराजक, दोन्ही एकच समजावे का ? की माणूस आत्मकेंद्री पद्धतीने विश्वाकडे पाहात असल्याने त्याला विश्वात अराजक दिसते आहे ? माणूस त्याला काय म्हणतो, याचे विश्वाला काय घेणे आहे ?

स्त्रियांच्या क्षमता वेगळ्या असून त्यांना पुरुषांच्या क्षमतांशी जुळवून घेण्याची सक्ती होतेय -- असा हा मुद्दा आहे --

आभास आनंद यांच्या इतर स्टेटसमधून येणारा एक मुद्दा इथे विचारात घ्यावा, असे वाटते. त्यांना वाटते, अनेक कलावंत मुद्दाम अवघड, दुर्बोध काही लिहितात आणि त्याचप्रमाणे कलाकृतींच्या मूल्यमापनातही त्यांना महत्त्व दिले जाते. या साहित्यिकांकडून गर्दीला समजेल, असे का लिहिले जात नाही ? आणि यात वाचकांना कमी लेखणे हे योग्य आहे का ? ----- वरील अनेक मते पाहिली तर सर्जकता ही ' सवयीबाहेर ' ची गोष्ट दिसते. त्याला बहुसंख्यांची मानसिकता तयार नसते. ' अश्रूंची झाली फुले ' हे नाटक समजा सगळ्यांना कळते -- त्या नाटकाला आपण सर्जक नाटक म्हणू का ? मराठीतली दोनच महत्त्वाची नाटके सांगा म्हटल्यावर आपण ' मोरूची मावशी ' आणि ' तुझे आहे तुजपाशी ' ही सांगणार की ' एक शून्य बाजीराव ' आणि ' सखाराम बाइंडर ' ही सांगणार ? आणि काय असतील याची कारणे ?

.Poetry is not a turning loose of emotion, but an escape from emotion; it is not the expression of personality, but an escape from personality. But, of course, only those who have personality and emotions know what it means to want to escape from these things.
T. S. Eliot
--हे आणखी एक प्रस्तुत वाक्य.

The poet has, not a " personality " to express, but a particular medium, which is only a medium and not a personality, in which impressions and experiences combine in peculiar and unexpected ways. Impressions and experiences which are important for the man may take no place in poetry, and those which become important in the poetry may play quite a negligible part in the man, the personality. – T. S. Eliot.

शास्त्र आणि अध्यात्म ही दोन्ही परिमाणे या चर्चेत आली !

.

आता चर्चेत भरपूर मुद्दे उपलब्ध झालेले आहेत. इथून आता पुढे सरकायला मार्ग सापडत जातील. आणि या घुसळणीतून सर्वमान्य असा एकच लोण्याचा गोळा प्राप्त होणार आहे, असे स्वप्न न बाळगता पुढे जाऊ. प्रत्येकाला या बाबतीतले आपापले आकलन समृद्ध करायला याचा नक्कीच उपयोग होईल.

' सृजन ' आणि ' सर्जन ' हे शब्द समानार्थीच वापरले जातात -- ज्यांना त्या शब्दांना वेगळे अर्थ द्यायचे असतील, त्यांनी ते स्पष्ट करावे. सर्जकता ही पूर्ण कृती असेच मी धरून चालतो -- त्यात सगळे येईल, असे मला वाटते. त्या कृतीच्या एकेका भागाला वेगवेगळी नावे देण्याने नुसता गोंधळ वाढेल, असे मला वाटते. अर्थात, इतकी मते येणार आहेत तर गोंधळही स्वीकारावाच लागेल. या सदर स्टेटसची, या चर्चेसाठी, मांडणी कशी हवी, हेही आधी ठरवून घ्यायला हरकत नाही. पण एखाद्या सेमिनारप्रमाणे त्यावरच जास्त घोळ न घालता, मुख्य विषयावर खूप यावे.

इथे नाव पुकारण्याचे राहिलेले फ्रेंड माफ करून सहभागी होतील, ही खात्री आहे. आपण निरनिराळ्या विषयांवर बोलतो पण सर्जकता हा एक मर्म मुद्दा असल्याने यावर विस्तृत चर्चा व्हावी, म्हणून हा प्रयत्न आहे.

ग्रेट ! थोडक्यात सगळे आले !

माझ्याच स्टेटसवर मीच बोलायचे ? ये ना इन्साफी है मिलॉर्ड ! आप कुछ कहिये !

उदाहरणार्थ -- तत्त्वज्ञाचा प्राध्यापक विचारांचा, निरनिराळ्या आकलनपद्धतींचा अभ्यास करतो -- ते शिकवतो -- याला आपण काय म्हणणार ? सर्जकता की वांझोटेपणा ? मराठी समीक्षेच्या क्षेत्रात काम करणे -- काय म्हणणार ?

कॅलेंडरचा वा घड्याळाचा काळ, पुस्तकाची पृष्ठसंख्या आणि मनाचा काळ यांचा गणिती संबंध असू शकत नाही. त्यामुळे कादंबरी अमुक इतक्या पानांची असायला हवी, असे काही नाही. तरीही, ढोबळपणे, ५० पानांपर्यंत कथा, ५० ते १०० पानांपर्यंत दीर्घकथा आणि १०० पानांच्या पुढे कादंबरी -- असे म्हणता येईल. यात वादग्रस्त सीमाप्रांत असणारच. मुळात ही विभागणी कृत्रिम असल्याने ढोबळच राहील आणि प्रत्येक वेळी ती उपयोगी पडेलच असे नाही. आशयसूत्र पाहून हे कसे ठरवता येईल, कोण जाणे. त्या अंगाने, पाच पानांची कादंबरी कितपत पचू शकेल ?

सुनीलजी, अनंतजींचे म्हणणे महत्त्वाचे आहे -- कोणतीच हिंसा नसावी --
सुनीलजी, तो पुढे काहीही करू दे, पण विध्वंसक, हिंसक न होणे हे महत्त्वाचे --

शिवाय उत्तम नर्तकी ! कला, मेहनत, सौंदर्य, संवेदनशीलता -- सगळेच ! स्त्री म्हणून नव्हे, मित्रांनो, तिच्या अभिनयाला सलाम !

उमेश, आपण कोण आक्षेप घेणारे ? आणि तिच्या तडजोडी असोत-नसोत -- ती ग्रेट आहे ! सेक्सी खूप असतात रे, ही ग्रेट अभिनेत्री आहे !

उमेश, वहीदा शादीशुदा असणे-नसणे विसर -- तिचा अभिनय बघ ! अत्यंत दर्जेदार अभिनेत्री !

सब्जेक्ट-ऑब्जेक्ट हे एकरेषीय बुद्धीने निर्माण केलेले द्वंद्व आहे --

मध्यंतरी मी याबाबत नेटवर शोध घेतला होता, तर -- जलचर, पक्षी, प्राणी यांच्यांतही हे आहे, अशी माहिती मिळाली !

( आणि शेवटी डोळ्यांत पाणी आणून -- ) उपोषणाला जाताय तर खाऊन घ्या भरपूर -- ( रडत -- ) लौकर सोडायचं बघा ते -- आमरण उपोषण -- कशाला उगीच --

कोणतीही पोस्ट म्हणजे ते माझे म्हणणे असेल, असे नाही. बऱ्याचदा मी अनेक बाजूंनी खुली असणारी वाक्ये देत असतो. निष्कर्षरूप पोस्टस मी सहसा देत नाही. अमुक अमुक असे आहे, तर काय -- असा प्रश्नही त्यात अध्याहृत असतो.

Karnataka Diary November 2013 Woman with a mirror- Belur / Pen & ink
आपल्या सगळ्यांच्या डोळ्यांच्या आरशांत तिने बघितले असते तर तिला स्वतःला पाहावेच नसते लागले -- ती किती सुंदर आहे ते ! पण असो ! आत्मसौंदर्यात गढलेली ती अधिकच सुंदर दिसतेय !

इतक्या सूक्ष्म, संवेदनांनी भरलेल्या सुंदर जगात वावरणारा हा चित्रकार स्वार्थी नाही -- तो आपल्यालाही त्या जगात नेतो -- हे आपले भाग्य !

प्राप्तेशु षोडषे वर्षे -- हे यावरूनच आले असावे !

चित्र तर उत्तमच आहे ! -- त्या बारक्या फांद्या काड्या न वाटता जाड कशामुळे वाटताहेत -- जरा वेळ विचार केला --

तालमीला अजून कुणीच आले नाही ?

दिल्लीच्या जनताजनार्दनाने म्हटलेले गाणे -- " है अपना दिल तो आवारा -- न जाने किस पे आयेगा । "

" मैं झाडू, आम हुई -- डार्लिंग तेरे लिये ! "

करेक्ट ! विशिष्ट प्रेम ही सुखतत्त्वाधारित आसक्तीच असते !

कोणतेही ' विशिष्ट ' प्रेम बिनशर्त नसते !

आधी जगून तर घेऊ, मग बघू काय करायचे ते !

त्याच चर्चेतली मला सर्वात अर्थपूर्ण वाटलेली माहिती म्हणजे -- बीजेपीच्या हमखास निवडून येईल अशा एका उमेदवाराने, आणखी सेफ्टी म्हणून, विरोधकाची मते विभागण्यासाठी एक उमेदवार उभा केला होता -- विशेष म्हणजे त्यात दोघेही ते ताथाकथित मेजर उमेदवार पडले आणि हा तिसरा निवडून आला !

जे एकरेषीय नाही त्याबद्दल एकरेषीय बोलत बसले, अशी आपत्ती त्यात दिसते ! -- पण ठीक --

पण एक क्षण असा येणारच की आपण जे बोलतोय ते जगण्यात घडावे लागणार -- प्रत्यय रूपात ते टेस्ट व्हावेच लागणार --

काही जुन्या गाण्यांत चावटपणाही छान असायचा -- उदा -- है अपना दिल तो आवारा -- अशी खूप गाणी अमर आहेत !

आणि ' आध्यात्मिक ' म्हणजे बुवाबाजीच, हे कसे ठरते ? एकरेषीय बुद्धीच्या प्रभावामुळेच !

व्यक्तिगत प्रतिमेचे जगणे हाच याला अडथळा असतो ! हेच सर्व विषमतेचे मूळ !

जिचे तुकडे होऊ शकणारच नाहीत अशी एकच -- पूर्ण एनर्जी --

.स्टेट ऑफ माइंड म्हणजे पुन्हा तेच येते -- ' एक ' अवस्था ! -- ते नाही -- व्यक्तिगत नसलेले भान ! ज्या अर्थी मनाची व्यक्तिगतता कमीजास्त होते, बदलते -- त्या अर्थी तशी कुठलीच अवस्था ' पूर्ण ' असू शकणार नाही --

व्यक्तिगत वेगळेपणा नसलेले -- एकमय -- असे --

नुसते विस्तृत नव्हे -- अमर्याद !

याचे उदाहरण म्हणून कोणते मन दाखवता येईल ? अवघड आहे ! अमर्याद भान असे काही असते का, हाच प्रश्न समोर येतो --

अजिंक्य, तुला मी जो प्रश्न विचारत होतो, तोच जरा वेगळ्या पद्धतीने विचारतो. तू म्हणतोस की अमुक एक टप्पा -- ही भाषाच अप्रस्तुत नुसती नव्हे तर चुकीची ठरते. यावर प्रश्न असा की तू म्हणतोस ती प्रत्येक अद्वितीयता ही पूर्ण असते की अपूर्ण ? आजची अद्वितीयता उद्या तिचा पॅटर्न बदलत असेल तर तिला प्रत्येक वेळी एक तुकडा, एक मर्यादित अवस्था, असेच नाही का मानावे लागणार ? आणि तसे असले तर लिनीयरचे दोष त्याही अवस्थेत असणार !

माझा ' नातं ' हा दीर्घांक त्याने बसवला होता -- त्या निमित्ताने आमची भेट झाली होती -- त्याच्या स्मृतीस अभिवादन !

मी एखाद्याला ग्लॅमर देणे ही गुन्हेगारीच आहे -- त्यामुळे गुन्हेगारी विश्व फोफावते -- मी नुसत्या ' लेसन ' च्या गप्पा मारतो --

नुसता तो नाही प्रश्न -- मला पळवाटा हव्यात याचा अर्थच मी गुन्हेगार आहे -- नुसतेच दुसरे कुणीतरी गुन्हेगार आहेत -- असे मुळीच नाही --

मला खरोखर धर्मात करमणूक करून घेणारा आणि वरीलपैकी इतर कुणीही -- यांत काही फरक आहे, असे दिसत नाही ! -- माझ्या कृतींचे काहीही परिणाम होवोत, दुसरे वाईट --

टप्प्याटप्प्याने होणारे बदल ( ' प्रगती ' हा शब्द टाळतोय ) -- याला महत्त्व देणे म्हणजे त्याच लिनियर पद्धतीच्या नादी लागणे नाही होत ?

विचार करणे म्हणजे निष्क्रीयता आणि कार्यकर्ता असणे म्हणजे सक्रीयता, असा भ्रम बाळगणारे लोक आणि मुळात विचार करण्याच्या क्रियेचीच ऍलर्जी असलेले, ती क्रिया न झेपणारे -- असे लोक चाललेल्या चांगल्या चर्चा वाटेला लावायचे उथळ उद्योग करतात.

तंत्रज्ञान आणि नवी साधने यांमुळे काय कसे बदल होतील, ते आत्ताच सांगता येईल, असे नाही. आणि जुन्या सवयींतून नव्याला नुसते वाईट म्हणून फारसा उपयोग होणार नाही. नुसती भराभर मते देणे म्हणजे संस्कृतीरक्षण असे मला वाटत नाही.

तिची कामेच्छा कमी असणे, पुरुषाने तिला फुलवावे -- उद्युक्त करावे लागणे -- तिचा कामानंद पुरुषापेक्षा उशिराने होणे --

तिला पळवले जाते, तिला उचलून आणले जाते, ती स्वयंवर लावते, तिला जिंकण्यासाठी अनेक राजपुत्र शर्यतीत असणे, एक आवडती- एक नावडती असणे, तिच्यासाठी रामायण घडणे, महाभारत घडणे, परदेशांत तिच्यासाठी द्वंद्वे होणे -- या सगळ्यामागे नुसते विनोदी समज आहेत का ?

मला खरेच यात शारीरिक आणि त्यामुळे मानसिक अशा काही गोष्टी आहेत का, हा महत्त्वाचा प्रश्न वाटतो --

स्त्रीला पुरुषाने, वेडे होऊन, तिच्यावर हक्क गाजवावा, असे वाटते -- असे काही ?

स्त्रीला पुरुषाने तिच्यावर अवलंबून असणेही आवडते पण झटकन ओढून मिठीत घेणेही आवडते -- ही मानसिकता --

मला याचे एक उत्तर माहिती आहे -- पण स्त्रियांनी त्यांची मते खुलकर सांगितली तरच मी ते सांगणार आहे --

उदाहरणार्थ -- समुद्रातून ओलेत्या नायिकेला वाचवून दोन हातांत उचलून आणणारा नायक -- स्त्रीला जिंकावे लागते, या अर्थाच्या कथा -- एक आवडती -- एक नावडती, अशा कथा -- स्त्रीचा लिबिडो ( कामेच्छा ) तुलनेने कमी असणे --

मतभेद ! राम नगरकर आणि निळू फुले यांच्या उपस्थितीत हे संवाद चाललेयत, असे समजा --

जबरदस्त महत्त्वाचे संशोधन ! आपल्याकडचे हडकुळे विचारवंत आधी बाहेर काढा ! उगीचच गर्दी नकोय !

आणि मेंदू थोडा अजून वाढायला वाव होता !

यावर विचार करता करता, न जाणो, आपणच व्हायचो विचारवंत !

आपले एकमेकांना समजते, असे वाटणारे, त्यामुळे एक गट करून एकमेकांची भलावण करू शकणारे, ते विचारवंत ! ते ज्यांना ठरवतील ते !

आणि हे जमण्याची प्रत्येकाची कुवत वेगळी असणार ! म्हणजे त्याच लिनीयर पद्धतीची एक पुढची पायरी, इतकेच ! की वेगळे काही ?

अजिंक्य जे म्हणतो आहे, त्या बाबतीत -- वेगवेगळ्या दर्जाच्या कुवती असतात का ? ही कुवत कमावता येत असेल तर तीही लिनीयरच ठरेल का ? याहून वेगळे काही शक्यच नसेल तर माणसाचे जगणे हे असे ना तसे वेड्याचेच जगणे असणार का ? -- हे प्रश्न येतात.

अशी आधी बौद्धिक मांडणी होऊन, लिनीयर पद्धतीच्या मर्यादा तरी नीट समोर यायला हव्याच होत्या ! ते अति-महत्त्वाचे काम अजिंक्यच्या कॉमेंटसनी झाले आहे ! फारच भेदक, अजिंक्य !

जो समीक्षक आशयाच्या पाण्यात उतरायला घाबरतो आणि वरवरची विद्वत्तापूर्ण शेरेबाजी करून पळून जातो, तोच लबाड ! माधव आचवलांनी मराठी समीक्षेला जे दिले त्याच्या शतांश योग्यतेची कामगिरीही नेमाडे समीक्षेत करू शकलेले नाहीत.

' समजा ' हा शब्द वापरण्याचे कारण -- मनाची एकात्मता, ही अवस्था मला अशक्य वाटत नाही.

स्त्रियांचा लिबिडो ( कामेच्छा ) पुरुषांच्या मानाने कमी असतो, असे शास्त्रमान्य आहे. त्यामुळे, स्त्रियांना अशा आजाराचा धोका नसावा .

समजा स्त्रियांच्या अमुक अशा कपड्यांमुळे पुरुष उद्दीपित होतात, तर ते सर्रास घडले असते. बरेचजणांच्या हातून, तरीही, टोकाच्या कृती घडत नाहीत, याचे कारण ते कायद्याला घाबरतात किंवा त्यांना स्वतःची प्रतिमा जपायची असते, असे मान्य करता आले असते. पण उद्दीपित मनःस्थिती तर राहिलीच असती ना, सारख्या अशा स्त्रिया बघून ! केमिकल बरबादी झालीच असती ! याच्या पुढचे एक कल्पनाचित्र असे झाले असते, की पुरुष स्त्रियांच्या पाया पडत असून, आम्हाला जगू द्या, अशी याचना करत आहेत ! तसे काही दिसत नाही !

वरपांगी सुसंस्कृत असण्याची किमया ही ' अत्यावश्यक ढोंग ' या सदरात बहुसंख्यांना ( मी स्वतः धरून ) जमवावीच लागते -- राहतो प्रश्न हिडीस होण्याच्या क्षमतेचा -- ते ज्याच्यात्याच्या आत्मकेंद्रीपणाच्या तीव्रतेवर अवलंबून असणार !

आशय हेच मूल्य ! ' एखाद्या लेखकाची व्यक्तिगत जीवनदृष्टी ' म्हणजे आशय नव्हे. आशययुक्त कलाकृती पूर्ण मानवजातीला प्रस्तुत असते कारण ती जगण्याच्या प्रक्रियेचे प्रवाही ( स्थितिशील, म्हणजे मत, दृष्टिकोण -- असे नसलेले ) असे भान देते. हे विषयद्रव्यावर अवलंबून नसते पण विषयद्रव्याच्या माध्यमातून व्यक्त होते.

सर्व मोठ्या कलाकृतींचा आशय जगण्याची प्रक्रिया निर्लेपपणे भान बाळगत पाहणे -- हाच असतो. विषय म्हणजे -- ऊसतोडणी मजूरांचे जगणे, वैमानिकाचे जीवन, कॅन्सरचा पेशंट, धारावी झोपडपट्टी. कोणत्याही विषयामुळे कलाकृती मौल्यवान ठरत नाही -- तिच्या आशयामुळे ( असल्यास ) ठरते.

सगळीकडे परिपूर्ण, असे मानवी बुद्धीच्या क्षेत्रात काही नसते !

संगमरवरातून संगमरवर वजा केल्यावर संगमरवर उरतो !

मग लिव्ह इन रजिस्टर करावे लागेल, दुसरीलाही पत्नीचे हक्क द्यावे लागतील आणि कालांतराने द्विभार्या प्रतिबंधक कायदा रद्द करावा लागेल !

कितीही लिव्ह इन ला आत्ता तरी बंदी कुठे आहे ? यात शिरला तर कायदा वेडा होईल !

मला कुठे नक्की माहिती आहे ? ऐकीव माहितीवर घालतोय आपण घोळ !

आधी धुरळा आणि मग धुव्वा -- असे दिसतेय भविष्य !

तसे नाही -- स्त्री जास्त कमवती असेल तर ती देईल ना पुरुषाला पोटगी !

थोडक्यात म्हणजे फ्री सेक्स ! मूल / मुले असतील तर माता आणि मूल यांना तेवढी सुरक्षितता ! नसेल तर ? सगळे बलात्कार ठरतील ?

लिव्ह इन रजिस्टर करून त्याला लग्नाच्या कोंदणात बसवू नये म्हणजे झाले !

एरवीही बरेच बदल शक्य आहेत -- लिव्ह इन म्हणजे लग्न नव्हेच, पण त्याचाही एक कायदा करायचा आहे. म्हणजे एक लग्नाची आणि एक लिव्ह इन चालणारच आहे. उलटेही होऊ शकेल -- एकच स्त्री -- इकडे लग्नाची आणि दुसरीकडे लिव्ह इन. आणि लिव्ह इनला मर्यादा नाही. याचबरोबर डीएनए शास्त्राचाही पुरेसा विकास होत जावा, म्हणजे कोण कुणाचे वारस, हे ठरवता येईल. शेवटी लग्नाची पद्धत बंदच करावी, फक्त लिव्ह इन चे कायदे ठेवावे आणि डीएनए शास्त्र !

मला तर हा अतिमहत्त्वाचा लेख वाटला ! हा बीजलेख आहे, असे समजून, यावर व्यापक चर्चा व्हायला हवी ! ' इतिहासाच्या अभ्यासातून आजचे प्रश्न समजतात ' या मराठीतल्या डाव्या आणि उजव्या दोन्ही समजुतींना आव्हान देणारा लेख ! रणजित देसाई, शिवाजी सावंत आणि गो.पु. देशपांडे -- यांत फारसा फरकच राहणार नाही, कदाचित ! हा लेख फेटाळण्याची घाई करावी, असे अनेकांना वाटण्याची शक्यता आहे !

असा विषय निघाला की भैरप्पांच्या कादंबरीतले हे आठवते -- सम्राटाला तोंडात बेडका आला की तो नोकराला बोलावणार -- त्याने तोंड उघडायचे -- पिंकदाणीप्रमाणे सम्राट तो बेडका त्याच्या तोंडात थुंकणार -- तो त्याने आनंदाने गिळून टाकायचा -- चेहऱ्यावर त्रास वा किळस दिसल्यास, हात-पाय तोडणे वा शिरच्छेद -- ही शिक्षा --

पण जाणकारांनी कुणीतरी सांगा ना, की पोक करणे म्हणजे काय बाबा -- त्याचा त्रास कसला होतो -- ते कशासाठी केले जाते --

मला ' पोक ' चा अर्थच अजून नीट माहिती नाही -- पोक करणे म्हणजे काय आणि त्याने काय कळते ?

बुद्धी सगळे काम विश्लेषणात्मक, एकरेषीय आणि अर्धवटच करू शकणार ! क्षणाक्षणाच्या मानवी संबंधांना या पद्धतीचा काय उपयोग ? !

आस्वाद आणि समीक्षा अशी विभागणी असणे योग्य वाटत नाही. कलाकृतीचे आकलन होत जाण्याची प्रक्रिया ही त्या कलाकृतीचे मानवी श्रेयसाशी असलेले नातेही कितपत खोल आहे हेही लक्षात आणून देणारी असते. आणि आस्वाद -- आकलन हे पूर्ण व्यक्तिगत असेल तर समीक्षा शक्यच होणार नाही, असे मला दिसते.

माझ्या प्रोग्रामिंगमधून -- जात, देश, धर्म यांतून येणारी आस्था ही एकूण माणसाबद्दल असू शकणार नाही -- याशिवाय मन वापरले जाऊ शकते, हे बुद्धिप्रामाण्यवादी नाकारणार -- सगळे मर्यादितच असणार, संघर्ष अटळच असणार, विषमता अटळच असणार पण समता हवीच हेही म्हटलेच पाहिजे -- अशा प्रकारचे मन असेल तर, त्याला समजण्यासाठी कोण काय करणार ? ' एकमेकांना खड्ड्यात घालावेच लागणार पण खड्ड्यात घालू नये -- हे मूल्य मानू ' असे म्हणणाऱ्याला कोण काय समजावू शकेल ?

एकूण माणसाबद्दल आस्था म्हणजे सगळ्यांच्या धारणा-मतांप्रमाणे वागणे नव्हे, अर्थातच ! ते कदापि शक्यही होणार नाही !

वाहते पाणी आणि एका ठिकाणी सडत राहणारे पाणी -- दोन्ही एकच ?

स्थितिशील, मर्यादित मनोवस्था आणि सचेतन, समावेशक मनोवस्था या दोन भिन्न गोष्टी आहेत !

.किंवा भूमिकावाले नेहमीच म्हणतात तसे -- भूमिका नाकारणे, हीही एक भूमिकाच नव्हे काय ?

कमी वयात लोक टेन्शनमुळे ' कमी ' पडत चालल्याचे वाचनात आले -- त्यावरून --

उरलेल्या बसेसवर भागवावे लागल्याने टाईमटेबल विस्कटते -- त्यामुळे चिडून पुन्हा बसेस जाळल्या जातात !

कोणत्याही उत्तराबरोबर एकदोन प्रश्न येतातच, याचे ज्वलंत उदाहरण !

सुपरहीरोचे मानधन कमीत कमी पाच कोटी असायला हवे -- मराठीतला सुपर हीरो ? तो मंडईत कोथिंबीर कुठे स्वस्त आहे हे शोधत फिरताना सगळ्यांना दिसणार ! त्यामुळे, हसून सोडून द्यावे, हे बरे !

अविनाश, हीच तर गोची आहे माणसाची -- सत्य किंवा अमुकच बरोबर, असे सांगता येत नाही ! दृष्टिकोणही जनुकनकाशावर अवलंबून असतात, असे संशोधन आहे ! मग राहते फक्त पॉवर-पॉलिटिक्स ! तेच चालू असते !

सुरत, नान पुरा ( गुजरात ) येथील २१ सेन्चुरी हॉस्पिटल येथे २५ वर्षीय पारसी महिले ने मोजून ११ मुलांना जन्म दिला असून गिनेस बुकात याची नोंद झाली आहे !! विशेष म्हणजे त्यांची जन्मतारीख 11-11-11 आहे !
अगदी हा उच्चांक मोडलाच असता तर १२-१२-१२ ला शक्य होते -- आता वेळ निघून गेली !

' ब्लाइंडनेस ' वालेच ना ? अत्युत्तम अनुवाद !

सरळ असणेच चांगले ! सतत गाठयुक्त मनाने वागणे त्रासदायक !

मनाने मनाला पकडून ठेवणे !

एडस, घटस्फोट, भूकंपपीडित, नापास विद्यार्थी -- अशा विषयांवर चर्चा करताना, त्यांत स्वतः अनुभवी असावे लागते, असे काही नाही. आणि खाजगी वा नैतिक विषयांवर चर्चा करताना ' तुझी इयत्ता कोणती ' हे विचारूच नये. पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेली व्यक्तीही त्याची जाहिरात करेलच, असे नाही --

' आडून ' नव्हे, ' मुळे ' म्हणावे ! वेगवेगळे गट, अस्मिता असतील तोवर व्यवस्था भ्रष्टच राहील, हे स्पष्ट आहे !

प्रेम आणि प्रकरण असा काही भेद मला वाटत नाही -- सगळी सुखतत्त्वाधारित आसक्तीच असते.

एकनिष्ठतेची अपेक्षा असतेच, असे मला वाटते -- त्यामुळे संघर्ष होतात.

मला अनेक रूपांत हे आजूबाजूला दिसते आहे -- समुपदेशनावरच्या अनेक लेखांतूनही हे प्रश्न गंभीर झाल्याचे दिसते आहे. त्यामुळे, यावर विचारमंथन अत्यावश्यक वाटते.

एकच कविता एका वेळी अनेकजण समजून घेत आहेत, हे, मला वाटते, या माध्यमामुळेच शक्य होत आहे. एखादी कविता वेगवेगळ्या कारणांनी चांगली वाटू शकते -- त्यांतली काही स्वतः कवीलाही नव्याने कळू शकतात. असे समजणे / होणे चांगलेच आहे.

विषय बदला आता -- कोण अधिक असमंजस -- यावर चालू द्या आता -- म्हणजे नवे मुद्दे येतील, बोअर तरी होणार नाही --

अद्वैत तत्त्वज्ञानाप्रमाणे -- मीच नेटवर्क, मीच फेसबुक !

सार्त्रचे ' फ्लाईज ' हे नाटक वाचावे --

( ' नाना ' नावाच्या एका किडकिडीत मित्राचा निर्देश करत -- ) आपदा भोगी नाना !

तो वरी ( म्हणजे वरती ) गाऊन ( या नावाचा पोषाख ) घे --

स्वरगंगेच्या काठावरती मटण दिले तू मला --

आम्ही एक, स्टीलचे पाणी वाढण्याचे जग उत्पादन करणारा कारखाना काढणार होतो. आमचे चिन्ह ठरले होते -- जग ( पृथ्वी ) ! त्याची जाहिरात अशी ठरली होती -- " जगात जग, एकच जग -- जग जग ! "

आम्ही दिल्लीला गेलो होतो तेव्हा माझी बॅगही ही मला घेऊ द्यायची नाही -- माझ्या हातातून काढून घ्यायची ! ( अर्थात पूर्ण टीमचे असेच प्रेम मिळत होते ! ) माझ्या एका नाटकाची, समजून काम करणारी नायिका !

सचिन ( संदर्भ -- २०० वी आणि निवृत्तीपूर्वीची शेवटची टेस्ट )
करोडोंचे प्रेम, लोभ, भावना आणि स्वतःच्या मनातही उद्भवू शकणारे वादळ -- हे सगळे रद्द करून, तो त्याचा खेळ खेळतो -- हे नुसते थक्क करणारे नसून, एक विलक्षण कल्पनातीत शक्यता प्रत्यक्ष दाखवणारे आहे !

अनिलजी, नुसत्या उत्तुंग कर्तृत्वाला लोक मान देत नाहीत -- तो करमणुकीची नशा देणाराही असावा लागतो !

गुप्त होण्याची सिद्धी मिळाली तरी स्त्रियांना गुप्त व्हायला आवडेल ?

.एकमेकांना ताण न देता माणसांना जगता येईल का ? -- हा प्रश्न साहजिकच समोर येतो !

साहित्यकृतीच्या आशयाला स्पर्शही न करणारी समीक्षा -- असा एक अभिनव प्रकार मराठीत आहे !

मॅन्युफॅक्चरिंग डिफेक्टस आहेत म्हणून ग्राहक न्यायालयात जाता येईल !

महेश कोठारे जेव्हा म्हणतात की ' चांगले दिले की येतात लोक ! ' तेव्हा त्यांचा ' चांगले ' चा अर्थ सगळ्या समीक्षकांनाही पटलाच पाहिजे, असा आग्रह कुणी धरला समजा, तर त्याकडे दुर्लक्षच होणार !

' धूमधडाका ', ' अशी ही बनवाबनवी ', ' गंमत जंमत ' किंवा ' जंजीर ', ' शोले ' काढणारा, समीक्षकांनी चांगले म्हणून ऑस्कर द्यावे, अशी कशाला भीक मागत बसेल ? धंदा झाला, पैसे मिळाले, विषय संपला ! ' अश्रूंची झालीं फुलें ' हे नाटक लोकांना खूप आवडले म्हणून आता त्याला ग्रेट म्हणता येईल अशी समीक्षा करा, असे कुणाला सांगणार ?

मंगळावरची माती ताईतात बांधून तो ताईत घालायचा ! काम फत्ते !

समीक्षेत कोणती तरी मूल्यात्मकता / श्रेयस्करता यांबाबतची क्लॅरिटी पायाभूत असते. बहुसंख्यांना नुसती करमणूक आवडते म्हणून करमणूक हेच एकमेव मूल्य समजा, असे समीक्षेत होत नाही. लेखक जसे आपल्या आकलनाप्रमाणे लिहायला मोकळे असतात तसेच समीक्षकही मोकळे असतात. त्यांनी समीक्षा कशी करावी ते दुसऱ्यांनी सांगणे निरर्थक असते. एखाद्या माणसाला पूर्ण मानवजात एकाच धर्माची होणे हितकारक वाटू शकते तर एखाद्याला एकाच विचारसरणीची होणे ! तसेच हे आहे. रागराग करून उपयोग नाही. बहुसंख्य समीक्षकांना जे पटते ते मला पटत नाही, असेही होऊ शकते.

अशी कशाला तरी जोडून काहीतरी कारणमीमांसा सांगितली म्हणजे आपल्याला भूतकाळ कळतो -- ही इतिहासाच्या विश्लेषणाची एक बालिश कल्पना आहे ! विशेषतः ' इतिहासाचे भान ' वाले हा उद्योग नेहमी करतात !

दिनूजी, या सगळ्यांची तुम्हाला आठवण असण्याचा मला खूप आनंद वाटला ! ते सगळे जमून आले होते ! ( राजेश जाधव ).

तुम्ही डिसेंबरमध्ये जिवंत असल्याचे दाखवायला गेलात तर चालणार नाही -- तुम्ही नोवेंबरमध्ये जिवंत होता, हेच लागेल !

चौगले यांची स्वतःची नाटके आणि त्यांनी अनुवाद केलेली नाटके, असा एक नाट्यमहोत्सव कर्नाटकात होतो आहे, त्यात हे नाटक होईल. पहिला प्रयोग धारवाडला आहे.

मी गालिब सेतूमाधवराव पगडी यांच्या अनुवादातून समजून घेतला होता.

माणसाला सर्वात जास्त छळणारा आकार कोणता असेल तर तो म्हणजे अवकाश . या अवकाशाबद्दल आपल्या प्रत्येकाच्या मनात एक भीती- एक आकर्षण असतं .  त्याचबरोबर स्वताच्या क्षुद्र असण्याची आणि त्या अवकाशाचा एक अविभाज्य भाग असल्याचा एक उदात्त आनंदही अशा दोन विरुध्द टोकाच्या भावना अवकाशाबद्दल आपल्या मनात  असतात . हे झाले सर्वसामान्य माणसाचे.

...

चित्र ' समजायला ' -- किंवा ते समजायची प्रक्रिया घडायला म्हणू -- चित्रकाराइतकाच ते पाहणाराही सर्जक असावा लागतो -- हे दर्शवणारा मेळ !

समजा अमुक एका विचारसरणीनेच लिहिणे महत्त्वाचे मानणारे आणि कोणत्याही विचारसरणीला बांधील असू नये म्हणणारे -- दोन्ही आहेत कलाक्षेत्रात -- एखादा अधिक प्रभावी असू शकेल पण दुसरा प्रकार नष्टच करायचा प्रयत्न, हा असांस्कृतिक असेल, असे !

मित्र हो, यातली अतिशयोक्ती ही तथ्यांश समजून घ्यावा यासाठी आहे, अर्थात ! भाषा डेडच असते, माणूस जिवंत असला तरच तो तिलाही जिवंत करू शकतो ! जिवंत माणूस म्हणजे स्वतःच्या साच्यात पूर्ण गाडला न गेलेला -- एखादा तरी त्या साच्याबाहेरचा क्षण जगण्यात येऊ देणारा माणूस !

माझे कोणतेही स्टेटस आग्रही वा भांडखोर समजू नये -- एका मर्यादेनंतर मी वादही घालत नाही --

माणसाचे मन हे फक्त अलगतावादानेच काम करू शकते -- या निष्कर्षात जे मानवी जगणे बंद करू इच्छितात, तेच अस्मिता आणि भूमिका अटळ असल्याचे बोलत राहतात.

माणसांना एक तर अमिताभ म्हणा नाही तर अमजद म्हणा -- या पद्धतीने चांगली कला जगण्याकडे पाहात नाही.

.

सर्वांचा याचा अर्थ कुठेही मागे उभे राहणे नव्हे -- भूमिका, बाजू घेणे -- याच साच्यात विचार करण्याने त्यांच्या म्हणण्यावर अन्याय होईल. तुम्ही ज्यांना वाईट म्हणता त्यांनाही हा लेखक झिडकारणार नाही, तेही याचे वाचू शकतील, न जाणो, काही समजूनही घेतील !

भूमिकावाला लेखक सर्वांचा असू शकत नाही -- राजन खान, लेखक सर्वांचा असावा, असे म्हणत आहेत !

शब्द त्या त्या वेळी स्वतःचे वापरावे लागतात -- या डेड स्मायली स्टॉकमध्ये असतात !

सगळे चुकत गेले आयुष्यात -- काळजाने प्रेम करायचे प्रयत्न केले ! पण हरकत नाही -- गियर बदलके देखेंगे !

कारण मानवी संबंधांत निर्माण होणारे प्रश्न डोक्याने सुटू शकत नसल्याने आतडीही प्रयत्न करू लागतात !

पूर्वी एक लोंगोवालही होते ! ते पंजाबात मिळत !

तो राजेंद्रकुमार काही कमी भारी नाही -- ' दिल एक मंदिर ' मध्ये राजकुमारचे सकाळी ऑपरेशन करायचे होते तर हा रात्रभर अभ्यास करत होता -- तेव्हा कुठे जमले ते ! एक जिद्द, बास !

एकदा एक नाटक लिहून झाल्यावर तालमी चालू असताना मला वाटले की अमुक एक वाक्य नीट स्पष्ट करू या -- अर्थ बरोबर येत नाहीय -- दिग्दर्शक म्हणाला, नको, असेच ठेवू या -- बोलणे असेच असणार !

मराठी कादंबरीतली रेलचेल ही समृद्धी आहे की अडगळ ? -- ये भी एक पॉईंट है !

भूमिका याचा अर्थच एका बाजूने पाहणे -- पूर्ण आवाका न घेणे -- अँगल -- दृष्टिकोण --

पुन्हा माझ्या डोक्यातला किडा -- ' भूमिका ' वाला लेखक निःपक्षपाती असू शकतो का ?

नायक-खलनायक ही माणसांची विभागणी ढोबळ मनोरंजनालाच जास्त उपयोगी पडते -- ती प्रचारकीही असते.

तुमचा पहिला मुद्दा खूप महत्त्वाचा वाटतो --मूल्ये कालसापेक्ष असतात, असे म्हणणे ( म्हणजे ती व्यक्तिसापेक्षही असतात, असे आपोआप होतेच ) म्हणजे ' मूल्य ' असे काही नसतेच, असे म्हणणे होईल ! मूल्य असलेच तर ते कालातीत आणि परिस्थिती-निरपेक्षच असू शकेल !

समृद्धी ही कादंबरीच्या वस्तुद्रव्यावर कितपत अवलंबून असते --

मराठी लेखकाला पोटापाण्यासाठी दिवसभर इतरच काही करण्यात शक्ती वापरावी लागते -- हे नेहमीचे आहे -- त्यामुळे कोणकोणते परिणाम झाले असावेत --

अवधूत, ढोंगीपणाने ग्रेट कलाकृती निर्मिणे अशक्य आहे --

व्यक्तिनिष्ठता -- भाषा, अनुभव, वातावरण, लकबी यांची असणारच -- ती टाळायची किंवा टाळता येते, असे म्हणणेच नाहीय.

काही वेळी एखाद्या व्यक्तीची कॉमेंट आपल्याला खूप आवडते, तेव्हा कोण ही व्यक्ती, काय करते, या उत्सुकतेने त्या व्यक्तीचे कव्हर पेज पाहिले जाते किंवा फार थोड्या कॉमन फ्रेंडसवर आपण फ्रेंडशिप स्वीकारतो, तेव्हाही ! -- हे सगळे पोकिंगमध्येच येते का ? यात काय चूक आहे ?

सत्य चायनातून आले तरी ते सत्यच राहील !

काही लेखकांच्या चिंतनातून जर असे काही येत असेल तर त्याला हिडीस-फिडीस करण्यात शहाणपणा नाही -- उलट, तेच महत्त्वाचे असेल ! माणसाच्या मनाच्या बंदिस्तपणाचे कौतुक सतत चालूच आहे, हे वेगळे काय असेल, याकडे मोकळेपणाने लक्ष दिले जावे.

माझ्या एका नाटकात एका स्त्रीला परपुरुषाच्या मोहात पडायची चटकच असते -- नवरा तिच्यावर खवळलेला असतो -- ती म्हणते, " माझ्यातला हा दोष घालवायचा मी प्रयत्न करीन ! " -- " प्रयत्न करीन ? ! " नवरा अधिकच चवताळतो !

द्विधा मनाने जगणारे सगळेच दांभिक असतात -- तुकाराम म्हणतो ती मनाची ' एकविध ' अवस्थाच फक्त दांभिकताहीन म्हणता येईल -- नाहीतर ' कर्मण्येवाधिकारस्ते ' वगैरे बडबडायचे आणि वृत्ती हावरट ठेवायची -- हेच चालू असते --

आणि दांभिकपणाचा उल्लेख करताना, कुणाच्याही, बिगरदांभिक म्हणजे काय, हे सांगायला हवे.

लेखन सर्वांचं असावं -- असं म्हणताना, राजन खान हेच सांगत आहेत की ते एक मर्यादित प्रतिक्रिया देणारे फक्त असू नये.

लेखकाने कोणतेही मटेरियल निवडणे म्हणजे प्रतिक्रिया नव्हे. प्रतिक्रिया नसलेले लेखन हे मुख्यतः मानवी संबंध समजून घेणारे असते -- त्या जगाला ते आपल्या मुशीत बसवून एक दिशा देत नाही. मी वर उल्लेखलेल्या कलाकृती या अर्थाने समावेशक आहेत. एकच एक इंपॅक्ट करण्यापेक्षा जगण्याचे भान देणे हेच त्या कलाकृती करतात.

शेक्सपियर एखाद्या सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीला प्रतिक्रिया देत होता, असे मला वाटत नाही.

लेखिकांमध्ये मेघना पेठे.

राजन खान यांची ' रस-अनौरस ', मधू साबणेची ' लीळा ', खानोलकर आणि आरती प्रभू, रंगनाथ पठारे यांची ' टोकदार सावलीचे वर्तमान ', कोएत्झीची ' डिसग्रेस ', सारामागूची ' ब्लाइंडनेस ', पिरांदेल्लो, बेकेट, आयनेस्को.

लेखन हे प्रतिक्रियात्मक असणे आणि प्रतिक्रियात्मक नसणे -- हे दोन्ही सारखेच, असे म्हणता येणार नाही.

सगळीच माया आहे, हे विधान तरी सत्य कसे असेल ?

हे छानच झाले -- मी यांतल्या काहींचे काही वाचलेले आहे पण त्यावर काही बोलावे इतपत नाही. माझ्या सामान्य ज्ञानासाठी इथल्या जाणकार मित्रांना एक माहिती विचारू इछितो, जरा दबकतच कारण माझा प्रश्न तरी बरोबर आहे की नाही कोण जाणे ! प्रश्न असा -- सगळे सामाजिक बांधिलकीवाले समीक्षक बुद्धिप्रामाण्यवादीही असतात का आणि सगळे बुद्धिप्रामाण्यवादी समीक्षक सामाजिक बांधिलकीवाले असतात का ? इथे समीक्षकांची बरीचशी समावेशक यादी तयार झालेली आहे -- तर यांची विभागणी साबांवाले आणि बुप्रा वाले या पद्धतीने कशी होईल ? कृपया रागावू नये -- प्रश्न बरोबर असला तर सहकार्य करावे, ही विनंती !

मूल्यमापन करणारेच तर नावाजतात / गाजवतात !

.एक गंमत नुसती ! प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची आहे ! आपापले जगून जाईल ! फूल बागेत उमलले तरच महत्त्वाचे आणि जंगलात उमलले तर कमी महत्त्वाचे, असे काही नाही ! दुसऱ्यांनी त्याच्या असण्याचा आनंद घेतला की नाही याची फुलाने चिंता का करावी ?

त्यासाठीही दारू बेस्ट ! आपण हे अमुक असे समजतो, पण च्यायला तीनचार पेग गेले की सत्य बदलते !

.जगणे विस्कटून बघणे -- महत्त्वाचे आहे --

तेवढ्यात त्य बिचाऱ्या अँजेलिनाचे कॅन्सरचे ऑपरेशन झाले !
अगं, बोलणे झालेय -- माझी मैत्रीणच काढणार आहे तो पिक्चर ! आहे ती इथे एफबीवर !
ती एका तिच्याहून बऱ्याच वयस्क अशा मराठी लेखकाच्या प्रेमात पडते -- अशी वन-लाईन आहे !
माझी एक मैत्रीण अमेरिकेत असून तिचे चित्रपटविषयक शिक्षण झालेले आहे -- ती चित्रपट काढेल तेव्हा अँजेलिना जोलीचा नायक मी असणार आहे --

अनिश्चितता प्रचंड भरलेली आहे जगण्यात !

नो ! प्रत्यक्षात येईल ! माझे नाटक पाहायचे धाडस फक्त करावे तिने !

श्रीरंजन, कलेचे क्षेत्र आहे -- माधुरीने माझे एखादे नाटक वाचले आणि तिला ते कळले तर तीच येईल पत्ता शोधत मला भेटायला ! या फंदात ती पडत नाही, ही तिच्या बाबतीतली दयनीय गोष्ट आहे !

ट्रिपला जाऊन आलेल्या लोकांना किमान तीन महिने भेटू नये -- ते कोणार्कचे सूर्यमंदिर पाहून येतात आणि तिथे भिकारी किती आहेत, त्यावर सरकारने काय केले पाहिजे ते सांगत बसतात !

सापडले -- गदिमा बरोबर -- ' जोगिया ' हा कवितासंग्रह -- ' मोक्षाची वाट ' ही कविता -- शेवटच्या दोन ओळी --
सखी जिवाची जिथें नांदते तीच एक पेठ
देव असो वा नसो, दाविते मोक्षाची वाट.
माझा एक शब्द चुकला होता -- ' देव ' च्या ऐवजी ' मोक्ष ' आला होता -- पण माझी चूकच जरा जास्त बरी वाटतेय का ?

थोडक्यात, कालबद्धतेपासूनचे स्वातंत्र्य कालबद्ध नसते, असे म्हणता येईल --

मुळात अस्तित्ववाद ही काही एखादी विचारसरणी नाही की जी एखाद्या काळातच प्रस्तुत ठरावी -- काम्यू म्हणतोय त्या स्वातंत्र्याची शक्यता तेव्हा होती आणि आता नाही, असे नाही --

तात्त्विक आत्महत्या म्हणजे काय, हे आजच्या लोकसत्तेतल्या लेखावरून कळेल --

आता, खानोलकर समीक्षात्मक काही बोलत नव्हते पण दिलीप चित्रे बोलत होते -- प्रत्येकाचे जगणे वेगवेगळे असणार -- नियम सांगूच नये --

त्याची जन्मशताब्दी आहे आज --

.मित्रवर्य जयंत बी जोशींच्या पोस्टवरून -- "The only way to deal with an unfree world is to become so absolutely free that your very existence is an act of rebellion."
- Albert Camus (His birthday today)

प्रत्येकाचे मन आपापल्या पद्धतीने चालू राहणे म्हणजे कुणीच कुणाला प्रस्तुत नसणे -- असा निष्कर्ष स्वीकारणे याचा अर्थच जगण्यातून कला आणि तत्त्वज्ञान यांना वगळायला तयार होणे !

गायीचे हंबरणे, तिच्या गळ्यातल्या घंटेचा नाद आणि दूध पिणारे वासरू ! -- एवढे असल्यावर दूधच पिणे भाग आहे --

घटनांना महत्त्व देत जगण्याच्या सवयीमुळे काय होऊ शकेल, ते इथे सांगितले जातेय, असे वाटते. सगळ्यांच्या क्रियाप्रतिक्रियांच्या सवयी सारख्याच असल्यावर, नुसती पुनरावृत्ती सजवत राहणे, हेच उरणार !

सतत चालू राहण्याची सवय असलेले मनच म्हणते, याहून वेगळे काही शक्यच नाही -- सुखाच्या वेळी सुखी होणे आणि दुःखाच्या वेळी दुःखी होणे -- हेच, असेच चालणे अटळ आहे -- हा स्वीकारलेला निष्कर्ष आहे --

ज्या व्यक्तीने माहीत नसलेल्या बाबतीतही निष्कर्ष स्वीकारायचे ठरवलेले आहे तिथे आता फक्त पुनरावृत्ती शिल्लक राहते !

परवा टीव्हीवर संजय कपूर म्हणाला, महाराष्ट्रियन डिशेस फार छान, चविष्ट आहेत ! त्याला विचारले की मग त्या लोकप्रिय का नाही झाल्या -- भारतभर ? जगभर ? तर तो म्हणाला, " बाकरवडी संपली " हे सांगण्यातली फुशारकी, हेच कारण !

काही वेळी, वापरात नसलेले पण सत्य असलेले, नुसते बोलले गेले तरी कापरासारखे भरभरत जाते ते सगळीकडे !

सेव्ह केलेली एनर्जी, गरज असेल तेव्हा वापरायची ना !

' भलामण ' हा शब्द कोशात दिलेलाच नाही. ' भलावण ' हाच एक बरोबर शब्द आहे.

माझ्या नातींना अधिक चांगले जग मिळावे, यासाठी मी स्त्रीवादी !

मला तर असे अनेकदा वाटते -- राजकारण आणि शासनव्यवस्था स्त्रियांकडे देऊन पुरुषांनी निवांत राहावे -- देश वेगाने उत्तम प्रगती करेल --

कोकणस्थ भाग्यवानच ! ते स्वतः सुंदर, अवतीभवतीचा निसर्ग सुंदर !

डॉ. दीपक पवार यांच्या ' मराठी अभ्यास केंद्रा ' ने एक मराठी भाषेबाबतची ' अश्वेतपत्रिका ' प्रकाशित केलेली आहे -- त्या संदर्भात जय महाराष्ट्र चॅनेलने माझी मुलाखत घेतली होती -- ती आज दुपारी दोन वाजता -- इतर वक्त्यांबरोबर -- दाखवली गेली --

हिंदी नटनट्यांच्या मुलाखती बघा -- ५० टक्के इंग्रजी असते ! त्यांतले बरेच उच्चभ्रू आणि खरेच तशा वातावरणात जगत असतात. त्यांचे बघून मराठी नटनट्या त्यांची नक्कल करायला जातात -- जणू आपल्याला मराठी शब्द आठवत नाहीय, असे दाखवत, फालतू इंग्रजी मिसळतात ! असे केल्यावर आपल्याला हिंदीत घेतील अशी त्यांना आशा वाटत असावी !

माझ्या एका एकांकिकेतला एक संवाद --
पती -- आणि तू मला लिहूनही देत नाहीस !
पत्नी -- मी लिहून देऊ ?
पती -- लिहू देत नाहीस, असं म्हणायचं होतं मला --

ज्यांना पटेल त्यांनी हे बोलत राहिलेच पाहिजे -- परिणाम होतोच -- कालपरवा एक मध्यमवयीन पतिपत्नी आकाशदिवा विकत घेऊन घरी चालले होते -- आकाशदिवा पत्नीच्या हातात -- ती काळजीपूर्वक घेऊन चालली होती -- आणि पती दोन्ही हात हलवत मजेत चालला होता -- माझ्या मनात आलेच -- त्याने घ्यायला हवा होता तो आकाशदिवा स्वतःच्या हातात --

पटले तरच पटेल नाही तर गांधी !

कलाक्षेत्र हे स्वतःची सुखदुःखे, रागलोभ, मते यांत लडबडणारी अभिव्यक्ती करण्यासाठी वापरायचे असते -- हे, जे मान्य करतील ते करोत !

अविनाश, तीच तर चर्चा झालीय ना वर ! -- आणि मी वर उल्लेख केलेल्या -- पिरांदेल्लो, बेकेट, आयनेस्को, गाओ, खानोलकर, मेघना पेठे, राजन खान यांची ' रस-अनौरस ', रंगनाथ पठारे यांची ' टोकदार सावलीचे वर्तमान ', मधू साबणेची ' लीळा ', कोएत्झीची ' डिसग्रेस ', सारामागूची ' ब्लाइंडनेस ', काफ्काची ' ट्रायल '. -- या सगळ्या लेखकांना एकजण ' लेखकू ' म्हणताहेत ! यावर काय बोलणार ? समझनेवाले समझ जायेंगे !

साक्षात्कारी वा त्या अर्थाचा कोणताही शब्द मी वापरत नाही. व्यक्तिगत मते आणि रागलोभ यांच्या वर डोके काढल्याशिवाय मानवी जगण्याचे काहीच समजू शकत नाही. असे स्वतःच्या मर्यादा ओलांडणे याला ' साक्षात्कारी ' तेच म्हणतात ज्यांना असे मर्यादा ओलांडले जाणे अशक्य वाटते, तसा त्यांचा निषकर्ष असतो. त्यामुळे, छोड दो !

मला वाटते, मला जे म्हणायचे होते, ते झालेय म्हणून -- तरीही, असेल कुठला मुद्दा तर सांगा --

पंधराव्या विचारवेध संमेलनात डॉ. आनंद तेलतुंबडे यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणातला ऑगस्ट २००८ च्या ‘ आपले वाङ्मयवृत्त ‘ मध्ये आलेला एक अंश इथे देण्यासारखा आहे. गंमतीशीर आणि ज्ञानदही – “ आज विचारवंत आणि कार्यकर्ता या दोन कंपूंमध्ये एक भयंकर दरी निर्माण झालेली आहे. कार्यकर्ता-कंपू हा तथाकथित विचारवंतांपासून इतका दुरावला गेला आहे की त्याने विचार करणेच सोडून दिले आहे. त्याला याची धास्ती असते की विचार केल्याने आपण स्वतःच कदाचित ‘ विचारवंत ‘ बनू. म्हणून तो कोणत्याही विचाराशिवाय, परिणामाचासुद्धा विचार न करता, कृती करत असतो. दुसरीकडे विचारवंत आपल्या हस्तिदंती मनोऱ्यात बसून आधीच सुजलेला आपला अहंकार ( ego ) अधिकच

फुगवीत, आपण विचार निर्माण करत आहोत अशी कल्पना करत असतात. आपला ‘ थोर ‘ विचार कृतीत न आणल्याबद्दल ते कार्यकर्त्यांना दूषणे देतात. त्यांना याची साधी जाणीवही होत नाही की जर तो विचार कार्यकर्त्यांना आकर्षित करत नाही तर त्याच्यातच काहीतरी त्रुटी असणार. याप्रमाणे आज सर्वत्र वांझ विचार व दिशाहीन कृती अशी दुःखदायक परिस्थिती आहे. म्हणून ही परिस्थिती लवकरात लवकर बदलण्याची गरज आहे. “ आदर्श आणि कृती यांतलेच हे द्वंद्व. हे एका समाजातले म्हणूनही पाहता येईल आणि एका व्यक्तीतले म्हणूनही पाहता येईल.

सध्या निरोप घेतो -- उद्या हे पुढे चालू करेन -- तुमचे चालू द्या --

उद्या नक्की देतो -- शिवाय -- धर्मकीर्तीचा ' पाणी ' हा दीर्घांक याच विषयावर आहे --

अस्तित्ववादानेही हा विषय फार खोलात जाऊन हाताळलेला आहे -- पण ते नको इथे --

मेंदू ही हजारो वर्षांच्या उत्क्रांतीतून घडलेली गोष्ट -- आता त्यातल्या पेशी, रसायने यांचा उपयोग करत वापर सुरू होतो -- मेंदूच्या अमुक भागाला नुकसान झाले की अर्धांग होतो किंवा स्मृतिभ्रंश होतो -- हे अभौतिक आहे ?

जरूर ! मन ही काही अलौकिक गोष्ट नाही -- अभौतिकही नाही --

मन भौतिकच तर असते -- त्याचा अभ्यास करतात -- ते मर्यादित असते --

अरे हो, पण विचार लागतोच --

मन आणि शरीर या शास्त्रीय दृष्ट्याही दोन वेगळ्या गोष्टी नाहीत --

वैचारिक कृती असल्याशिवाय पुढे काहीच घडत नाही -- कोमात पडलेला माणूस -- काय घडणार ?

काहींना असे वाटते -- आधी रस्ते, ड्रेनेज, पाणी हे बघा -- विचार कसले करताय ? -- असे म्हणण्याने आपण फारच प्रॅक्टिकल, लोकांच्या खऱ्या प्रश्नांना महत्त्व देणारे आणि बाकीचे दांभिक, असे दाखवायचे असते --

हेतूपूर्वक, इच्छेने जे जे घडते ती कृती नाही ?

कल्पनेचा, भावनेचा पायाही विचारच असतो --

मग आता, विचार आणि कल्पना यांत काय भेद आहे, असा प्रश्न येतो --

कुठलाही विचार -- सामाजिक, राजकीय परिवर्तनाचा किंवा अमुक स्त्री मला आवडतेय -- ती मला मिळावी -- हा -- या कृती नाहीत ?

वेळ पडल्यास जरा भांडू -- पण चर्चा पूर्ण करू --

विचार ही कृती असते की नसते ?

जबरदस्त महत्त्वाचे स्टेटस ! शरीर आपोआप परस्पर कृती करत नसते -- यावर चर्चा करण्या आधी हे ' वांझोटे ' काय असते ते क्लियर व्हायला हवे -- तिथून आभास यांनी सुरुवात करावी, असे वाटते. ' आमची पिढी षंढ निघाली ' वगैरे वाक्यांतून, हे फार प्रामाणिक, सज्जन आणि सत्याचे पुतळे दिसतात -- असा भ्रम तयार होतो -- तसे नको -- हा विषय महत्त्वाचा आहे --

यापुढच्या सर्व शंकांना एकच उत्तर -- मेलडी खाव और खुद जान जाव !

आता महत्त्वाचे थोडेच आहे -- प्रायोगिक कुणाला म्हणावे आणि त्यातले चांगले कसे निवडावे -- गेल्या दहा वर्षांत एकही नाटक न बघितलेल्या मान्यवर समीक्षकांची एक टीम यावर काम करून निकष ठरवेल --

गाओ झिंगझिआनचे नोबेल भाषण वाचा -- नेटवर उपलब्ध आहे.

पिरांदेल्लो, बेकेट, आयनेस्को, गाओ, खानोलकर, मेघना पेठे, राजन खान यांची ' रस-अनौरस ', रंगनाथ पठारे यांची ' टोकदार सावलीचे वर्तमान', मधू साबणेची ' लीळा ', कोएत्त्झीची ' डिसग्रेस ', सारामागूची ' ब्लाइंडनेस ', काफ्काची ' ट्रायल '.

.शत्रुत्व, द्वेष वा प्रतिकार ही भूतकाळाधारित प्रतिक्रिया असते. प्रतिक्रियेशिवाय जगणारा मानसिक साचा असू शकतो का ?

सर्वसमावेशक माणुसकीचा मानसिक साचा -- याची कल्पनाही करणे शक्य नाही --

साचायुक्त जगणे हे संघर्षमयच असणार -- माणुसकीचा लोप होतोच --

यातली गोची अशी आहे की प्रत्येक मानसिक साचा हा या ना त्या परिस्थितीत माणुसकीविरोधी असतोच -- तो स्वतःचा एक गट कल्पितो याचा अर्थच इतरांना तो परके लेखतो --

असे असंख्य गटांनी विचार करणे चालू असते -- जातवार, भाषावार, धर्मवार, आर्थिक भेदवार -- आणि त्यातही अगदी न्यायासाठीही हिंसा वापरावी की नाही, कम्युनिझम स्वीकारावा की नाही --असेही गट असतातच -- आणि अमुक गटाचे आकलन श्रेष्ठ, असे म्हणता येत नाही --

आधी निष्कर्ष आणि मग विचार -- अशी चर्चा कशी होणार ? कदाचित आणखी कुणाकुणाला प्रतिगामी म्हणायला हवे, हेही या चर्चेतून पुढे येऊ शकते --

यातले ' व्यायाम करायची गरज नाही ' या अर्थाचे सगळेच उत्साहवर्धक ! पण हत्ती टीव्ही बघत बसलाय, मोर ऑन लाईन ट्रेडिंग करतोय, दिवसभर एका टेबलखुर्चीवर काम करत बसलेला घोडा -- असेही काही दिसत नाही, हा आहे प्रॉब्लेम !

म्हणजेच सत्य, श्रेयस्कर, श्रेष्ठ असा काही मानसिक साचा नसतो किंवा असतो, असे दाखवून देता येत नाही ! उरते फक्त पॉवर-पॉलिटिक्स !

प्रत्येक मानसिक साचा फसवा आणि चलाखीयुक्त असतो की नसतो ? की काही साचे या दोषांपासून मुक्त असतात ?

जरा -- प्रत्येक मानसिक साचा -- यावर बोला ना -- मी ते आणि हे अशा पद्धतीने याकडे पाहात नाहीय --

प्रत्येक मानसिक साचा फसवा आणि चलाखीयुक्त असतो की नसतो ? की काही साचे या दोषांपासून मुक्त असतात ?

.दोन्ही प्रतिगामीच, असे मी म्हणतोय -- पण, मुरलीजी, तुमचे म्हणणे नीट सांगा, म्हणजे एक भूमिका दुसऱ्या भूमिकेपेक्षा कशी श्रेष्ठ ठरवता येते, ते कळेल --

.कळेत ' भूमिका हवी, भूमिका हवी ' म्हणून उद्घोष करणाऱ्यांना काय अपेक्षित असते ?

आपापले स्वभाव, रागलोभ, पूर्वग्रह आणि क्रियाप्रतिक्रिया यांनीच जर आपले वागण्या-जगण्याचे साचे घडत असतील आणि त्यांनाच जर आपण कौतुकाने ' भूमिका ' म्हणत असलो तर ' हितकारक ' भूमिका ठरवण्याचे मापदंड असू शकत नाहीत, हे मान्य करावे लागते -- एवढेच नव्हे तर, कुणीही सुचवलेले मापदंड निरुपयोगीच असणार हेही मान्य करावे लागते ! मग उरते फक्त पॉवर-पॉलिटिक्स !

मराठीत आणि इतर भाषांतही अशा बऱ्याच कलाकृती आहेत, ज्या भूमिकावाल्या नाहीत. जगणे समजून घेणे, हे पूर्वनिश्चित भूमिकेतून कदापि शक्य नसते. नुसते क्रिया-प्रतिक्रियांचे जगणे हेच फक्त शक्य असते, असे समजणाऱ्यांचा सांस्कृतिक मूल्यात्मकतेशी कवडीचा संबंध नसतो. रोजच्या जगण्याला या मूल्यात्मकतेचा स्पर्श देणे, हे खरे तर कलेचे काम, पण भूमिकावाले तिला जगणे अधिक घाण आणि हिंसक बनवण्यासाठी वापरतात. जगण्याप्रमाणेच कलाही कंटाळवाणी करून टाकतात.

' द क्रुसिबल ' या नाटकाचा लेखक आर्थर मिलर ( मेरिलिन मन्रोचा पती ) याची स्वतःची कम्युनिस्ट असल्याच्या संशयावरून चौकशी झाली होती -- तरीही तो, हा एक मानवी प्रश्न म्हणून याकडे पाहू शकतो. गोपू स्वतःची मते आणि पूर्वग्रह यांनाच महत्त्व देत बसतात. त्यामुळे, गोपूंचे नाटक खुजे ठरते. कलाकृतींमध्ये हे प्रत्यक्ष घडलेले दिसू शकते, पण ही नुसती अभ्यासाची, पुस्तकी गोष्ट नसते. स्वतः मोकळे राहून पाहणे यातूनच ते समजू शकते. ती एक प्रत्यक्ष जिवंत गोष्ट असल्याने ज्याची त्यालाच दिसू शकते. बुद्धाने सांगितलेले निर्वाण जसे देताघेता येत नाही, तसेच हे असते. माणसाच्या मनाला असा, पूर्वग्रहविरहित अस्तित्वाचा स्पर्श होणे हीच मूल्यात्मकता. एकमेकांचे स्वभाव, पूर्वग्रह परावर्तित करत राहणे म्हणजे एकूणच माणसाचे जगणे अधिकाधिक घाण करत राहणे.

खिजगणती याचा अर्थ ' पर्वा ' असा दिला आहे.

स्वभाव, पूर्वग्रह -- यांना गृहीत धरून प्रत्येकाला भूमिका असतेच, असे म्हटले जाते -- मौल्यवान कलाकृती या मर्यादा कशा ओलांडतात, ते समजूनच घ्यायचे नाही, अशी ठाम भूमिका असेल तर बोलणे संपते.

अत्यंत प्रांजळ, मनमोकळी मुलाखत. तांब्यांचा लेखनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण यातून बराचसा लक्षात येतो. मी यात काही उपप्रश्न विचारले असते. कोणते ते इथे सांगत नाही, कारण फेसबुकवर आम्ही अनेकजण मिळून तांब्यांची एक मुलाखत घेणार आहोत.

राष्ट्रवाद मान्य केल्यावर होणारी शस्त्रस्पर्धा सगळ्यांना योग्य का वाटते ?

धर्मभेद मान्य करायचे आणि धर्मभेदाच्या पॉवर-पॉलिटिक्सला प्रतिगामी म्हणायचे, हा दांभिकपणा नाही का ?

अशोक, काही गोष्टी कायद्यानेही थांबवल्या जातात -- उदा सतीची चाल, स्त्री-भ्रूण हत्या, अस्पृश्यता.

आणखी एक -- लोकांच्या हिताचे काही काम करण्यात देऊळ, मशीद, दर्गा, समाधी यांपैकी कसलाही अडथळा असेल तर तो क्षणात उधळून लावावा --

सारांश, डावी विचारसरणी, सामाजिक बांधिलकी आणि बुद्धिप्रामाण्यवाद, असे काही असले की टणाटण उड्या मारायच्या आणि मोठ्याने, एकरवात ' ग्रेट, ग्रेट ' म्हणायचे, हा खूपजणांचा एक रिवाजच होऊन गेलाय ! पण चांगल्या कलाकृतीला म्हणजेच पर्यायाने चांगले जगण्याला आणि सांस्कृतिक मूल्यात्मकतेला अडथळे ठरणाऱ्या -- अटकाव करणाऱ्या या गोष्टी आहेत, असे इथे म्हणायचे आहे.

मी ज्या नाटकांवर लेख लिहिलेला आहे, ती अराजकी असली तरी का महत्त्वाची ठरतात, हे त्या लेखात सांगितलेले आहे.

भूमिका घेतल्याने कलाकृतीत समग्रता येणारच नाही व भूमिका न घेतल्याने कलाकृतीत समग्रता हमखास येईलच ,असे ठाम म्हणता येईल काय?
-- या प्रश्नावर असे म्हणता येईल की भूमिका घेतल्याने कलाकृतीत समग्रता येणारच नाही, असे ठामपणे म्हणता येईल. भूमिका न घेतल्याने एखाद्या कलाकृतीत समग्रतेचा आवाका येईलच, हे मात्र ठामपणे म्हणता येणार नाही -- येण्याची शक्यता राहील, एवढे म्हणता येईल.

The play speaks to anyone who has lived in a society where the questioning of authority and of the general opinion leads to rejection and punishment. -- हे म्हटले गेले आहे ' क्रुसिबल ' या नाटकाबद्दल.

अलीकडच्या काळातले कविता, कथा आणि कादंबरी या विभागांतले अत्यंत महत्त्वाचे लेखन ! चिंत्र्यं !

हा कसा मोठा होता आणि तो कसा मोठा होता हे सारखे मुलांच्या टाळक्यांवर बडवण्यापेक्षा आपण आपले काम मन लावून करावे, एवढेच त्यांना सांगितले तरी पुरे होईल !

पुतळे तर एकजात सगळे काढून टाकावेत आणि लोकांना मोकळा सांस्कृतिक श्वास घेऊ द्यावा. चाललेय तर उलटेच -- अधिक आणि अधिक मोठे पुतळे आणि भरपूर स्मारकांची घुसमटगर्दी करणे !

माझे आकलन असे आहे की रस्ते, चौक, दुकाने, विद्यापीठे, रेल्वे स्टेशन्स, विमानतळ, खाद्यपदार्थ, बिड्या -- कोणत्याही बाबतीत कुणाच्याच नावाचा उपयोग करू नये -- ते नुसते न्यूनगंड वाढवते आणि मुलांची नैसर्गिक वाढ खुरटवते ! सांस्कृतिक प्रगल्भता मुळीच नसलेला किरटा समाज तयार करते ! शिवाय लोकांना वेडे, हिंसक बनवते, ते वेगळेच !

किंवा, जगात जर इतके अनगिनत ॲप्रोचेस आहेत, तर सत्य असे काही असू शकते का, असा एक वेगळाच प्रश्न पडू शकतो !

राजाने जगातल्या सगळ्यात तलम कापडाचा उंची पोषाख घातला आहे, असे जे इतके लोक म्हणत आहेत, ते चुकीचे असून, राजाने कोणताही पोषाखच घातलेला नाही, असे दिसण्या / म्हणण्या इतपत मला कापडातले समजते, एवढेच नम्रपणे सांगतोय !

आर्थर मिलरचे ' द क्रुसिबल ' हे नाटक सेम याच विषयावर आहे -- ते रूपकात्मक आहे. या दोन नाटकांबद्दल काही तौलनिक बोलता येते का ते पाहावे, असे इथल्या कोणत्या समीक्षकाला वाटले ? मी माहिती विचारतोय नुसती.

मी दुसऱ्यांच्यावर अन्याय केला तर चालेल ( किंवा त्याला अन्याय म्हणूच नये ) पण माझ्यावर कुणीही अन्याय करता कामा नये -- हे तर कोणत्याही शेंबड्या पोराचेही म्हणणे असते ! तेच सांगण्यासाठी मराठीतला एक एवढा मोठा विद्वान नाटककार खर्ची पडावा, हे दुर्दैव आणि इथे काहीतरी फार महत्त्वाचे सांगितले गेले आहे, असे म्हणत, मराठीतल्या इतक्या लोकांनी त्याची भजने करावीत, हे त्याहून मोठे दुर्दैव !

दर तीनशे वर्षांतून एक चांगला कवी निर्माण होतो -- हा एक नियमच ते सांगतात ! म्हणजे एका वेळी पाच महत्त्वाचे कवी असू शकत नाहीत -- किंवा आता मर्ढेकर वा बालकवी होऊन गेले ना, मग आता तीनशे वर्षे कुणाला चान्स नाही ! कला हे जणू जागा भरण्याचे एक ठिकाण आहे ! कशासाठी असे लिहिले जाते, कोण जाणे !

बाकी आणखी काही वाटल्यास उद्या लिहीन -- तोवर, ' उ ध ' हे एक महत्त्वाचे नाटक मानणाऱ्यांनी, त्यांना तसे वाटायची आशयनिष्ठ कारणे इथे द्यावीत. तसे झाले तर ही चर्चा इंटरेस्टिंग होईल.

' उध्वस्त धर्मशाळा ' हे, एक बाजू घेऊन लिहिलेले, नायक-व्हिलन टाईप, ढोबळ नाटक आहे, म्हणून खुजे आहे.

जगणे, त्यातले प्रश्न, ताण, संघर्ष हे सगळे आणि भाषाही, हे सगळे बुद्धिगम्य असले तरी कलेत त्यांचे स्वरूप केवळ क्रिया-प्रतिक्रियात्मक राहात नाही. असे झाले, ती मर्यादा ओलांडली गेली तरच कला मौल्यवान होते.

निराकरणे देणे, उपाय सांगणे, निवाडे देणे -- ही कलेची कामे नाहीतच -- कारण तसे मानल्यास, काही नीतीतत्त्वे, धारणा, विचारसरणी गृहीत धरून कलेला काम करावे लागते -- त्यामुळे ती सांस्कृतिक दृष्ट्या मूल्यहीन होते. मौल्यवान कला ही एखाद्या व्यक्तीच्या वा समूहाच्या धारणांचा प्रचार करणारी असू शकत नाही.

बुद्धी ही एक रेषीय आणि विश्लेषणात्मक पद्धतीने काम करते. तिची समज ही फारच मर्यादित असते आणि व्यक्तिसापेक्षही असते. जगण्याच्या प्रक्रियेचे भान साकल्यात्मक असते याचा अर्थ बुद्धीने पन्नास वर्षांनी कळणारे आत्ता एका क्षणात कळते असा नव्हे तर बुद्धीने कधीच कळू न शकणारे कळते, असा आहे. प्रत्येक गोष्ट बुद्धीच्या साच्यातच बसवली पाहिजे हा बुद्धिवाद्यांचा आग्रह कलेचे क्षेत्र खुजे, पुनरुक्तीयुक्त, कंटाळवाणे आणि निर्जीव करतो.

बुद्धिवाद ही कलेला मारक गोष्ट असते असे म्हणणे म्हणजे व्यावहारिक, उपयुक्ततेच्या क्षेत्रातही बुद्धी बंद पाडावी, असे म्हणणे नसते. कलेचे क्षेत्र हे मानवी संबंधांचे क्षेत्र असते. मानवी संबंध हे खूप जटिल आणि अमुक एक निष्कर्ष काढावा, असे

' सोपे ' नसतात. या संबंधक्षेत्रात बुद्धी ही प्रतिक्रियात्मक काम करते. माझ्या प्रतिक्रियांचा प्रचार करणे हे कलेचे काम असू शकत नाही. कारण ते सर्वांना प्रस्तुत वा भान देणारे असू शकत नाही. एक अमजदखान आणि एक अमिताभ यांतून जगणे समजणे शक्यच नसते.

लेखक जर पूर्वग्रहयुक्त प्रतिक्रिया देणारा असेल तर जगण्यातले प्रश्न समजून घेण्याची प्रक्रिया घडत नाही. लेखकाचे पूर्वग्रह दुसऱ्यांच्या आयुष्यांत प्रस्तुत नसतात. किंवा एखाद्या समूहाच्या आयुष्यात फक्त प्रस्तुत असू शकतात. ज्यातून समजण्याची, भान येण्याची प्रक्रिया घडू शकत नाही, त्या कलाकृतीला सांस्कृतिक मूल्य नसते. सांस्कृतिक मूल्य म्हणजे सर्व मानवांना प्रस्तुत असणे, सर्व मानवांना जगण्याच्या प्रक्रियेचे भान देणारे असणे. एखादी बाजू घेऊन निर्माण होणारी कलाकृती, एखाद्या समूहाशी, विचारसरणीशी बांधिलकी मानणारी कलाकृती ही अशी मूल्ययुक्त असू शकत नाही.

सुख आणि सुरक्षितता या कल्पनांशी प्रेम एकरूप असते. मी, कुटुंब, घराणे, जात, गाव -- असे ते एक विस्तारते आत्मकेंद्र असते. सगळी प्रेमे सतत कृतिशील नसतात. वेळवकत पाहून ती कृतिशील होतात. त्यामुळे कुटुंबप्रेम हे देशप्रेमाला मागे ढकलू शकते. त्या त्या व्यक्तीच्या वकूबाप्रमाणे कोणत्याही दोन वा अधिक प्रेमांत संघर्ष होऊ शकतात. प्रसंगी देशप्रेमही उठावदार होऊ शकते.

राजकीय क्षेत्र हे मानवी जगण्याच्या अनेक अंगांपैकी एक -- शासनयंत्रणा / व्यवस्था -- असते. आत्मकेंद्री डावपेच म्हणाल तर प्रत्येक मानवी संबंधात असतात.

' अश्रूंची झाली फुलें ' मध्ये विमानतळ दाखवला, ' झाला अनंत हनुमंत ' मध्ये ब्रेबॉर्न स्टेडियमवर माणूस हवेत उडतानाचे दृश्य दाखवले वा ' फुलाला सुगंध मातीचा ' या नाटकात रंगमंचावरून धडाडत जाणारी रेल्वे दाखवली म्हणून ती नाटके ग्रेट ठरत नाहीत. ती खूपच खोटारडी नाटके असल्याने, तिथे आशयनिष्ठ बोलणे सोपे आणि सोयीचे वाटते. तसेच इथेही संवाद भाषा, वैचारिक नाटक ही वैशिष्ट्ये म्हणजे नाटकाचा आशय नव्हे, हे लक्षात घेतले पाहिजे. " ही त्याच्याखाली झोपते, तो तिच्यावर चढतो -- ही काय कादंबरी आहे ? " असल्या बावळट शेरेबाज समीक्षेतून बाहेर पडावे लागेल. कलाकृतीचा प्राण म्हणजे तिचा आशय. समीक्षा ही त्याबद्दल बोलणारी हवी.

मी माझे म्हणणे थोडे थोडे मांडत जाईनच. माझा प्रमुख मुद्दा असा आहे की समीक्षा ही आशयनिष्ठच असायला हवी. कोणत्या तरी तांत्रिक अंगाची नव्हे. ज्यांना ' उध्वस्त धर्मशाळा ' हे नाटक ग्रेट वाटते त्यांनी आशयनिष्ठ पद्धतीने त्याची कारणे सांगायला हवीत.

अलग अलग मजहब हैं तो बैर अपने आप आ ही जाता है ।

मला कुणी सीपी म्हटले की बँक-नोकरीत आम्ही एकत्र होतो, हे समजून चालावे -- उदा. Sudheer Pote . धन्यवाद गायनाचार्य !

इन्सेनकी औलाद है इन्सेन बनेगा !

एकदा एका प्रख्यात लेखकाच्या घरी गप्पा मारत बसलो होतो, तेवढ्यात एकाने त्यांचा वाचायला नेलेला दिवाळी अंक त्यांना परत आणून दिला आणि तो गेला. तो चुरगळून विद्रूप केलेला अंक मला दाखवून ते म्हणाले, " पाहिलंत ! रांडेच्याने वाचायला नेला होता हा अंक आणि त्याच्यावर हिंस्त्र बलात्कार करून परत आणून दिलाय ! "

" विनोदी अंक विकत घेतला, च्यायला, पण या महागाईमुळे हसूच येत नाहीय ! "

.ते वैचारिक वगैरे आपल्याला नाही आवडत -- आणि अवघड कथा आणि कविता -- नो -- बाकी सगळे वाचतो मी ! -- हे अभिमानाने सांगणे !

अरे, गेला कुठे दिवाळी अंक ? चुकून रद्दीत तर गेला नसेल ? -- या विचाराने अस्वस्थ होणे.

काहीतरी अर्धवट वाचून ठेवून देणे आणि मी अमुक दिवाळी अंक वाचतो आहे, असे म्हणणे.

जुर्रत म्हणजे उद्दामपणा -- बरोबर ?

गाओने पेसोला विसाव्या शतकातला महान कवी म्हटले होते.

बुद्धी, वाचन, विचार, चिंतन असेल तर नक्कीच सौंदर्याची खुमारी प्रचंड वाढू शकते !

मराठीतले दर्जेदार दिवाळी अंक वाचल्यावर मेंदूत कोणती रसायने तयार होतात, हे सापडत आलेले आहे. पुढल्या वर्षीपासून डायरेक्ट ती रसायने मेंदूत सोडता येणार आहेत. फक्त पन्नास रुपयांत !

तुम किसी और को चाहोगी तो मुश्किल होगी ।

एक तत्त्व आहे -- लेखकाला जे ' वाटते ' ते त्याने सत्य म्हणूनच बोलावे -- आणि याला जोडून दुसरे एक तत्त्व आहे -- काहीही बोललात तरी त्यात थोडे तरी तथ्य असतेच !

डालर नही तो कमीजका कालर भी चलेगा -- असे काही कोणत्या गाण्यात आहे ते ?

पैसा नही तो पैसे का पर्स भी चलेगा !

इतक्या अपेक्षा, त्यांचे बारकावे यांमुळे मन सतत अस्वस्थ राहण्याची शक्यता वाढते -- आणि सततची अशी अवस्था मुश्किलता आणते --

गंभीर म्हणजे प्रचंड ताण, वेडे करणारी गुंतागुंत -- हे खरे नाही -- खोलातले जे असते ते ताणरहित असते -- म्हणजेच हलकेफुलके असते !

इथे कधी कधी काय बोलतो यापेक्षा आपण एकमेकांशी बोलणे हेच महत्त्वाचे असते !

काही माणसे कसले जबरदस्त काम करून जातात !

आणि सूर्यकांत म्हणजे सूर्यकिरणांचे एका केंद्रात परावर्तन करून उष्णता उत्पन्न करणारा एक विशेष प्रकारचा मणी.

चंद्रकांत म्हणजे चंद्राच्या किरणांत द्रवणारा एक कल्पित मणी ! माझे काहीच खरे नाही, हे ओळखूनच माझे नाव ठेवले गेले असावे !

Shriranjan Awate -- हे त्या प्रयोगाचे पूर्ण समीक्षण नाही -- अधिक महत्त्वाचे वाटलेले मुद्दे फक्त कव्हर केले आहेत. मी असे सुचवू इच्छितो की तूही एक वेगळी नोट लिही त्या नाटकावर म्हणजे त्याचे आणखी काही पैलू आपल्या फ्रेंडसपुढे येतील.

धादांत खैरलांजी

सगळे इग्नोअर करताहेत की नाही यावर लक्ष ठेवायचे आणि जे करत नाहीयत त्यांना पुन्हा सांगायचे -- इगनोअर मी !

आभास यांची ही कॉमेंट -- Conceptual rigidity is growing sign of oldness. -- या चर्चेचा सारांशच वाटते.

चांगल्या प्रकारे हा असा शब्द वापरणाऱ्याचे एक उदाहरण सांगतो. मी कोल्हापूरला असताना ज्या शिंप्याकडे माझे कपडे शिवायला टाकायचो तो असा हा सुंदर शब्दप्रयोग करायचा -- आपण कॉलर अशी ठेवू या -- आपण खिसा असा करू या -- वगैरे. माझा शर्ट चांगला होण्यात माझ्याइतकेच त्यालाही इंटरेस्ट आहे, त्यालाही त्याचे तितकेच महत्त्व आहे, असे वाटायचे ! या कोल्हापूरच्या आठवणी जाणार नाहीत !

कोणत्या ना कोणत्या मानसिक / वैचारिक साच्यात स्वतःला बंदिस्त करून घ्यायला तयार होणे -- हे म्हातारपण आणि ' मन केले ग्वाही ' या पद्धतीने स्वतःच्या आकलनप्रक्रियेबरोबर जाणे म्हणजे तरुणपण -- मग शारीरिक वय कोणतेही असो.

आपण लव्ह-गुरूच्या शोधात असावे आणि ज्ञान लपवणारीच व्यक्ती भेटावी, याला काय करणार ?

माझ्या स्वतःच्या पोस्टवर येणाऱ्या सर्व कॉमेंटस मी लाईक करतो -- विरोधी असल्या तरी ' वाचल्या ' या अर्थाने -- कारण त्या तशा आपणच मागवलेल्या असतात --

भावनेचे मूळही विचारातच असते, दोन्ही एकत्र असतात हे खरे असले तरी भावनेप्रमाणेच विचार हेही अभिव्यक्तीचे माध्यम असू शकते -- इंग्लिशमध्येही रोमँटिक कविता आणि मेटॅफिसिकल कविता यांत हा फरक दिसतो -- अलेक्झांडर पोप या कवीची कविता -- उपरोधिक-वैचारिक होती -- तर तिला कविता म्हणावे का असा तिकडेही वाद झाला होता -- भर देण्याचा, त्या कलावंताला काय व्यक्त करणे महत्त्वाचे वाटते -- यांमुळे असे फरक पडतात -- ते दिसूनही येतात -- याच विषयावर मी ' कवितेतील अ-भाव ' या नावाचा एक लेख लिहिला होता -- तो ' सत्यकथे ' त प्रसिद्धही झाला होता --

Rajasthaan Acrylic on canvas 12" x 12"
चंद्रमोहनांची ही राजस्तान चित्रे तर प्रत्यक्ष पाहण्याचा लाभ मला मिळाला ! माझ्या घरापासून वाहनाने केवळ साडेपाच मिनिटांवर हा खजिना आहे !

जी गोष्ट आपण नंतर नीट वाचणार आहोत किंवा आपल्याला हवी तेव्हा पाहता आली पाहिजे, ती न वाचताही लाईक करून ठेवावी, म्हणजे आपल्या ॲक्टिव्हिटीमध्ये ती राहते आणि कधीही सापडते !

पुढारी झाल्यावर सगळ्या विषयांतले सगळे कळते, हे तुम्हाला कधी कळणार ?

बौद्धिक वा प्रातिभ कुवत कुणी, कुणाची, कशी मोजावी यावर जोवर काही निर्णय होऊ शकत नाही तोवर एक माणूस एक मत हेच ठीक ! आणि खूप शिकलेल्या एखाद्या शहरी माणसापेक्षा एखादा खेड्यातला अंगठेबहाद्दर अधिक शहाणा असू शकतो, याबद्दल शंकाच नाही.

गोपूंच्या स्मृतीस अभिवादन !

त्यांची ' विदेही ' ही कविता ! मी इथे एफबीवरही दिली होती ! स्मृतीस अभिवादन !

अरे हो भाई -- मी काही त्या बातमीचा पाठपुरावा करत नव्हतो -- टीव्हीवर दिसले तेव्हा कळले -- पण मीही या बातमीवर सुरुवातीपासून लक्ष ठेवून असायला हवे होते, हे मला पटलेले आहे -- पण, या बातमीची सुरुवात कधी झाली हेही मला माहीत नव्हते ! पण आणखी हजारो बाबतींत माझी अशीच अवस्था आहे !

कितीही डोकी आपटली तरी लैंगिक आकर्षण ही गोष्ट नष्ट होणे शक्य नाही -- या पायाभूत सत्यावर आधारितच कोणताही उपयुक्त विचार होऊ शकतो --

मुळात सौंदर्य नसते प्रॉब्लेमॅटिक -- माणसाचे गुंताडा मन तसे असते -- मनाचा गुंता होत नसेल तर जरूर स्त्रीला सुंदर म्हणावे, असे मला वाटते --

सूर्यास्त सुंदर असतो तर स्त्रीला सुंदर असण्यात काय प्रॉब्लेम आहे ? !

मराठीतले एक नामवंत लेखक म्हणाले होते -- तो गाओ ना ? अहो, तो चीनविरुद्ध आहे म्हणून दिले त्याला नोबेल ! ( गाओ चे नोबेल लेक्चर हे मला तर साहित्याची भगवद्‌गीता म्हणावे, इतके महत्त्वाचे वाटते ! )

हवेतला प्राणवायू मात्र चोरता येईल ! त्यानंतर मात्र काही चोरायची गरजच असणार नाही, सगळे त्यांचेच असेल ! दुसरे उरणारच कोण ?

अमुकच असे कळत नाहीय किंवा ' धूसरपणे ' ही ' कळले ' असे म्हणता येत नाहीय पण प्रचंड घडामोडीतून हे आले असणार, असे वाटतेय !

यमक जुळल्याशी कारण -- अर्थ गेला तेल लावत !

ना भुंगा ना डासही ना झुरळ छळिल मला
भीम सखा मम रक्षणी सज्ज असे खुळा

भीमाची मगरमिठी सोडवून आले
अंगणात माझ्या मी छान फूल झाले

उत्पादक -- मे. भीमशक्ती कं. लि.

देवीसाठी दुसऱ्यांनी घालायचा असतो गोंधळ -- त्रास होणारच --

देवीला आवडतोच ना --

दसऱ्याची तयारी ! लुटा, लुटा... सोनं लुटा ;
मोहरा संपल्यावर आठवणीने भांडे परत करा !

आणा आग्ऱ्याचा पेठा । नाही आनंदा तोटा ।।

खरे सोने कुणी वाटत नाही याची एवढ्या वर्षांत खात्री पटलीय, त्याचा हा राग !

नाटक आता सादर होणार असे वाटते, पण पडदाच उघडला जात नाही !

दोन समकालीन नाटककार

दोन समकालीन नाटककार .... ( पुढे चालू ... )

नोटमध्ये लेख पूर्ण येऊ शकलेला नाही. शिवाय नको तिथे शब्द जोडले गेलेत -- नको तिथे पॅरॅग्राफ आलेत -- असू दे असाच की काढून टाकू ?

आणि शिवाय माझ्या लेखावर माझा जो परिचय छापलाय, त्यातही मी एकांकिका व नाटके लिहिली असल्याचा उल्लेख आहे !

संस्थांची माहिती असलेला वीणा सानेकरांचा एक लेख आहे -- त्यात ' वलय ' आणि तुमची ' मिती चार ' यांनी माझी नाटके सादर केल्याचे उल्लेख आहेत !

नगर जिल्ह्यात अकोले गावाजवळ एक थुगाव होते -- त्याचे नाव बदलून सुगाव केले गेले होते.

बुद्धी वापरणे बंद करायचे असा विषय चाललेला नाही. बुद्धीच्या मर्यादा ओळखणे, तिला सर्वस्व न मानणे आणि तिच्यामुळे मानवी जीवनाला येणारा रोगटपणा पाहणे, हा विषय आहे. कुणीही स्वतःच्या ऑफीसचा रस्ता विसरावा किंवा पूल बांधणाऱ्या अभियंत्याने ते शास्त्र विसरावे, असे म्हणणेच नाहीय.

आता मात्र मी थांबावे -- आज तरी झाकली मूठ ठेवावी !

त्या मटातल्या मुंग्यांएवढ्या चेहऱ्यांच्या एकाच रंगाच्या स्त्रिया मात्र दयनीय वाटतात बाबा !

पण माझी आवड, वेगवेगळे रंग असावे, अशीच आहे !

काल एका बँकेत शिपाई स्त्रीपासून मॅनेजर स्त्रीपर्यंत हेच दिसले ! हीच समता म्हणायची !

मन विदीर्ण असते, बुद्धी त्या मनाचा भाग असते, म्हणून तीही विदीर्णच असते. ती काहीही ' सम्यक ' करू शकत नाही.

बुद्धीचा वापर हा एकरेषीय आणि विश्लेषणात्मक असतो. या पद्धतीने कोणताही मानवी संबंध समजणे शक्य नसते. मते आणि पूर्वग्रह यांचे अडथळे कशाचेच आकलन होऊ देत नाहीत. आणि हजारो गोष्टी हजारो परिणाम करत असल्यामुळे एकच

संबंध समजायलाही अमर्याद काळ लागू शकतो -- तरीही ते आवाक्यात येणे शक्य नसते. बुद्धीने मला ' आवडणाऱ्या ' मर्यादित पद्धतीने मी निष्कर्ष काढत असतो. त्यामुळे, बुद्धीने सर्वहित शक्य नसते, हा निराशावाद स्वीकारावाच लागतो.

होय ना, ते सृजन कशासाठी निर्माण झाले याचे कारण माहीत नसणे -- मी अमुक एका हेतूने केले असते तर तो हेतू मला सांगता आला असता -- जसे उदा. ' सम्यक क्रांती ' करणे !

बुद्धिप्रामाण्यवादी हा मन वापरण्याची सवयीची पद्धत गृहीत धरत असतो. त्यामुळे मी आणि जग हे द्वंद्व गृहीत धरतो. त्यातून येणारी असंख्य द्वंद्वे गृहीत धरतो. माझे हित, महत्त्वाकांक्षा, यश, माझी सुखे यांबरोबरच तो क्रोध, सूड घेणे, दुसऱ्याला देशोधडीला लावणे, युद्ध, छळ -- हेही गृहीत धरतो. काहीजण तर म्हणतात की हे सगळे हवेच, नाही तर जगणे कंटाळवाणे हॉइल. ( हे नसेल तर कलाकृती कशा हो निर्माण होतील, असेही काही संस्कृतिप्रेमी विचारतात. ) प्रत्येकाची परिणामबद्धता वेगवेगळी असल्याने बुद्धीचे वापरही वेगवेगळे असतात. त्यामुळे, समता म्हणजे तुमची सत्ता जाऊन माझी सत्ता येणे ! पूर्ण मानवजातीत समता, न्याय यांची कल्पना करणेही बुद्धीच्या बसची बात नसते. याची त्यांना लाजही वाटत असते -- त्यावर ते बौद्धिक उपाय असा काढतात की -- न्यूनगंडाची भावना झाकण्यासाठी, त्यांना जे हवे असते त्यामागे ' सम्यक ' किंवा ' समग्र ' असा एक तिथे निरर्थक ठरणारा शब्द जोडतात -- जसे ' सम्यक क्रांती ' !

कोण्या कारणे हे जालेसे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।। -- तुकाराम.

तुम्ही जर रॅशनॅलिस्ट असाल तर पहिले वाक्य तुमचा इंपेशन्स -- अधीरता दाखवतेय -- तसे नसावे -- काय जे बुद्धीवर घासायचेय ते चालू द्या ना जरा ! तुम्हाला समजून झालेय ते अंतिम, या चालीवर तुम्ही तरी बोलू नये.

बुद्धिप्रामाण्यवादी हा अपरिहार्यपणे निराशावादीच असतो, त्यामुळे तो परिवर्तनवादी असू शकत नाही, हे एक, आणि मोठ्या हुशारीने तो अनेकांना पृष्ठस्पर्शी म्हणत असला तरी त्याला स्वतःला खोलातले काही कळूच शकत नाही, हे दुसरे. असे मला का दिसते, हे सांगायची संधी घेण्यासाठी हे आजचे दोन स्टेटस दिले आहेत.

" पृष्ठस्पर्शी, सखोल, आणि बुद्धिप्रामाण्यवाद हे तीनही शब्द साहित्यातले ज्यांना काहीही कळत नाही, अशा समीक्षक नावाच्या परभृत जमातीचे उच्छिष्ट आहे. " -- या मुरलीजींच्या वाक्याशी जरा अडायला होते आहे -- त्यांनी थोडे स्पष्ट केले तर बरे होईल --

एक शून्य बाजीराव, वेटिंग फॉर गोदो, सिक्स कॅरॅक्टर्स -- सखोल.

तुम्ही नावे दिलेल्या दोन्ही, बहुसंख्य मराठी चित्रपट, बहुसंख्य करमणूकप्रधान ( व्यावसायिक ) नाटके -- पृष्ठस्पर्शी.

जगणे चालू असते -- त्यात माणसे, निसर्ग, भूतकाळ, शारीर-मानसिक उत्क्रांती, संस्कार वा त्याला आपण परिणामबद्धता म्हणू -- अशा हजारो, लाखो, कोट्यवधी कारण-परिणाम परंपरा यांनी ते जगणे चालू असते -- याचे भान असलेली कलाकृती सखोल आशयाची असते -- एकदोन कारणे आणि त्यांचे परिणाम असे उथळपणे पाहणारी वा निष्कर्ष काढणारी अशी ती कलाकृती नसते. काहीतरी छोटीशी बौद्धिक कारणमीमांसा मान्य करून सवयीतले नैतिक वा एखाद्या विचारसरणीला सुसंगत असे निष्कर्ष काढणारी कलाकृती ही पृष्ठस्पर्शी असते.

सखोल म्हणजे पृष्ठापासून खूप खोलवरचा आशय देऊ शकणारे आणि पृष्ठस्पर्शी म्हणजे खोलातला आशय देऊ न शकणारे.

त्यासाठी अशा एका हिंदी पिक्चरचे हीरो व्हायला हवे की ज्यात तो हीरो व्हिलनच्या ताब्यात सापडतो आणि तिथे त्याला इंजेक्शने देऊन आणि विजेचे शॉक देऊन बधीर केले जाते. तो हीरो नंतर बरा होतो, तेवढे टाळायचे, म्हणजे झाले !

त्या साईडला जायचे नाही, आपणही अनुभवी आहोत -- पतिपत्नी म्हटले की दोघेही मराठीत बोलणारे असले तरी त्यांचे एकमेकांना कळत नाही !

एक शंका : द्रौपदी हे नाव असलेली कोणतीच मुलगी किंवा स्त्री आढळत नाही. अगदी कथा कादंबऱ्यांमध्ये सुद्धा ! काय कारण असावे ? वस्त्रहरण , पाच नवरे की आणखी काही ?

मी आज च एक अत्यंत महत्वाचे आणि वेगळे लांबलचक आडनाव ऐकले. सोडावॉटरबॉटलओपनरवाला !!! असे वेगळेच आणि हर्षोल्लहासक आडनाव कोणी ऐकले आहे काय ? असल्यास कोणते ? [ किमान दहा अक्षरी असेल, तरच इथे लिहावे.
पिंपळगावबसवंतकर .

अहमदनगरकर.

खडीउकडगावकर.

पैसा, प्रसिद्धी, मान हे सगळेच आपल्या कवितेच्या क्षेत्रात नगण्य आहेत. डोंट वरी ! -- या वाक्यात एक जहाल उपरोध आहे कारण सांस्कृतिक दृष्ट्या ही चिंतेचीच बाब आहे -- हे लक्षात घ्यावे !

या सगळ्या आपल्या समोर येणाऱ्या मानवी जगण्यातल्या गोष्टी आहेत !

Champra Lekhan
champralekhan.com
अमर, माझे आयुष्य घडतेय तसे घडू देतोय -- अट्टहास नाही -- चूक, बरोबर अशा सर्वच गोष्टींचे मिश्रण असलेले हे घडणे आहे -- हे सगळे अनेक मतमतांतरांच्या शक्यता असलेले असते, याची जाणीव मला असते -- काही गुण असतील, काही दोषही असणार --

If culture is just some habit and memory, then what you say is right.

culture is a bigger concept -- scripture is a part of culture.

' भाग आहे ' अशा नाइलाजाच्या भावनेशिवाय ' असणे ' असू शकते का हाही प्रश्न इथे महत्त्वाचा ठरावा --

एरवी, कायद्याची माहिती आधी घेऊन पळवाटा शोधून ठेवायची पद्धत आहे !

नपेक्षा शोक करायची पाळी येईल !

डाउनलोड करणे, वाचणे -- हे मोफत आहे -- पण याचा अर्थ, माझ्या अनुमतीशिवाय कुणी त्याचे पुस्तक प्रकाशित करू शकणार नाही -- माझ्या नाटकांचे प्रयोग करताना मानधन देऊन लेखी अनुमती घ्यावी लागते --

' हृदयाचे कर्तेपण ' एवढे पॉवरफुल असल्यावर ' कचकचीत दाद ' मिळणार नाही, असे होईलच कसे ?

यातूनच ' स्वतःचे ' काही येऊ शकते, हे काहींना कळत असावे !

मी एक ' सत्य ' मांडत असतो की जगण्याचे आकलन हे कलाकृतीच्या वस्तुद्रव्यावर अवलंबून नसते. ते जी कलाकृती व्यक्त करते ती कोणत्याही माहोलात प्रस्तुत -- रेलेव्हंटच असते !

अमूल्य आणि मूल्यहीन यांच्या अर्थांतले फरक समजणे एवढाच आहे प्रॉब्लेम !

In Marathi Saint Tukaram wrote very valuable poems. In one poem he says, for truth or falsity my mind only is the touchstone, I never bother for the majority opinion.

आग्रही नसलेला पण तथ्य असलेला एक मुद्दा मला असा दिसतो की अ ही व्यक्ती ब बद्दल कितीही जवळीक आणि आपुलकी दाखवत असली आणि ती खरीही असली तरी अ च्या मनातल्या एकूण मूल्यव्यस्थेत ब ला फार किंमत नसते -- त्यामुळे आपोआपच वागण्यात ब ला कमी समजले जाते आणि त्यामुळे ब चे अपमान होत राहतात. शेवटी निर्णय ब ने घ्यावा, अशी परिस्थिती येते. अनेक अनुभवांतून ब ला हे कळते की आपण, दाखवले जाते तितके वस्तुतः महत्त्वाचे नाही -- तेव्हा एक तर लाचारीने ते नाते चालू ठेवणे किंवा वैतागून ते नाते मातीत फेकून देणे, हे दोनच पर्याय ब पुढे उरतात.

माझी पाच नाटके -- नाणेफेक, ढोलताशे, जणू काही वास्तव, डावेदार आणि इराक -- ' आविष्कार ' कडून, काकांच्या देखरेखीखाली -- सूत्रधारित्वाखाली झाली !

" श्री. अरुण काकडे यांची 94 व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन अध्यक्ष पदी निवड !!! " ' आविष्कार ' नाट्यसंस्थेचे आधारस्तंभ किंवा ज्याच्या खांद्यावर आज संस्था उभी आहे असा मजबूत खांब म्हणून अरुण काकडे उर्फ काकडे काका यांच्याकडे पाहिलं जातं . गेली६० वर्षे ते प्रायोगिक रंगभूमीशी असलेलं आपलं नातं टिकवूनआहेत आणि वयाची पंच्याहत्तरी पार करूनही तरुणांनालाजवील अशा उत्साहाने आजही नित्य नवीन नाटकं सादर करत आहेत . त्यांच्या या एकूण योगदानाचा गौरव भारतीय संगीत नाटक अकादमीने त्यांना गौरव पुरस्कार देऊन केलाआहे . काकडे यांनी पुण्यातून आपल्या करिअरला सुरुवात केली , पण लवकरच ते मुंबईत आले . विजया मेहता ,अरविंद देशपांडे , विजय तेंडुलकर , माधव वाटवे या तेव्हाच्या तरुण रंगकर्मींनी ' रंगायन ' ही संस्था सुरू केलीहोती . तिच्या द्वारे ते वेगवेगळी नाटकं करीत असत . या संस्थेशी अरुण काकडे जोडले गेले . ' रंगायन ' मध्ये वाद होऊन संस्था फुटली आणि अरविंद देशपांडे , सुलभा देशपांडे प्रभृतींनी १९७१ साली ' आविष्कार ' ही नवी नाट्यसंस्था स्थापन केली . त्यावेळी काकडे या मंडळींच्या खांद्याला खांदा लावून उभे राहिले . या संस्थेच्या व्यवस्थापनाची धुरा त्यांनी स्वतःच्या खांद्यावर घेतलीआणि तेव्हापासून काकडे काका म्हणजे ' आविष्कार ' हे समीकरणच बनून गेलं , जे आजतागायत कायम आहे . 'आविष्कार ' ने

छबिलदास चळवळ उभी केली . या चळवळीतून अनेक नाट्यसंस्था आणि नाट्यकर्मी पुढे आले .रंगभूमीवरचे अनेक महत्त्वाचे प्रयोग या चळवळीच्या माध्यमातून झाले . काकडे काका या चळवळीचे बिनीचे शिलेदार होते . आजही प्रत्येक नवा प्रयोग ' आविष्कार ' ने करावा हा त्यांचा ध्यास असतो . स्वतः पडद्यामागे राहून ते त्यासाठी अविरत झटत असतात . त्यांना प्रसिद्धीची हाव नाही की रंगमंचावर चमकण्याचा मोह नाही .त्यांनी कायमच निर्मिती सूत्रधार या भूमिकेत राहणं पसंत केलं . त्यासाठी त्यांनी आपल्यातील अभिनेतेपणालाही वेळोवेळी मुरड घतली आहे . तीन वर्षांपूर्वी त्यांच्या वयाची पंच्याहत्तरी ' आविष्कार ' ने मोठ्या थाटात साजरी केली . त्यावर्षी काकडे काकांनी १२ महिन्यांत १२ नवीन नाटकं ' आविष्कार ' तर्फे रंगमंचावर आणली . आपल्या६० वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी रंगकर्मींच्या तीन पिढ्या पाहिल्या आणि घडवल्याही . आविष्कारमध्ये सतत नवे ,युवा कलाकार येत असतात . कालांतराने पुढे निघून जातात . परंतु चळवळ चालवायची तर निष्ठावान आणि सच्च्या कार्यकर्त्यांची गरज असते . अरुण काकडे हे असे हाडाचे कार्यकर्ते आहेत . ते स्वतः नवनव्या कलाकारांना ऊर्जा पुरवीत राहिले . त्यांच्या कामाला चालना देत राहिले . कलाकारांच्याही मनात त्यांच्याविषयी अतिशय आदराची आणि कृतज्ञतेची भावना आहे . मात्र , मृदुभाषी काकडे काका या सगळ्या यशाकडे तटस्थपणे पाहतात .नवं नाटक करायचं म्हटलं की मात्र त्यांच्या अंगात उत्साह वीज बनून संचारतो आणि त्यांचा वावर बघताना तरुण कोण असा प्रश्न संस्थेतल्या रंगकर्मींना पडतो . . काकडेकाका सलाम ! ९४ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल, आपले अभिनंदन !!! (Pic. Credit : Sanjay Pethe ) *
रंगभूमीवरची एक तपस्वी व्यक्ती !

श्री. अरुण काकडे यांची ९४ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलन अध्यक्ष पदी निवड ....... खूप खूप अभिनंदन काका ! अत्यंत आनंद वाटावा अशी घटना !!!

.अजिंक्य, घडणाऱ्या घटना अगणित प्रभावांनी घडतात -- बुद्धीने ते प्रभाव विश्लेषक पद्धतीने कदापि समजणे शक्य नाही -- त्यामुळे, तू म्हणतोस त्या दोन्ही शोकांतिका नासमझीमुळे घडतात, असेच म्हणावे लागेल --

यस ! विनयजी, तुमचे खरे आहे ! मी फक्त एक मुद्दा मांडू इच्छितो -- ज्ञानेश्वरी न लिहिताही हे आकलन असू शकते -- ती व्यक्ती प्रसिद्ध असलीच पाहिजे, असे नाही -- त्यामुळे, ज्ञानेश्वर ग्रेट असले तरी त्यामुळे स्वतः न्यूनगंड स्वीकारता कामा नये --

विनयजी, हे कळायला अमुक इतकी वर्षे लागतील, असे शाळाकॉलेजच्या अभ्यासक्रमाप्रमाणे काही ठरलेले नाही -- ते लौकरही कळू शकते --

.आपण सगळे एकत्र असल्यामुळेच आपल्याला हे घर उपलब्ध झालेले असते -- फायदा झालेलाच असतो -- त्यामुळे, या कामाला लष्करच्या भाकरी न म्हणता, सगळ्यांनीच जबाबदारी घ्यायला हवी -- आपण आरामात राहावे आणि मीटिंगमध्ये आवाज वाढवून कामे करणाऱ्यांना त्रास द्यावा, हेही योग्य नव्हे -- पण बहुसंख्य लोक काम नको, जबाबदारी नको पण माझे सगळे नीट व्हायला हवे, या विचाराचे असतात -- वेळ नाही, फार बिझी आहे, अशी त्यांची पालुपदे असतात -- आणि हे त्यांचे तीस तीस वर्षेही असेच चालू असते !

हा एक प्रकारचा भूमिगत प्रश्न असतो आणि तो लाखो, करोडो लोकांची आयुष्ये कुरतडत असतो, असा माझा अंदाज आहे.

उत्तर- आधुनिकतेत या कल्पनांना आव्हान मिळालेले आहे --

तो एका सामाजिक वास्तवाचा परिणाम आहे -- या वास्तवाचा परिणाम म्हणून न येणारे साहित्य, त्याच वास्तवातला लेखकही लिहू शकेल -- पण मग ते दलित साहित्य असणार नाही --

' विवेकी संताप ' असे काही असू शकते का ? की संताप ही एक भावना असल्यामुळे इथे विवेकाचा काही संबंधच नसतो ?

दारू पिणारा माणूस म्हणजे बायकोचे मंगलसूत्र ओढणारा माणूस, असे जे चित्र अनेकदा दाखवले गेले -- ते जर मनातून पुसून टाकले तर हा प्रश्न मिटेल, अशी एक आशा वाटते !

आपला आणि आपल्याला जे आवडतात त्या सगळ्यांचा संताप ' सात्त्विक ' असतो -- असेच दिसते !

समजा राजस आणि तामस संतापही असतील -- पण ही विशेषणे कुणी लावताना दिसत नाही !

आजच्या जगण्यात बऱ्याच जणांची असू शकेल अशी नेमकी मनःस्थिती या पोस्टमध्ये अचूकपणे व्यक्त झालेली आहे. कोणतेही तत्त्व वा प्रणाली यांच्या साच्यात न अडकता, जे आहे ते, आहे तसे पाहणे -- हीच असावी पहिली पायरी ! उत्तम !

बऱ्याच वर्षांपूर्वीचा साहित्य संघातला एक संवाद आठवला -- दामू केंकरे यांना नाटक बाद वाटले की अशा व्यावसायिक नाटकाचा निर्माता खुश होई -- त्याच्या आशा पल्लवित होत !

मला एक वेगळाच प्रश्न पडलाय -- आसारामला अटक झाली, तुरुंगात नेले तेव्हा पोलिसांनी त्याला दंडाला धरून नेले -- याउलट लालूला पोलिसांनी गाडीचे दार उघडून दिले -- त्याच्या अंगाला स्पर्शही केला नाही -- हे कसे ?

खरे तर ही सगळी ढोंगबाजी बंद केली पाहिजे ! काय साध्य होते ' ड्राय डे ' ने ?

तुमचे अभिनंदन आणि शुभेच्छा ! शिवाय कोल्हापूर हे खास माझ्या आत्मीयतेचे ठिकाण -- तिथे माझे बरेच मित्र-शत्रू आहेत ! ( मित्रच, पण आमचे नेहमीच वाद झडतात म्हणून ' शत्रू ' म्हटले ! ' प्रेमळ शत्रू ' म्हणू ! )

' चारित्र्य ' हा शब्द नैतिक अर्थानेच सामान्यतः वापरला जातो -- इथे तसे नाहीय -- तर काय ? -- हे स्पष्ट व्हावे --

यांतल्या ' चारित्र्य ' या शब्दाने आपण काय सुचवतोय, त्यावर सगळे आहे. ' समाजमान्य वर्तन ' असे म्हणायचे असेल तर अवघडच होईल !

' यस्टरडे ' नामक एक सिनेमा पाहिला होता -- त्यात एडसचा पेशंट होता -- पण तो चित्रपट माणसाच्या जगण्यावर होता. बीपीत तसे काही नाही. जे आहे त्याला, जे आहे त्यासाठी चांगले म्हणा -- असे होत नाही. विनोदी, गंमतशीर असोनसो त्याचा जगण्याशी संबंध येत नसेल आणि तरीही त्याला चांगले म्हणायचे असेल तर सगळेच मराठी चित्रपट ग्रेट म्हणावे ! खोटी बौद्धिके किंवा फालतू प्रबोधन यांसाठी सिनेमे काढायचे आपले लोक कधी थांबवणार, कोण जाणे !

जोपर्यंत अमुक एका विषयावर चित्रपट काढायचे खूळ डोक्यातून जात नाही, तोपर्यंत हे असेच चालणार. बरे, त्या विषयाला तरी हात घालायची समज आणि हिंमत आहे का ? तर तेही नाही.

बुद्धीचा वापर ही एक मर्यादित, वस्तुरूप प्रक्रिया असून तीतून हवे ते निष्कर्ष मिळू शकतात -- हे कळल्यावर बुद्धी फारशी विश्वासार्ह राहात नाही -- याला पर्याय म्हणून माणूस अज्ञाताकडे, गूढाकडे वा अंधश्रद्धांकडेही झुकू लागतो.

.यावर आणखीही -- ज्यांना जे सुचेल ते बोलावे -- मग त्यातून कलेचे प्रकार, उपप्रकार -- यांवरही बोलता येईल --

.कोणतीही कला म्हणजे प्रत्यक्ष जगण्यातले वस्तुद्रव्य घेऊन त्याच्या अर्थपूर्ण मांडणीतून जगण्याच्या आकलनाची प्रक्रिया व्यक्त करणे.

अमित, अचूक व्याख्या अशी होणे अवघड आहे. दुसरे कोण काय म्हणाले आहेत, तेही सोडून देऊ. पण इतरांच्या वाचनातून आणि स्वतःच्या विचारातून आपल्याला जमते तसे आपल्या भाषेत बोलू.

फाड फाड हिंदीत !

रसरसून समरस होणे चालू आहे ना, मग बास !

Champra Lekhan

champralekhan.com

-- आणि प्रत्यक्ष साहित्याचे मूल्यमापन होईल तेव्हा, होईल तसे, होवो, पण मराठीत सर्वप्रथम स्वतःचे समग्र लेखन वेबसाईटवर मोफत उपलब्ध करून देणारा लेखक म्हणून मला अमर मानावे लागेल ! www.champralekhan.com

-- जरूर पाहा --

यापुढची स्टेप म्हणजे, खरा खुनी कोण -- हे चुकीचे सांगणे !

राजकारणातून हाकलले गेल्यानंतर त्यांनी ' संस्कृती ' हे क्षेत्र पक्के धरून ठेवलेले आहे ! तिथले ते सत्ताधीश आहेत !

गिरीश, भूमिकेबाबत जो पोरकट अट्टहास चालू आहे, त्याचा बोजवारा कसा उडतो, ते दाखवण्यासाठीच तर ही पोस्ट आहे !

.इम्तियाझ, बायकोसमोर लवचिक भूमिका चांगली की ताठर भूमिका चांगली, यावर जगात खूप मतभेद आहेत -- वेळवखत पाहून ते ठरवावे लागते, असे मानणारा एक प्रभावी गट आहे !

" कोणतीही भूमिका एक थोतांड असते " -- ही भूमिका वगळून बोलता यायला पाहिजे !

लवचिक भूमिका चांगली की कट्टर भूमिका चांगली -- यावर भूमिका घेत बोलायचे !

मी एका सिनेमाचे नाव सांगेन -- ' चोरीचा मामला ' -- निळू फुले आणि ललिता पवार !

प्रायोगिक नाटकांमध्ये बऱ्याचदा उत्तम नटनट्या असतात पण त्या नावाजलेल्या नसतात.

प्रायोगिक नाटकाइतक्या कमी भांडवलात सादर होऊ शकणारी दुसरी सादरीकरण-कला नाही.

मराठी राज्यात मराठी कोपऱ्यात !

-- हा आता आलेला खुलासाही इथे देत आहे.

आणि ' प्रतिभावंत ' काही फक्त साहित्याच्या क्षेत्रातच असतात, असे काही नाही. इतरही खूप क्षेत्रांत निरनिराळ्या लोकांची मान्यता असलेले अनेक प्रतिभावंत भारतात आहेत. एक तर अशांना, अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या बाबतीत, वेगळ्या सवलती दिल्या गेलेल्या नाहीत आणि दुसरे म्हणजे अनेक मतभेदांवर आधारित असणारी अभिव्यक्ती असू शकणाऱ्या इतक्या लोकांच्या भावना समजून घेण्याची पद्धत पाडली तर नक्कीच ती लोकशाहीच्या नरडीचा घोट घेईल !

सारांश -- लोकशाही मूल्यांची आणि भारतीय घटनेची चाड ठेवून जबाबदारीने बोलायची बांधिलकी इथल्या सर्व नागरिकांवर आहे -- तेंडुलकर आणि अनंतमूर्ती त्याला अपवाद असू शकत नाहीत -- त्यांच्या भावना समजून घेण्याची कौतुके त्यांचे भक्त करोत -- इतरांना ते बंधन नाही !

या विषयाच्या बाबतीतलाच असलेला आजच्या ( २३-०९-१३ चा ) ' लोकसत्ते ' तला अग्रलेख पाहावा. आपल्या या चर्चेतले बरेच मुद्दे त्यातही आहेत. शक्य झाल्यास कुणी एखाद्याने त्याची लिंक इथे द्यावी.

मी थोडासा मराठी समीक्षेतही मधून मधून काही लेखन करत असल्याने, चित्रपट न पाहता त्यावर बोलायचा अधिकार मला आहे. पण मी तो वापरणार नाही. मी या चर्चेवर बोलायची सवलत घेतो. जगभरचे शिक्षणतज्ञ म्हणतात की मातृभाषेतूनच शिक्षण होणे चांगले / महत्त्वाचे असते. हे समजा पटले तरी त्याचा स्वतःच्या मुलांच्या बाबतीत अंगीकार करायचा धोका कोण पत्करणार ? तसेच इतर अनेक बाबतींत होत असणार. आदर्श मूल्ये, जी काळाच्या रेट्यात गळून पडली आहेत, त्यांबाबत गळे काढून उपयोग नाही. या परिस्थितीत संघर्ष, हिंसा वाढतही असेल वा जगणे अधिकाधिक सडत चालले आहे, असेही वाटू शकेल, पण यावर वैचारिक, बौद्धिक तोडगा कसा निघणार ?

मुरलीजी जे म्हणताहेत, तसे घडेल का, याबद्दल मला खूप शंका आहे -- याचे कारण मोठमोठे हितसंबंध असणार, हे आहे -- मानापमान क्या बडी चीज है ! -- समजा खरेच मोदी झाले पंप्र तर हे सगळे मंत्री होतील -- अपमान हजम करो और मंत्री बन जाओ ! आणि आहे या परिस्थितीतही असणारच ना काही नफातोटा !

" इसे मार दिया जाय या छोड दिया जाय " हे प्रत्येकाबद्दल सोपेपणाने कळलेच पाहिजे -- ही भूमिकावाल्यांची बाळबोध अपेक्षा असते !

.मोदी पंप्र झाले तरी जगाचे पंप्र थोडेच होणार आहेत ? ते फक्त भारताचेच पंप्र होणार ! मला ही अमूंनी केलेली दुरुस्ती फारशी अर्थपूर्ण वाटत नाही.

An unfazed Mr Ananthamurty told NDTV at his Bangalore residence today, "I stand by my sentence with a modification: I don't want to live in a world where Modi is Prime Minister." आता ते वाक्य असे दुरुस्त केले आहे, अशी बातमी आहे.

इथली जनता परिपक्व आहे, हे सगळ्यांनी जेव्हा जेव्हा ते निवडून आले तेव्हा तेव्हा मान्य केलेले आहे !

.वेगळ्या मतांचेही बुद्धिवंत असतात ना ! सगळ्यांनाच बहुमताचा आदर करावा लागतो ! असा, सगळ्यात जादा बुद्धिवंत कोण हे शोधता येत नाहीय, अजून तरी !

लोकशाही याचा अर्थ, बहुमताचा निर्णय माझ्या विरोधी गेला तरी मी त्याचा आदर करणे.

श्रीरंजन, तू म्हणतोस ते सगळे प्रश्न न्यायप्रक्रियेचे आहेत आणि ते सगळे इथल्या पद्धतीने जेवढे नीट चालू शकतील तेवढे चाललेले दिसते -- उद्या प्रत्येक प्रसिद्ध होणाऱ्या घोटाळ्याबद्दल मी कसा न्याय वा मत देणार ? हे जनरल सिस्टिमबद्दल होते, म्हणून बोललो -- तरीही घडलेले मोदींबाबतचे माझे मत दिलेलेच आहे --

मी न्यायाधीश थोडाच आहे ? प्रत्येकाचे काय करावे हे सांगायला ? ज्यांना लोकशाही मान्य नाही असे दिसेल, ज्यांची लोकांना भीती वाटेल त्यांना पाडतील लोक -- मोदी पंप्र होणार नाहीत, होऊ नयेत, असेच मलाही वाटते !

करेक्ट ! मुरलीजींनी वर दिलेले सूत्र लोकप्रिय होत चाललेले आहे, हे मात्र नक्की --

अपना अपना देखनेका जरिया है । -- वैचारिक संभाषणातून अंतिम सत्य वगैरे असे काही सापडत नसतेच --

विरोधी मत मांडल्यामुळे नव्हे -- एक माणूस एक मत, या पद्धतीच्याच विरोधात ते बोलताहेत --

नाही -- जेव्हा इथल्या परिनिरीक्षण मंडळाने मान्यता दिलेले नाटक असेल तर ते दुसऱ्या कुणीही बंद पाडू नये -- आता असे मंडळ असावे का, या विषयावर माझे मत वेगळे असेल --

जो या मताधिकार व्यवस्थेचाच अधिक्षेप करतो आहे -- तर त्याला कशाला हवाय मताधिकार ?

मी हे माझी बाजू शोधण्यासाठी बोलत नाहीय --

अहो, जेव्हा एखादी सत्ता जाचक होते तेव्हाच्या गोष्टी वेगळ्या -- इथल्या प्रक्रियेतून होऊ द्या ना बहुमताने -- नाही तर सिस्टिम बदलायला हवी -- त्यासाठी पुन्हा बहुमत हवे -- याला ॲब्सर्डिटी म्हटलेलेही लोकांना हवेतले वाटते !

मोदींचे काय व्हायचे ते निवडणुकीत होईल -- हा आमचा, इथल्या जनतेचा अपमान आहे, असे मला वाटते.

एरवी विचारस्वातंत्र्याच्या गप्पा मारणारे लोक भारतीय जनतेचे विचारस्वातंत्र्य क्षुद्र का लेखतात ?

मी मोदींच्या बाजूचा मुळीच नाही -- पण इथे बहुमताचा निर्णयच चालणार --

कुठलीही सिस्टिम सदोषच असते -- पण आपली त्यातल्या त्यात बरी म्हणून स्वीकारलेली आहे ना ?

तेंडुलकरांच्या भावना, अनंतमूर्तींच्या भावना आणि मोदींच्या भावना हे सगळे इथल्या नागरिकांनी नुसते समजून घेत बसावे ?

शेवटी, एखाद्या देशाचा, तिथल्या जनतेचा असा अपमान करणे, मग तो कुणीही असो, लोकांनी चालवून घ्यावे ?

This is insulting Indians ! If Modi is elected by usual voting process in our democracy, what is the problem ? This fellow does not believe in democracy. He is one person and he has a right of one vote only like other Indians !

May be, ' you are ' Anantmurti, but we are Indians ! Far greater than you !

समजा यांच्यासारख्याच मताचे आणखी काही कोटी लोक आहेत तर तशा परिस्थितीत या ( त्यांच्या मते ) रद्दड देशात ते त्यांना दुःखे भोगायला सोडून जाणार ? आणि मोदी पंप्र होणार ते लोकशाही पद्धतीनेच होतील ना ? मग यांना लोकशाही मान्य आहे की नाही ? मोदी हा प्रश्नच वेगळा -- हे सज्जन हुकुमशाही फॅसिस्ट वृत्तीचे तर नाहीत ?

जसे एखाद्या कंपनीला कायदेशीर अस्तित्व येण्यासाठी काही कागदपत्रे, मान्यता लागतात त्याप्रमाणे एखाद्या नव्या धर्माला कायदेशीर मान्यता मिळण्याची काय पद्धत आहे ? आणि आताच्या एका तरी धर्माने ती पार पाडली आहे का ? अलिकडे निघालेला शिवधर्म मान्यताप्राप्त आहे का ? हे सगळे विचारायचे कारण म्हणजे, मला असे खरोखरच सुचवावेसे वाटते की आपण एक वेगळा धर्म काढू या -- लागल्यास त्या नव्या धर्मात आपण प्रवेश केल्याचे प्रतिज्ञापत्र करून नोटरीकडे नोंदवून देऊ या -- हे जमू शकेल का ?

वा ! महान माणूस ! तुकाराम-ज्ञानेश्वरांना संगणक वापरता येतो का, आरबीआय चे गव्हर्नर होता येईल का, हे प्रश्न, अशा व्यक्तींपुढे नगण्य आहेत !

अवधूत, काहीजणांची व्यायाम करण्यात शक्ती वाया जाते म्हणून तब्येत सुधारत नाही !

हे म्हणजे मुलांना खलास करणे आहे. आणि समजा हे कळले तरी यातून आपल्या मुलांना मोकळे करायचे स्वातंत्र्य भीतीमुळे घेतले जात नाही.

धन्यवाद, मनोज ! आणि प्रशांत, कणकवलीच्या प्रयोगाला मीही आलो होतो -- प्रयोगानंतर, तिथल्या प्रथेप्रमाणे, प्रेक्षकांशी चर्चाही झाली होती. सादरकर्त्यांनी, कलावंतांनी ' आपण यांच्यासमोर काही सादर केलेच पाहिजे ' अशी इच्छा बाळगावी, असा जाणकार, उत्तम प्रेक्षकवर्ग !

'पोचलेले ' चा अर्थ आला ना लक्षात ?

कोणतेही गणित, तर्कशास्त्र, सदसदविवेकबुद्धी, साधकबाधकता आणि तारतम्य -- हे सगळे रद्द करणे, हीच तर प्रेमाची सुरुवात !

अरे, प्रेम म्हणजे गणित विसरणे ! गणित आणि प्रेम एकत्र नाही राहू शकत !

सोपे आहे -- दोस्तीची स्टेप वगळून टाक -- प्रेमानेच सुरुवात कर ! ( मग काय होईल ते होईल ! )

या पोस्टपुरते, अभ्यासू, विचारवंत, विद्वान अशा लोकांना ' महान ' धरलेले आहे.

चांगली सुभाषिते निवडून त्यांतलीही निवडक घरात लावून ठेवली तर जमून जाईल ?

sweetheart, beloved and darling -- हे तिन्ही शब्द प्रियकर आणि प्रेयसी या दोन्ही व्यक्तींना चालतात, असे दिसते.

बहुत हुई चर्चा -- आता मला जे सापडले आहे ते सांगतो -- ( याचा शेवट, अर्थातच आशुतोष पोतदार वा सचिन केतकर करतील ) -- प्रियकर व प्रेयसी या दोघांनाही sweetheart, beloved, darling -- असे शब्द दिसतात -- अर्थात योग्य व्यक्तींनी कन्फर्म करावे --

गिरीश, लव्हरचा अर्थ नीट बघ --

धनंजय, प्रेमाच्या विषयावर तरी असे वैतागू नका --

एवढे जिवाभावाचे, महत्त्वाचे शब्द !

.एक लक्षात घ्या -- जिथे मी गोंधळतो तिथे दुनिया गोंधळलेली असते !

मुरलीजी, माझ्याकडे ' Advanced Learner's English Dictionary ' आहे.

मला सापडलेय त्याप्रमाणे ' लव्हर्स ' म्हणजे ज्यांचे लैंगिक संबंध आहेत पण लग्न झालेले नाही -- ते --
फिआन्से, फिआन्सी म्हणजे साखरपुडा झालेले --

येऊ देत अजून -- यावर अंतिम अधिकारवाणी म्हणून आपण Ashutosh Potdar And Sachin Ketkar यांना आपण पाचारण करू शकतो --

होय अरुणजी, खरे आहे -- पण गॉसिपला आपल्याला तेच लागते ! आता विषय निघालाच आहे तर गॉसिपला मराठीत गावगप्पा म्हणावे की कुचाळक्या म्हणावे, तेही सांगा --

येत्या ' ललित ' च्या नाटक विशेषांकात माझा, दोन नव्या नाटककारांवर लेख आहे -- तो वाचा -- अंक न मिळाल्यास मी लेख पाठवून देईन --

सुनीलजी, निरनिराळे नाते संबंध म्हणू -- मोठ्या प्रमाणावर व्यक्तिगत संबंध हे सामाजिक ठरतात -- पण माझ्या आकलनात व्यक्तिगत आणि सामाजिक हे द्वंद्व मला खोटे दिसते --

मी नीती आणि न्याय या मूल्यांची टक्कर, असाही विषय घेतो -- स्थिर कल्पना प्रत्यक्ष जगण्यात खऱ्या उतरत नाहीत, असे मला दिसते --

नुसती सर्वसामान्यांची लफडी कुलंगडी देणारे, त्यांवर चर्चा करणारे, असे एखादे साप्ताहिक काढले तर चालेल का ?

की असे छापून आल्यामुळे नटनट्यांची जाहिरात होते म्हणून ते खुश होतात आणि सामान्यांचे असे नावानिशी आले तर ते लोक मातीत जाण्याचा धोका असतो, हे लक्षात घेऊन, माध्यमे त्यांच्यावर दया दाखवतात ?

मधाळ दिसण्यासाठी काही बुवा कोणते उपाय करतात ते मला माहीत नाही पण बरेचसे बुवा क्रूरही दिसतात. आज सकाळी सह्याद्रि वाहिनीवर गुजरातेतले एक बुवा दडपून लोकांच्या रोजच्या जगण्यातल्या आणि नातेसंबंधांच्या प्रश्नांवर सल्ले देताना दिसले. पारंपरिक परिभाषा वापरून ते सगळ्यांना दडपत होते. भरपूर भक्तगण होते. आवाज नुसता सौम्य ठेवून माणूस मधाळ होत नाही.

अतिरेक्याचे किंवा धर्मवेड्याचे कळणे जसे असते तसेच हे असते. जगण्याला असंख्य शक्यता असतात हे त्यांना दिसेनासे होत गेलेले असते. प्रोग्रामिंग अधिकाधिक पक्के होत जाणे म्हणजे जगण्याच्या प्रवाहाविरुद्ध मन तयार होणे. बाकी सगळे झूट, पोरकट वाटणे. या प्रक्रियेत मनाची लवचिकता, दुसऱ्याचे ऐकून घेण्याची वृत्तीच नष्ट होत जाते. मनाचा दगड होत जातो. क्रौर्य येते. हे सगळे मिळून चेहरा उग्र होतो.

.

आणि धनंजय, मी म्हणतोय तेच सत्य, असे मला वाटत नसते -- पण स्टेटसकर्त्याला ते तसे वाटते आहे, हे तीव्रतेने दिसत असेल तर लोकशाही संपतेच ना तिथे ! जिथे सरळ एक प्रकारचे फतवेच दिसतात, तिथे काय बोलणार?

आपण काही बोललो तर समोरची व्यक्ती अद्वातद्वा नाच करेल किंवा व्यक्तिगत शिव्यांची लाखोली वाहील, असे वाटले तर ते टाळले जाते --

फ्रेंडस हा इथला शब्द आहे आणि मित्र-मैत्रिणी इतके म्हणावे लागत नाही.

' मला सगळे कळते ' असा उग्र भाव चेहऱ्यावर असणे इथल्या लोकांना फारसे आवडत नाही. नम्रपणामुळे असेल किंवा आपल्याला सगळे कळते -- असे शक्यच नसते -- या जाणिवेमुळे असेल किंवा खरोखरच काहीच कळत नसल्यामुळेही असेल -- काँग्रेसवाल्यांच्या चेहऱ्यांवर असा भाव नसतो -- त्यामुळे इथे निवडून येण्याची शक्यता नेहमीच त्यांना जास्त असते ! यशाचे हे रहस्य पुरोगामी आणि प्रतिगामी दोघांनाही कळलेले नाही !

दुसऱ्यांना क्षुद्र लेखले की आपोआप आपण शहाणे असल्याचे सिद्ध होते ! ' मला सगळे कळते ' हा भाव आपल्या चेहऱ्यावर आणि मनात स्थिरावतो !

धर्मकीर्ती सुमंत या आपल्या नव्या ताकदवर नाटककाराचे ' पाणी ' हे नाटक वाचा -- यावर चांगला प्रकाश पाडणारे नाटक आहे.

अशी एक सोपी व्याख्या चालेल का बघा -- जुने अन्याय नष्ट करण्याचा प्रयत्न करत, त्याच वेळी नवे अन्याय तयार होताहेत -- याकडे दुर्लक्ष करणारा -- तो पुरोगामी !

तुकाराम म्हणतो त्याप्रमाणे ' एकविध मन ' हा जर देव असेल तर हे आस्तिक आणि नास्तिक सारखेच धरावे लागतात -- दोघेही विदीर्ण मनाने बुद्धीचाच वापर करत असतात !

this is regardless of the external circumstances. --- हे तुमचे वाक्य महत्त्वाचे वाटते -- परिस्थितीचे परिणाम म्हणून फक्त आपण जगतो असा निष्कर्ष काढून जगणे, हे शोधच थांबवेल. अनुभव, परिस्थिती आणि स्वतःची मनोकायिक रचना -- हे सगळे मिळून परिस्थितीच असते.

.

आपलेच उदाहरण घ्यायचे झाले तर, ज्या समाजात जातीवाद, धर्मवाद, भाषावाद, विचारसरणीवाद हिंसक होत चाललेले आहेत, हजार तऱ्हांचे भ्रष्टाचार, अन्याय, छळ आहेत तो समाज छान, निकोप आहे असे म्हणून त्याच्याशी जुळवून घेण्यासाठी, आहे तेच आदर्श आहे, असे समजणाऱ्यांसाठी हे वाक्य आहे.

गौतम बुद्धानंतर -- एवढे प्रचंड आणि मौल्यवान काम !

हल्ली तुम्ही पाण्यात फार खेळताना दिसता -- संध्याकाळी यावर उपाय करत चला !

मिलिंद, अरे, कुठे काही जास्तीच्या बातम्या, काही लेख असे जे थोडे जास्तीचे सटरफटर मटेरियल असते त्यावरून नजर फिरवण्यात थोडा जास्त वेळ जातो ! शेवटी राहायचेय आपल्याला या जगात, या भीतीपोटी तरी ते पाहावेच लागते !

ये तो बहुतही ब्यूटिफुल ! पण मध्यंतरी एका चर्चेत असे आले होते की, का म्हणून स्त्रीने पुरुषाला सुंदर दिसावे ? मी म्हटले की, हा प्रश्न जर स्त्रीवादातून येत असेल तर, हा स्त्रीवाद मला निसर्गवादाच्या विरुद्ध जाणारा वाटतोय ! यात खरी काय परिस्थिती आहे ? स्त्रीवादाप्रमाणे, सुंदर दिसणे हा खरेच स्त्रीचा अपमान समजला जातो का ? ( त्या वेळी ती चर्चा तिथेच अर्धवट राहिली होती -- या प्रश्नाचा उलगडा झाला नव्हता -- )

तुम्ही देता ती चित्रे / छायाचित्रे ही खास आमच्यासाठी निवडून आणलेली असतात ! त्यातले एक तर मी काही महिने माझ्या पीसी स्क्रीनवर ठेवले होते ! धन्यवाद !

माझे काम काय आहे, ते समजून मी ते करतो आहे, असे मला वाटते -- पुढाकार घेणे, हे आपले काम आहे, असे ज्याला समजेल, तो ते करेल --

मला एक गंमत वाटते -- आपण लोकशाही मानतो पण विचार व्यक्त करणे ही कृती मानत नाही ! सगळ्यांनी कार्यकर्ते व्हायचे ? म्हणजे काय ?

.नरेंद्रजी, असत्य नाकारायचीच तयारी नसल्यावर सत्य कुठले ? पळवाटाच हव्या आहेत -- हे बोलून उपयोग कितपत होईल ? समजा, नाही होणार -- पण या उत्सवांचा आणि धर्माचा काही संबंध नाही, हे बोलत राहण्याचे अनेक फायदे आहेत -- विचार करा --

माझेही वडील शिक्षक होते -- काही पोरे मला येताना बघून हातातली सिगरेट टाकून द्यायची ! मला फार गिल्टी वाटायचे ! शेवटी मी एकदा विचारलेच त्यांना की तुम्ही माझ्याबद्दल आदर बाळगताय की मी सांगेन सरांना असे तुम्हाला वाटतेय -- शिक्षकाचा मुलगा असणे, हे असे तापदायक असते -- आपण वेगळे पडतो --

मनःपूर्वक शुभेच्छा ! तुम्ही अभ्यासपूर्वक लिहिलेले नाटक, महत्त्वाचा विषय आणि यात माझा एक मित्र आणि मी नोकरी करतानाचा सहकारी श्रीकांत सागर काम करतो आहे -- या तिन्ही कारणांसाठी मी हे नाटक नक्की बघेन !

विद्याधर, छान होईल ! बरेच लोक त्या नाटकाबद्दल विचारतही असतात !

ज्यांना ईमानदारीत करायचेच आहे हे सगळे त्यांच्यासाठी सोपी पण अर्थसमृद्ध पूजा -- प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी ' ओम नमोजी आद्या ' ही ज्ञानेश्वरीची पहिली ओवी २१ वेळा म्हणावी -- नंतर साधीशी सुंदर पूजा करून दासबोधातले गणेशस्तवन वाचावे -- बास ! बाकीचे तुम्हाला माहितीच आहे ! ( मी असले काहीच करत नाही, हा भाग वेगळा ! )

केतकीला माझ्या भरपूर शुभेच्छा कळावा ! माझ्या एका नाटकाची नायिका होती ती !

एक दोन तीन चार
वाजवू सारे बारा पार
गोंगाटाचा महिमा अपार
गणपतीचा जयजयकार ! -- मी महाराष्ट्राचा एक प्रख्यात नाटककार, एक हितचिंतक या नात्याने, माझ्या मराठी बांधवांना, ही घोषणा शपथपूर्वक सादर समर्पण करत आहे !

' स्वछळ ' नामक एक मानसिक विकृती असते, असे वाचनात आले होते -- मानसशास्त्राच्या अभ्यासकांनी जरा यावर प्रकाश टाकावा आणि ही समोर दिसणारी तीच एक सामूहिक विकृती आहे का, तेही सांगावे.

ओशोंनी belief and faith यांत फरक केला आहे. बिलीफ ही बौद्धिक क्रिया असते आणि फेथ ही बौद्धिक क्रिया नसते.

त्याच प्रश्नावर पिसत बसणे हे बुद्धीचे कामच नव्हे तर ती तिची सवय असते. अनेकदा यामुळे माणूस मानसिक आणि परिणामतः शारीरिक गाळात जातो. सश्रद्ध माणूस असल्या चक्रात अडकत नाही. याचा त्याला खूप मोठा फायदा होतो. पुण्यातले प्रख्यात डॉ सरदेसाईही श्रद्धेचे हे महत्त्व ओळखतात. त्यामुळे श्रद्धेबद्दल उपरोधिक बोलावे का, हाच आधी एक महत्त्वाचा प्रश्न आहे !

इथे पळवाटा काढणारे फार भारी लोक आहेत -- ते ओळी न तोडता सलग उताऱ्यांतून फुकटच कविता लिहीत राहतील -- आणि कविता कशाला म्हणावे, हे ठरवणे तर लोक अशक्यच करतील !

अहो, तिकडे फिरकणारसुद्धा नाही, असे वचन देणारेही अनेक आहेत, पण ' घटस्फोट ' असा शब्द जरी उच्चारला तरी गच्चीवरून उडी मारणाऱ्या आहेत हो त्यांच्या बायका !

मला एक सांगा -- देशपांडे-जोशी-कुलकर्णी अप्पा यांची संगत नको रे बाप्पा -- यात जे आहेत ते कुलकर्णी की कुळकर्णी ? मी तर कन्फर्म्ड आहे !

पण कृपया आता नावाला फारसे जागू नका, फार कमी वाघ राहिलेत भारतात !

कशावरून मी ह्या देशाचा नागरिक आहे ? … कशावरून मी " भारतीय " आहे ? . " पासपोर्ट, जन्मदाखला किंवा आधार कार्ड हे भारतीय असल्याचा पुरावा म्हणून ग्राह्य धरता येत नाही असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई हायकोर्टाने दिला आहे. भारतीय कायद्याप्रमाणे भारतात २६ जानेवारी १९५० व त्यानंतर जन्मलेला व्यक्ती हा जन्मतःच भारतीय आहे. मात्र १ जुलै १९८७ नंतर जन्मलेली व्यक्ती हा जन्मापासून भारतीय ठरत नाही. त्याच्या आई किंवा वडिलांपैकी एकाकडे भारताचे नागरिकत्व असणे गरजेचे आहे. तर ३ डिसेंबर २००४ नंतर जन्मलेली व्यक्तीचे आई-वडिल दोघांकडेही भारताचे नागरिकत्व असणे गरजेचे आहे. " >
" माझं कुतूहल > मग बोगस मतदान करणारे, बांगलादेशी / परदेशी ह्या देशाचे नागरिक कसे ? " *
मला तर वाटते की काही कोटी लोक तरी असे निघतील की ज्यांच्याकडे पुरावे उपलब्ध नाहीत -- ते कुठले लोक समजायचे ? -- एक उपाय दिसतो -- २०१३ पर्यंतचे सगळे रेग्युलराईज करावे आणि त्याबाबतची प्रमाणपत्रे सरपंच किंवा नगरसेवक यांनी द्यावीत. ते मात्र ग्राह्य पुरावे धरावे !

जळमटे काढणे म्हणजे एका सजीव जिवंत जीवाचे घर आणि उपजीविकेचे साधन उध्वस्त करणे नाही का? - मनेकाताईंना विचारायला हवे !! (छायाचित्र : एप्रिल 2008 / पाचगणी)
एक कोळ्याचे जाळे आहे, त्यात एक किडा अडकलेला आहे, कोळी त्याला खाणार आहे -- तुम्ही किड्याला सोडवलेत तर कोळी उपासमारीने मरेल -- आणि जगू द्या कोळ्याला म्हणाल तर किडा मरेल -- काय कराल ?

ही इथे जी ष्टोरी आलेली आहे तिच्याहून ' हिंमतवाला ' चांगला असणे शक्यच नाही ! बेष्ट ! मला असे सुचतेय की काही हिंदी आणि काही मराठी सिनेमांच्या फुल ष्टोऱ्या अशाच पद्धतीने तुम्ही लिहाव्यात ! त्यांचा संग्रह धमाल बेष्ट होईल ! काही बोलायचे शिल्लकच राहणार नाही !

साखर खाल्ल्यामुळे मधुमेह होतो, असे काही नाही -- असे एका लेखात लिहिले होते. तज्ञांनी खुलासा करावा. ( आता तज्ज्ञ असे लिहिण्याची गरज नाही -- तज्ञ चालतो -- बरोबर ना ? )

हे माझे वैयक्तिक मत आहे की निवडणूक प्रचारात व्यक्तिगत आरोप करू नयेत.

अभिव्यक्तीच्या लयीत कविता वाचायची आपल्याला सवय असते -- गणेशची कविता तशी नाही वाचायची -- एक ओळ वाचायची, तिची वलये समजून घ्यायची, मग पुढची ओळ स्वतंत्रपणे वाचायची आणि तसेच करायचे -- प्रत्येक ओळ जणू स्वतंत्र कविता ! गणेशची एक कविता म्हणजे तो एक कवितासंग्रहच असतो -- वाचण्याची पद्धत गवसली तरच गणेशची कविता गवसू शकते --

थोडक्यात म्हणजे -- " तुम्ही विवेकी झालात तर माझेच म्हणणे तुम्हाला पटेल आणि तुम्ही तेच तुमचे म्हणून म्हणू लागाल !"

' विवेक ' म्हणजे काय, हे न सांगता, या शब्दाचा वापर फार होत राहतो !

फक्त कम्युनिस्ट म्हणजे विवेकी म्हणावे तर महाराष्ट्राने विवेक पूर्ण गमावलेला आहे, असे म्हणावे लागेल !

आणि विवेकी म्हणजे या तिन्हींतले कोणतेही उत्तर ठरू शकेल, की फक्त अमुकच म्हणजेच विवेकी ?

.

धर्म टिकणे आणि हिंदू वा मुस्लिम वा बौद्ध वा ख्रिश्चन असे वेगवेगळे धर्म टिकणे यांत असलेला फरक पाहिला जावा.

त्यातही, चांगल्या लोकांच्या रक्षणासाठी आणि वाईट लोकांच्या निर्दालनासाठी येणार -- असेही म्हटलेले आहे ! तोही आला तर कदाचित हेच म्हणेल -- पुरावे द्या, कारवाई करू, मग तो कुणीही असो ! चांगले आणि वाईट हा फरक तो तरी कोणत्या निकषांवर करणार आहे ?

सगळे संत तर म्हणतात, तुम्ही स्मरण करा फक्त ! बास ! त्या क्षणी हजर होणार !

.तुमचे सगळे नीट करून द्यायला मी येत जाईन -- असे म्हणणे, हे लोकांना बेजबाबदार आणि आळशी करणे आहे !

अंधश्रद्धा ही मानसिक असते तर श्रद्धा ही मनाच्या मर्यादा जाणणारी असते !

घरात असलात तरीही तुमची शांतता भंग करणे हाच धर्म ! माझे मन रमतेय ना, मग होई ना का तुम्हाला त्रास ! -- असले हे धार्मिक !

दुसरी व्यक्ती कशी बघते यापेक्षा आपण स्वतः कोणत्याही प्रतिमेत बद्ध होऊन जगणे -- हा अधिक मूलभूत प्रश्न वाटतो -- Whether it is possible to live without an image ? -- यावर जेकेंचे बरेच आहे -- --

माणूस घरात नवरा असतो, बाप असतो आणि बाहेर साहेब असतो, बिल्डर असतो -- या त्याच्या निरनिराळ्या प्रतिमा असतात -- ही पोस्ट या प्रतिमांच्या जगण्यालाच आव्हान देणारी वाटतेय -- त्यामुळे चर्चा व्हावीच --

' मद्रास कॅफे ' बद्दलही दोन टोकांची मते दिसताहेत ! ( बोंबलायला, मी सवडीने डीव्हीडी आणून बघणार आहे -- काय आहे त्यात एवढेच तर पाहायचेय मला -- ) --

बातम्या तर अशा आहेत की तिकीटविक्रीचा विक्रम होण्याच्या बेतात आहे --

मग, चांगले लोक राजकारणात आले पाहिजेत, असे म्हणतात, ते कुठले ?

मेलोड्रामा हा ड्रामाचा भाग आहे. एक नट आणि एक प्रेक्षक असला की ड्रामा होऊ शकतो, असे ग्रोटोस्की म्हणाला. सादरीकरणयोग्य असलेले, सवयीबाहेरचे काही म्हणजे ड्रामा, असे थोडक्यात वाटते.

माझ्या मते काही कीर्तनकार / प्रवचनकार हे अत्यंत स्वस्तातले समुपदेशक असू शकतात !

साधे डॉक्टरही खूप कमी आहेत -- मानसोपचार तज्ञ पुरेसे मिळतील ? त्यांची फी सगळ्यांना परवडेल ?

राजकीय वा वैचारिक नेते, गुंड, आर्थिक हितसंबंध मोठ्या प्रमाणावर हाताळणारे, वगैरेंना थोड्याफार धोक्यात जगावे लागते -- पण केवळ स्त्री आहे म्हणून धोक्यात जगावे लागणे ! भयानक आहेच ! पण कितीही विचार केला तरी नेमका उपाय सुचत नाही -- असंख्य मुद्यांनी युक्त आहे हा प्रश्न ! दिङ्मूढ करणारा !

दुसऱ्यांच्या छळावर, हालअपेष्टा, दुःखे यांवर माझे जग इंटरेस्टिंग व्हावे आणि मला नाटके लिहिता यावीत, असे मला मुळीच वाटत नाही.

या सगळ्या कोलाहलातले वेगळे आणि महत्त्वाचे स्टेटस ! ट्रॅफिकचे सगळे नियम पाळायचे -- या एकाच गोष्टीपासून सुरुवात केली तरी छान होईल !

निसर्गात, मानवी बुद्धीला पटणारी समता अस्तित्वात नाही -- हे एक कारण दिसतेय, पण नीट पाहावे लागेल --

' विवेक ' या शब्दाचा अमुक एक अर्थ निश्चित करणे, या फलश्रुतीकडे ही चर्चा जाणार नाही. या विषयाची अनेक परिमाणे समोर येणे, हा विषय आपल्या जगण्याशी किती निकटपणे संबंधित आहे, हे दिसणे -- हे महत्त्वाचे. अनेक फ्रेंडसकडून अनेक मूलभूत प्रश्न उपस्थित झालेले आहेत -- तो सगळा आहे या विषयाचा आवाका. एखादा निष्कर्ष काढण्यापेक्षा ही प्रक्रिया अधिक निकोप. यातून आकलनाची प्रक्रिया ज्याचीत्याची चालू राहू शकते.

दुष्टांचे निर्दालन म्हणजे विवेक आणि दुष्ट कोण, हे मला समजते -- असे म्हणणारा प्रत्येकजण विवेकी ?

विचारवंत आणि कार्यकर्ते या विषयावर डॉ. तेलतुंबडे यांना विचार मांडावेसे वाटणे, आजचा नाटककार धर्मकीर्ती सुमंत याला याच विषयावर ' पाणी ' हे नाटक लिहावेसे वाटणे -- हे पाहिले तर टाळाटाळी करावी किंवा दडपादडपी करून चर्चा दबवून टाकावी, असा हा विषय नाही.

विचारात वेळ जाणे म्हणजे अपव्यय किंवा निरर्थकपणा, म्हणावे का ? समजा एक माणूस सारखा पळतोय किंवा व्यायाम करतोय किंवा रस्ते साफ करतोय -- तर तो अधिक कृतीशील, असे असते का ? राजकारणातले, अर्थकारणातले विचारवंत असे सारखे कुठेतरी पळत होते का ? माणूस जे काही वागत असेल ते त्याच्या त्याच्या आकलनातून वागत असेल तर ते विचाराशिवाय म्हणजे कसे असावे ?

माणसाचे मन हे अलगतावादीच असते -- ते अपरिहार्यपणे तसे असणारच -- हे मान्य करायचे आणि संकुचितपणा नसणे म्हणजे विवेक, असे म्हणायचे -- याची सांगड कशी बसू शकेल ?

माणसाची कृती विवेकाधारित असावी -- असे म्हणताना, या शब्दाला एकच सर्वमान्य अर्थ आहे, असे गृहीत धरले जाते !

रवींद्र, तसे नाही. विवेक या शब्दाचे शेकडो, हजारो अर्थ दिसायला लागले तर ' काय अर्थ आहे, हा शब्द वापरण्यात ? ' -- असा प्रश्न कुणालाही पडणारच. प्रॉब्लेम हा होतोय की विवेक हे एक अमर्याद तत्त्व असून ते फक्त काही मर्यादित लोकांकडेच असते -- असले हे काहीतरी होतेय !

ज्यांना हा काथ्याकूट वाटतो त्यांनी, पार्टीगणिक वा माणसागणिक ' विवेक ' या शब्दाचा अर्थ वेगवेगळा असतो की एकच असतो, हे सांगून टाकावे म्हणजे हा ' काथ्याकूट ' आवरता घेता येईल.

मुळात हा काथ्याकूट नाही. हिंदुत्ववादी आणि समाजवादी या दोघांनाही ' विवेक ' महत्त्वाचा वाटत असेल तर हे दोन वेगवेगळे विवेक असण्याची शक्यता आहे. फ्रेंडसमध्ये हे समजून घ्यायचा प्रयत्न करणे म्हणजे बुद्धिभेद करणे ? या चर्चेत भाग घेणारे वा ही चर्चा वाचणारे कुणीही, इतके नाजुक / कमकुवत आहेत असे मी मुळीच गृहीत धरणार नाही की कुणी त्यांचा बुद्धिभेद करू शकेल. असे समजून घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे देशाचे वाटोळे करणे ? असे मत असणे, हे विवेकात बसते ?

.खरे तर एका नव्या स्टेटसचा विषय आहे, पण इथेच देतो -- विवेकी मनुष्य नेहमीच विवेकी असतो की कभी हाँ कभी ना ?

' विवेक ' हा शब्द विशेषतः समाजवादीच वापरतात असे एक माझे इंप्रेशन होऊन बसलेले आहे -- त्यामुळे, जरा क्लॅरिटीच्या शोधात !

.

अ ची सुबुद्धी वेगळी आणि ब ची वेगळी ! त्यामुळे, सुबुद्धी म्हटल्याने फारसा फरक पडणार नाही !

आणीबाणीच्या काळात एन डी पाटील यांचे एक भाषण ऐकले होते. विषय, मुद्दे, विचार यांच्या विस्तीर्ण जलाशयात सहज पोहणे ! ( मला ' एक शून्य बाजीराव ' या नाटकातल्या माधव वाटव्यांच्या अप्रतिम संवादफेकीची आठवण झाली होती ! ) ते म्हणाले, अहो, हे कुटुंबनियोजनवाले सगळीकडेच तंबू टाकत असल्याने सगळे आठवडे-बाजार बंद पडलेत ! सापडला की धरतातच ! -- खूप झाल्या शस्त्रक्रिया -- सगळयांचे अहवालही गेलेत -- आता तुम्ही विचाराल की मग भारतात एकूण किती झाल्या शस्त्रक्रिया ? त्याचा आकडा का नाही सांगत ? -- आतली गोष्ट अशी आहे की त्यात एक मोठी अडचण आलीय ! त्या सगळ्या अहवालांची बेरीज केल्यावर येणारा आकडा भारताच्या लोकसंख्येपेक्षा जास्त येतोय !

' ढोलताशे ' तला एक अत्युत्तम अभिनेता विद्याधर जोशी हा इथे आपल्या मित्रपरिवारात असून, त्याने लाईक केले आहे ! धन्यवाद, विद्याधर !

' बुद्धिप्रामाण्यवादी ' आशावादी असूच शकत नाही -- हे माझे ' पवित्र ' आकलन आहे !

.त्यांच्या विचारस्वातंत्र्याबाबतची एक छोटी आठवण -- त्या नाशिक संमेलनात मी केलेल्या भाषणाचा माझा लेख तयार होता. त्या लेखातले विचार त्यांच्या विचारांशी जुळणारे मुळीच नव्हते. तरीही पुढच्याच आठवड्याच्या ' साधना ' मध्ये तो लेख एक शब्दही न बदलता / वगळता छापला गेला होता.

अभिनय, कल्याण निर्मित ए, आपण चहा घ्यायचा? लेखक: चं. प्र. देशपांडे आदित्य प्रतिष्ठान, अभिनय कट्टा, ठाणे रविवार दि. २५ ऑगस्ट २०१३ सायं. ६.३० वा. प्रवेश विनामूल्य.
कुठे आहे हा अभिनय कट्टा ? पत्ता काय आहे ?

भाषा ही आर्थिक ताकद कशी बनते, ते मलाही कळलेले नाही. समजा भारत पुढेमागे फक्त इंग्लिश भाषाच वापरू लागला तर त्या वेळी त्याची आर्थिक ताकद शून्य असणार का ?

ते उत्तर वगैरे वाचले. समजा यावर एखाद्या समीक्षकाचा लवाद नेमला तर काय होईल ? समीक्षक हा न्यायाधीश नसला तरी तो न्यायाधीशासारखा वागू शकतो, हे लक्षात घेतले, तर निकाल असा असेल -- " सर्व बाजू व मुद्दे लक्षात घेऊन पुढीलप्रमाणे निकाल देण्यात येत आहे -- काही जणांच्या मते ती कविता आहे आणि काही जणांच्या मते ती कविता नाही. साहित्याच्या क्षेत्रात अशी खूप मतमतांतरे असू शकतात, असे अनेकांचे मत आहे. शिवाय या सदर कवितेत विद्यार्थ्यांना उपयोगी पडणारा एक चांगला सल्लाही आहे, ही बाबही अधोरेखित होते आहे. त्यामुळे, सदर केस डिसमिस केली जात आहे. पाठ्यपुस्तकात कोणताही बदल करण्याची गरज दिसून आलेली नाही. तरीही, यापुढे असे तंटे उद्भवू नयेत, याची

शिक्षणमंडळाने काळजी घ्यावी. " घड्याळात पाच ठोके पडतात, लवादसाहेब उठून निघून जातात. मंडळाचे अध्यक्ष सस्मित मुद्रेने आवटे यांच्याकडे येऊन म्हणतात, " चला, आवटे, आता भांडण संपले. चला चहा घेऊ ! " आवटे विचारात पडतात --

" पुरावे द्या -- मग कारवाई करूच -- मग तो माणूस कितीही मोठा, कुणीही असो ! " -- यात काय विशेष आहे ? पुरावे दिल्यावर कारवाई करावीच लागते !

घोटाळ्यांचे स्वरूप, त्यांच्या अंमलात आणण्याच्या पद्धती, ते उघडकीला कसे आले, तपासणी कोण करणार, नवीन काय सापडले वगैरे काहींना कंटाळवाणे वाटू शकते.

Sushama Datar -- इथे बऱ्याच मैत्रिणींचे फोटो येतात -- खरे तर त्या प्रत्येक फोटोवर प्रतिक्रिया देणे शक्य असते, सुचतेही तसे प्रत्येक वेळी वेगवेगळे -- पण का नाही देत कॉमेंटस याचे मला वाटणारे कारण देताना जरा खुशी पसरवणारे लिहीत गेलो -- म्हटले तर जरा नैसर्गिक अंगाने -- पण तुमची कॉमेंट वाचल्यावर, मला नवाच वाटणारा एक मुद्दा समोर आला आहे -- स्त्रीने सुंदर दिसणे हे स्त्रीवादी भूमिकेच्या विरुद्ध समजले जाते का ? मग स्त्रीवादी भूमिका ही निसर्गाच्या विरुद्ध आहे की काय, हे नीट कळेनासे झाले आहे. यावर जरा बोला ना --

मुळात ' स्त्री ' किंवा ' मैत्रीण ' हा शब्द समोर आला तरी ' सुंदर ' या शब्दापासूनच मेंदू सुरू होतो !

मी एका खेड्यात ब्रँचमॅनेजर असताना आमच्या ऑफीसमध्ये फोन नसल्याने, वरच्या ऑफीसशी बोलायचे असेल तर पोस्टात जाऊन ट्रंक कॉल लावावा लागायचा. पोस्टमास्तरांनी मला सांगूनच ठेवले होते की दुपारच्या अमुक ते तमुक या वेळेत तुम्ही येऊच नका -- तुमचा कॉल लागणारच नाही -- आकड्यांसाठी सगळे फील्डिंग फिक्स असते !

खरे तर त्याला आक्रमक बोलायचे असते पण तो संरक्षक पवित्रा घेतो -- संबंधित माणूस, यावर आपण चिडावे की समजुतदारपणा दाखवावा, या गोंधळात पडावा, हा हेतू !

मराठीत, जगणे समजून घेण्याचे, एवढे महाप्रचंड काम गेल्या काही वर्षांत झालेले नाही ! त्यांच्या नावात ' महराज ' आल्यामुळे घोळ होत असावा, असे वाटते. त्यांना सरळ कै. मारुती शिवरामपंत कांबळी म्हणावे. अजब क्लॅरिटी !!!

सरदेशमुखांची आणि माझी प्रत्यक्ष तीनचारदा भेट झाली होती. " काय चंद्रकांत, काय लिहितोयस सध्या ? " - असे ते विचारत. त्यांचा वावर, बोलणे यांत एक प्रगाढतेचे वलय जाणवत असे.

नितीन, डांगोरा आणि उच्छाद अजून वाचायच्या आहेत. सरदेशमुख ग्रेटच होते. त्यांचे ' प्रदेश साकल्याचा ' हे समीक्षेतले पुस्तकही महत्त्वाचे आहे.

अमर, प्रारब्ध वगैरे शब्द न वापरता आपण ' जनुकनकाशा ' हा शब्द वापरू.

.फ्रेंडस हा शब्द मी सारखा वापरतो कारण मित्र-मैत्रिणी असे लिहायला जास्त टाईप करावे लागते ! आणि मित्र का आधी ? मैत्रिणी-मित्र असे का नाही -- हाही प्रश्न त्यात टळतो --

श्रीरंजन, १६ ऑगस्टपासून आपण इथले फ्रेंडस, इथे फेसबुकवरच, सतीश तांबे यांची मुलाखत घेणार आहोत -- त्या संवादात अवश्य सहभागी हो.

काटा रुते कुणाला ..... शान्ता शेळके --------------------------------------- काटा रुते कुणाला आक्रंदतात कोणी मज फूलही रुतावे हा दैवयोग आहे ! सांगू कशी कुणाला कळ आतल्या जिवाची ? चिरदाह वेदनेचा मज श्राप हाच आहे ! काही करु पहातो रुजतो अनर्थ तेथे माझे अबोलणेही विपरीत होत आहे ! हा स्नेह, वंचना की, काहीच आकळेना आयुष्य ओघळोनी मी रिक्तहस्त आहे !
शांताबाई, खानोलकर आणि मी एकदा चर्नी रोडपासून दादरच्या शांताबाईंच्या घरापर्यंत टॅक्सीने गेलो होतो आणि त्यांच्या घरीही आम्ही थोडा वेळ होतो. स्वतःच्या आणि इतरांच्याही कवितांचे आणि गीतांचे त्यांचे पाठांतर पाहून अचंबित झालो होतो ! तो अचंबा अजून तसाच आहे !

कोणतेही श्रम वाया गेले तर वाईट वाटणारच. हे तर जरा स्पेशल श्रम. ते ठीक आहे. आश्चर्य याचे वाटते की इतकी वर्षे लिहिणाऱ्या माणसाने लेखनाची एक प्रत ( मूळ प्रतच ) सुरक्षित ठेवण्याची काळजी घेऊ नये ? आजच्या जगात तर याला बावळटपणाच म्हणावे लागेल !

एखाद्या स्त्रीला लग्नानंतर दोन वर्षांनी दिवस गेले असले आणि बाळंत व्हायला अजून काही महिने अवकाश असला तरी म्हणतात, " गडबड दिसतेय ! "

.नेमके वाक्य आणि ते कुठे वाचले ते आठवत नव्हते -- आता सापडले -- आज दि १० ऑगस्ट चा लोकसत्तेचा अग्रलेख -- त्यातले वाक्य -- " त्याचबरोबर वृत्तपत्रांचे वस्तूकरण करून त्यातील सत्त्वालाच हात घालीत काही माध्यम उद्योजकांनी आता वाचकांनाच सांगण्यास सुरुवात केली आहे की तुम्हाला काहीही गंभीर वाचायला आवडत नाही. मुळात तुम्हाला वाचायलाच आवडत नाही. म्हणून आता तुम्ही फक्त आम्ही छापतो त्या जाहिराती पाहा आणि त्यालाच बातमी असे म्हणा. अशा सुमार तंत्राची कास ज्यांनी धरली, ती वृत्तपत्रे सर्वाधिक विक्रीचे आकडे मिरवत उडू लागली. " ( या संदर्भात आपल्या विनोदी लेखकांनी केलेला प्रचारही आठवावा. )

" काय गडबड ? " -- हे कोल्हापुरातही असते -- माणूस निवांत असला तरी त्याला असे विचारतात !

मी दुसऱ्यांना ग्लॅमर देणारा असलो तर न्यूनगंडातून जगणे नाही का होणार ते ?

महत्त्वाकांक्षेत जगत खूप वेळ आणि शक्ती त्यातच लावणे आणि त्याच्या ताणात जगणे आणि तसे न जगता, सहज जगणे -- याचा इथे संबंध असावा, असे दिसते.

ग्रहांना काय, माणसांना काय, आपण काही तरी करतोय असा भ्रम हवा असतो !

दारू पिताना माणूस सर्वशक्तिमान होतो ! कोल्हापूरला मित्रांबरोबर पिताना बारमधल्या एका अनोळखी माणसाशी -- आमची पूर्ण पिऊन झालेली असताना -- मी पैज लावली होती -- त्यापुढे त्याच्याहून जास्त पिण्याबद्दल ! माझ्या मित्रांना तो म्हणाला ' कोण आहे हा वेडा ? मरेल फुकट ! ' अरे बाप रे ! माणसे मुळात चांगली असल्यामुळे बचावलो ! म्हणून मी आता मित्रांना जरा सावध करतो, इतकेच !

शुभकाळ सर्व दिशा !

आणि त्या काळात मी सतत आजारी असणारा होतो ! मीरा पार्ल्याच्या असल्यामुळे विषय निघाला -- असो --

पेंढारकर तसे म्हणाले कारण मी त्या वेळी सगळ्या तुकड्यांत पहिला होतो ! -- आणि पार्ले टिळकच्या सगळ्या तुकड्यांत पहिला !

.

एक गंमत म्हणून सांगतो -- मा सी पेंढारकर होते मुख्याध्यापक -- मी ५ वीत असताना माझे वडील तिथे रुजू झाले -- गुण काही खास नव्हते -- पेंढारकर सर माझ्या वडिलांना म्हणाले होते की तुमचा मुलगा म्हणून देतोय प्रवेश -- मी ९ वीत असताना माझे वडील मालाडच्या एका शाळेत मुख्याध्यापक झाले -- त्यांचे तत्त्व असे की मी जर लोकांना विश्वास देणार आहे की ही शाळा चांगली आहे तर आधी माझा मुलगा या शाळेत हवा -- म्हणून पार्ले मधून काढून मी तिथे गेलो -- तेव्हा तेच पेंढारकर म्हणाले की तुम्ही आमचे रत्न घेऊन चाललात -- मी रत्नबित्न काही नाहीय -- तो भाग वेगळा --

मीरा, खरे आहे ! ( जाता जाता -- मी ५ वी ते ९ वी पार्ले टिळकमध्ये होतो. )

माणसाला आता माहीत आहे -- काहीच धोका नाही -- मजेत बसा इथे ! निसर्गाला शिस्त आहे म्हणून चाललेयत लाड !

हा चित्रपट बघणारच -- आज सकाळी त्याचा दिग्दर्शक आनंद गांधी याची मुलाखत पाहिली --

जीएंच्या ; तुती ' मधली आई मुलाला म्हणते, " मोठा झाल्यावर तू आणखी काही हो, न हो, पण दगड मात्र होच ! "

ती कादंबरी होणार आहे -- पूर्ण झाली की लगेच तुम्हाला सांगण्यात येईल !

" नेहमीचे जगण्याचे प्रश्न ज्याप्रमाणे आम्हास साहित्यात निकराचे वाटतात, त्याचप्रमाणे साहित्यासंबंधीचे प्रश्नही आम्हास टीकेत तातडीचे वाटतात " --- ' टीकास्वयंवर ' -- प्रस्तावना.

माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' चा हिंदी अनुवाद झाला होता, तो प्रकाशित झालेला नाही. त्याच नाटकाचा कानडीत अनुवाद प्रकासित झालेला आहे. याव्यतिरिक्त शून्य !

आशयाच्या पाण्यात न उतरणारा समीक्षक, असे काही असू शकते का हो ? -- आहे ! आमच्या मराठीत असा एक थोर समीक्षक आहे !

नेमाड्यांनी अनेक मौल्यवान लेखकांवर दुगाण्या झाडत स्वतः त्यांच्याहून मोठे असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे -- आता नेमाड्यांनी अथवा त्यांच्या भक्तांनी अशा योग्य वा अयोग्य प्रकारांबाबत फार टची होऊ नये ! आणि समीक्षेच्या

अंगाने एखाद्याने त्यांच्याबाबत काही टिप्पणी केली की, मग तुम्ही लिहून दाखवा की कादंबरी, असे म्हणण्यात काही अर्थ नाही.

पूर्ण जगाचे दिवाळे वाजू शकते का हो ?

सतत ऑक्युपाईड ( व्यस्त ) असणे हे मनाचे एक लक्षणच आहे.

जाहीरनाम्यात सांगितलेल्या विचारांना धरून पक्ष वागू शकत नाहीत, जाहीरनाम्यांचा तौलनिक अभ्यास करून मतदान होत नाही, टक्केवारी, ब्लॅकमेलिंग यांचा विचार उघड नसतो, राजकीय डावपेचांत दुसऱ्याचे विचार दबवून टाकणेही असते, गुंड, आक्रमक आणि पैसेवाले यांच्याकडे निवडून येण्याची क्षमता जास्त असते, माध्यमे विकली जातात, न्यायप्रक्रिया वेळखाऊ असते, वगैरे ! तरीही लोकशाहीच बरी, इतकेच !

हे सगळे, कृपया, कुठेतरी एकत्र ठेवा -- हवे तेव्हा सगळे पाहता यावे -- माझे बालपण कर्नाटकात गेले आणि नंतर संबंध तुटल्याने कानडी विसरले गेले --

मित्रवर्य जयंत जोशी यांना कोणत्याही विषयावरची आठवणारी प्रस्तुत आणि अर्थपूर्ण माहिती पाहून थक्क झालो. डॉ. श्रीनिवास देशपांडे यांना ही लांबवर चक्कर मारून येण्याची कल्पना सुचली आणि काही मिनिटांतच आम्ही निघालोसुद्धा ! डॉक्टरांमुळे कालची संध्याकाळ ही ' सुनहरी शाम ' झाली ! कार्स, एच आय व्ही, सात्र -- सगळे विषय ! एका कादंबरीतला एक माणूस भलतेच डाव खेळून ( त्यात एका माणसाच्या मृत्यूलाही कारणीभूत होऊन ) त्याचे ईप्सित घडवून आणतो -- हा थोडा वेळ चर्चेचा विषयच झाला -- त्याने जे केले ते योग्य होते का, आपण त्या जागी असतो तर काय केले असते -- अशीही चर्चा रंगली ! आणि सोबत सतत महाप्रचंड हिरवागार निसर्ग ! दिल खुश हुआ !

And people to whom nothing has ever happened
Cannot understand the unimportance of events.
--- हे त्या नाटकातूनच घेतले डायरेक्ट !

' इन्सिग्निफिकन्स ऑफ इव्हेंटस ' या शब्दसमुच्चयासाठी हे स्टेटस दिलेले आहे.

लंडनमधल्या माझ्या एका मैत्रिणीला मी या स्टेटसमधल्या वाक्याच्या नेमकेपणाबद्दल विचारले आहे, ती कळवू शकली तर, अर्थातच, इथे देईन. नेमके कोणत्या नाटकातले आहे हे वाक्य ?

रॉबर्ट बोल्टचे ' मॅन फॉर ऑल सीझन्स ' हेही याच थीमवर होते. म्हणजे बेकेटच्या.

सॉरी, तुम्ही बेकेट या नाटककाराच्या ' वेटिंग फॉर गोदो ' चा अनुवाद केलेला आहे.

.डहाकेजी, तुम्हीच तर त्यावर काम केलेले आहे, तुम्हीच जमवा !

.वरील स्टेटसमध्ये कुणी बिनचूकपणा आणून दिला तर आभारी होईन.

.' पाऊस ' या विषयाला मराठीतल्या स्वप्नील लोकांनी फार चढवून ठेवलेले आहे -- ते तो पडला तरी कविता करतात आणि पडला नाही तरी करतात ! त्यामुळे, पावसाळ्यात हा त्रास गृहीतच धरावा लागेल !

छाया, याच्यावरचे उत्तर फक्त उद्वेगानेच देता येईल -- स्त्रिया जोवर चाकू-सुरे-पिस्तुले यांचा वापर करत नाहीत, स्मगलिंग करत नाहीत, मादक द्रव्यांच्या धंद्यात येत नाहीत, ब्लॅकमेलिंग, धमक्या यांचा वापर करत नाहीत, मोठमोठे भ्रष्टाचार करत नाहीत, तोवर समानता अशक्य आहे ! विचार योग्य आहेत, याला शून्य किंमत आहे !

मी काही बीजप्रश्न विचारून ठेवतो, असे स्टेटसमध्येच म्हटले होते, त्याचा लाभ मी घेतला आहे ! पण सगळ्यांनीच असे केले तर गोंधळ होईल, असे वाटते. आता यापुढील सगळे १६ ऑगस्ट ! कुणीही रागावणार नाही, असे गृहीत धरतो --

सतीश तांबे यांना विचारण्याचे प्रश्न

१. कथा या वाङ्मयप्रकाराची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती वाटतात ? कादंबरीच्या तुलनेत पाने कमी असणे, यामुळे या फॉर्मला मूल्यात्मकतेच्या बाबतीत मर्यादा येतात, असे वाटते का ?
२. तुमची कथा, पात्रांचा न्यायनिवाडा करणारी, एखाद्या तत्त्वाचा पाठपुरावा करणारी, आदर्श सुचवणारी, परिवर्तनाची दिशा सांगणारी, वा एखाद्या सुखाचा वा दुःखाचा अनुभव वाचकात परावर्तित करणारी अशी नसते – या वाक्याबद्दल तुम्ही काय म्हणाल ?

३. तुमची कथा नुसती घटनाक्रमाची नसते, तिच्यातले असंख्य बारकावे हे लिहितालिहिताच सुचणे शक्य आहे, असे वाटते. कथा लिहायला सुरुवात करताना तुमच्यासमोर काय असते ? एखादा बिंदू, सूत्र, स्वभावविशेष वा इतर काही ? कथेच्या विकासाची प्रक्रिया कशी असते ?

४. माणसाचे जगणे हे घर्षणात्मक, दुःखदायक व दुःखकारक – असेच असणार, असे तुम्हाला वाटते का ? तुम्ही दुःखांची विविध रूपे तुमच्या कथांतून चितारता, असे म्हणणे योग्य होईल का ?

५. निव्वळ करमणूक करण्यासाठी तुम्ही लिहीत नाही, हे स्पष्ट आहे – मग कोणत्या प्रेरणा असतात ?

६. माणसाच्या जगण्यातले जे प्राथमिक महत्त्वाचे प्रश्न आहेत – उदा गरिबी, विषमता, अन्याय – यांच्याकडे तुमचे लक्षच नाही, असा आरोप तुमच्या लेखनावर केला तर काय म्हणाल ?

७. वैचारिक वा कलेच्या क्षेत्रातले असे तुमच्यावर काही प्रभाव आहेत का ? असल्यास कोणते ?

व्हेरी गुड ! तोवर विचाराला खाद्य म्हणून माझे प्रश्न देऊन ठेवू का ?

प्रतिभाचे म्हणणे योग्य वाटते. १६ ऑगस्ट ही तारीख ठरवू. स्वतः सतीश तांबे त्या वेळी इथे वेळ देऊ शकणार आहेत का, हे कळावे. हे असे जर जमून येत असेल तर माझ्या डोक्यात असलेले काही प्रश्न मी विचारून ठेवेन.

सतीश तांबे यांना या उपक्रमासाठी सध्या वेळ देता येईल ना, हे पाहून सुरू करू.

आणि स्वेच्छेने उत्सुक सर्व फ्रेंडस .

.थोडा मधेच जरा एक छोटा प्रश्न ' भलावण ' की ' भलामण ' ? शब्दकोशात ' भलावण ' दिलेले आहे -- कितीही लक्षात ठेवावे म्हटले तरी नेहमीच विसरले जाणे, असे या शब्दाबाबत घडते. की दोन्ही चालते ?

आपल्या नेहमीच्या जगण्या / वागण्यात कुणाला एखादा सदगुण दिसला तर आनंद होतोच पण त्याचबरोबर, आपण या सदगुणाशिवायही अनेकदा वागत असतो, याची जाणीवही होते !

हिंदू, मुसलमान, कम्युनिस्ट, भाषास्मितावादी यांतला कोण चांगला वा बरोबर -- असे सांगता येत नाही.

कशाची डिमार्केशन लाईन ? जी उपयुक्त माहिती असते म्हणजे शास्त्र, तंत्रज्ञान किंवा मी राहतो कुठे, माझ्या घरी कोण कोण आहे, वगैरे -- त्यामुळे काहीही प्रॉब्लेम होत नाही. मनाची, अनुभवाचे सुखदुःखात रूपांतर करणारी, मानापमानांचे व्रण

तयार करणारी, जखमा करणारी / करून घेणारी -- अशी जी जी कृती असते ती ती गोंधळ, अस्मिता, हिंसा निर्माण करते. ती कृती अलगतेमुळेच येते.

माणसाच्या मनाचे प्रोग्रामिंग / कंडिशनिंग हे निर्जीव बाबींमध्ये येईल -- त्यामुळेच माणूस स्वतःच्या अलगतेला महत्त्व देऊ लागतो आणि अस्मितावादी होतो. अमुक कंडिशनिंग चांगले आणि तमुक वाईट, असे सांगता येणार नाही.

प्रेमात पडणे प्रत्येकाच्या हातात असते हो पण समोरची पार्टी तयार हवी ना ?

" ही केस आमच्या हद्दीतली नाही -- देवाकडेच मांडा तुमचं गाऱ्हाणं. "

दिलेले ज्ञान घेण्याची कुवत असणे महत्त्वाचेच आहे -- कुवत कमीजास्त असणे ही नियती म्हणावी काय ?

नुसती वृद्धी नको, क्लॅरिटी हवी -- असे म्हणणारी माझ्यातली आच हीच गुरू !

ती लेडीज महिला आहे की जेंटस महिला, ही आधी खात्री करून घ्या --

आणि आपल्या जन्मापूर्वीही हजारो, लाखो गोष्टी घडत आल्या म्हणून आपण जन्मलो !

महात्मा गांधींना भारताच्या इतिहासात पाच पाने आणि कम्युनिस्ट पक्षाला पन्नास पाने, याबद्दलही बोंब झाली होती !

समजा आपल्या लोकांनी सगळीकडे मार खाल्ला असला, लढाया हरले असले तर ते मुलांना शिकवून त्यांची उभरती मने निराश करून टाकायची का ?

पूर्वी ५० वर्षांपूर्वीच्या घटनांना इतिहास म्हणायचे ठरलेले होते -- आता ती मर्यादा आत आणून ३० वर्षांपूर्वीच्या घटनांना इतिहास म्हणायचे ठरलेले आहे ! काळ बदलला, काळाचा स्पीड वाढला !

" तुम्हाला तज्ञ म्हणून नेमलेय, तज्ञ म्हणून काम करा ", " तुम्ही लाख तज्ञ आहात हो, पण पुस्तक सगळ्यांना आपले वाटले पाहिजे, हे बघा ", " जातवार आणि प्रांतवार प्रतिनिधित्व द्या शक्य तो ", " लोकशाहीच्या तत्त्वांना धरून काम करा ", " आधीच्या पाठ्यपुस्तकात हे अमुक कसे घेतले होते मग ? ", " अवघड नको, सोपे बघा, मुले आवडीने आली पाहिजेत

शाळेत ! " -- असे असंख्य प्रकार असू शकतील. नुसतेच योग्य-अयोग्य, दर्जा, मूल्यात्मकता यांचबरोबर समावेशकताही असेल. लोकशाही आहे -- फक्त साहित्यश्रेष्ठत्व पाहूनच पाठ्यपुस्तके निघावीत का, हाही वादाचा मुद्दा होऊ शकतो.

मनाच्या एकात्मतेचा क्षण, अस्तित्वात आल्यास, नेहमी विभक्त असणाऱ्या मनाचा विषय होऊ शकणार नाही.

Readers of literary fiction are more creative and exercise better judgment, claim scientists
dailymail.co.uk
अति-महत्त्वाचे संशोधन ! तुमची परवानगी गृहीत धरून शेयर करतोय !

मी तीन वर्षे कोल्हापुरात होतो, तो काळ आठवला !

सध्या मी सतीश तांब्यांचे ' माझी लाडकी पुतना मावशी ' वाचतो आहे --

आणखी काही साध्या आणि पिळदार कविता ः--

इतकं रागावून निघून जायचं असेल
तर मित्रा एक पक्कं लक्षात ठेव ...
आर्जव करणं हे माझ्या रक्तात नाही
आणि आपण विभक्त होऊच शकत नाही.

आणि ही एक ः--

तुझ्या आठवणीने मन
दाटून दाटून येणं ...
मोकळं होण्यासाठी पुन्हा
तुझ्यावरच बरसणं ...

आणि ही एक हिंदी ः--

मेरी खामोशी की आवाज भी आती है तुम तक ?
अब इस से जादा बेआवाज होना नामुमकिन है

इतका विचार, विश्लेषण काहीही लागणार नाही -- फक्त ' आपद्धर्म ' हा शब्द शिकून घ्यायचा !

एक व्याख्या - मनानेही एकनिष्ठ राहणे ( जे अशक्य आहे ! ) आणि दुसरी एकदम व्यवहारोपयोगी आणि अभेद्य व्याख्या हवी असेल तर -- बिगर-पातिव्रत्यता पकडली न जाणे !

आपली सुरुवात चुकवता येतच नाही आणि आपला शेवट माहीत होणे शक्यच नसते ! ( कारण शेवट माहीत व्हायला आपण असतच नाही. )

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते आणि स्त्री ही पुरुषाच्या मार्गातली धोंड असते ! दोन्ही सोयी आहेत ! हवे ते घ्या !

कुणाच्या पिसांवर कुणाचे तोरे --

टिकावे-संपावे हे मानसिक संघर्ष आहेत -- त्रासदायक आहेत -- ते नसलेल्या पूर्ण मनाने जगलेले क्षण म्हणजे मजेचे क्षण !

आता एकच शिल्लक आहे -- टेलिपथी सर्वांना येणे ! हवी तेवढीच स्टेशने स्वीकारण्याच्या सोयीसह !

मराठी नाटकात तेंडुलकरांनी डाल्डाचा डबा प्रथम स्टेजवर आणला !

यांतल्या चढत्या-उतरत्या भाजण्यांचा विचार तितकासा खरा वाटत नाही -- मादक वाटल्यावर सुंदर आहे की नाही, हा प्रश्न कुठे येतो ?

तुम्ही जे म्हणताय ते तुम्हाला खरेच पटत असेल तर मतभेद या पॉइंटवर चर्चा संपते -- आणि जीवनाच्या अशा एकेका भागाबद्दल बोलणे नक्कीच फसवे असते --

मान्य तत्त्वे खूप आहेत !

म्हणजे भ्रष्टाचार वाईट --हे सगळ्यांना मान्य !

माणूस शांततावादी झालाय का, हा आपला विषय आहे --

तुम्ही ज्या कृतींना अहिंसक म्हणताय त्या मनोरचनेनेच -- त्यांच्याच परिणामांतून मोठ्या हिंसा घडतात -- ते वेगवेगळे नाहीच --

इराक हे एक उत्तम वाढत चाललेले राष्ट्र होते -- बेचिराख झाले -- नुसत्या चांगल्या प्रगतीचा संबंधही येतो इथेच --

आत्महत्येला प्रवृत्त करणे -- हाही गुन्हाच ना -- खून केला नाही तरी --

आचारातही शांतता नाही -- आधी हे दिसल्याशिवाय पुढचा प्रश्न प्रस्तुतच होत नाही --

वाढणे, कमी होणे सोडूण दिले समजा तरी माणूस मूलतः त्याच हिंसक रचनेत जगतो आहे -- वस्तू, हुशारी, हत्यारे यांत अधिकाधिक गुणवत्तापूर्ण सुधारणा होत आहेत --

फक्त भोसकणे म्हणजेच हिंसा, असे नाही -- सामान्य माणसांचे आयुष्यही हजार प्रकारे हिंसाग्रस्तच आहे --

.

एखाद्या बलवान राष्ट्राला सारखे सगळ्यांना मारायची गरज नसते -- इतर राष्ट्रे आपोआप घाबरून राहतात --

त्या ' तयारी ' च्या संदर्भातच ठरणार ना सगळे ! युद्ध, वाटाघाटी, तडजोडी --

कॅन्सर असेल तर तो पाहण्याची टाळाटाळ करून उपयोग काय ?

जोपर्यंत आयसोलेशनने, अलगता मानणे आहे तोपर्यंत अहिंसक जगणे अशक्य ! आणि हुशारी आणि हत्यारे तर अधिकाधिक गुणवान होताहेतच !

हिंसेचे मोजमाप करायचे साधन कोणते ?

आभास, ते सगळे आपल्या सगळ्यांच्या मानसिक कृतींमुळे घडते -- नुसते कुणीतरी वेडे राष्ट्रप्रमुख ते घडवतात, असे समजणे, हा सोयीस्कर भ्रम आहे --

चार पैसे मिळाले की कुठल्या का वर्गातला माणूस असे ना, सुखाकडे पाय वळतातच --

यात वर्गीय काही नाही -- सगळेच -- या हिंसेतून मी आणि माझा समूह वाचलो पाहिजे -- हे कॉमन तत्त्व आहे --

माणसाच्या मनाने तयार केलेले, मनाच्या क्षेत्रात असणारे वास्तव --

.बाँबस, रासायनिक आणि जैविक हत्यारे, गुदमरून टाकणारी आर्थिक डावपेचांची हत्यारे तसेच लष्करी बळ वाढवण्यासाठी रोज नव्या शोधल्या जाणाऱ्या तांत्रिक करामती -- ही माणूस सुधारत चालल्याची, शांतताप्रेमी होत असल्याची लक्षणे आहेत ? माणसांचे रोजचे संबंधही असंख्य डावपेचांनी युक्त आहेत. हे सगळे दुर्लक्षून आशावादाचे, गुडीगुडी बोलत राहणे ही एक पारंपरिक पद्धत आहे.

माहोल फक्त बदलत आलाय -- एकमेकांना अपमानित करण्याचे, नष्ट करण्याचे, देशोधडीला लावण्याचे मार्ग आणि शस्त्रे फक्त बदलत आली आहेत -- माणूस तोच आहे. अस्मितांसाठी, आपल्या समूहांच्या फायद्यासाठी, सुखांसाठी क्रूर, हिंसक होणारा. आता तर एका माणसाने बाँब टाकला की शेकड्यांत, हजारांत, लाखांत माणसे मरू शकतात.

छे छे ! शौर्य आणि लढाऊ वृत्ती यांचे हे फालतू उदात्तीकरण आहे !

Sanjay Bhaskar Joshi -- तुमचा लेख वाचला -- तो विचारपूर्वक लिहिलेला आणि या लेखकाकडून रास्त अशी मास्टरपीसची अपेक्षा करणारा आहे -- हे पटले ! ( ' सत ना गत ' ही मला अजून वाचायची आहे ).

फर्स्ट क्लास ! याच निरर्थकतेकडे लक्ष जायची भीती असते !

माया योगियांची माउली । जेथील तेथे नेऊनि घाली । कृपाळूपणे नाथिली । आपण होय ।। -- ही मी चांगल्या कलेची परफेक्ट व्याख्या समजतो -- फक्त ' माया ' या शब्दा ऐवजी ' कला ' हा शब्द घ्यायचा ! नाही तरी कला म्हणजे मायाच की !

पुण्यातले प्रख्यात डॉ सरदेसाई म्हणतात की ८० % रोगांचा उगम मनात असतो !

आणि हो -- प्रश्नचिन्हे टाळून आणि पूर्णविराम वापरून आपल्याला चर्चा करता येईल का ?

अजिंक्य, त्याला एक दुसरी बाजूही आहे -- सगळे धर्म, विचारसरण्या, नीती-अनीतीच्या कल्पना, कचरा ठरत जातात, हे वास्तवही त्या तरुणांपुढे आहे --

JK said that integrity of mind is possible.

नाही बाबा, नो परीक्षा -- जगण्यातल्या घटनांचे मूल्यमापन कसे करायचे, इकडे जावी ही चर्चा --

राजकारणाच्या बातम्या म्हणजे बाह्य टरफले नुसती -- आत खरे काय चालले आहे, हे कळतच नाही --

कोल्हापुरात माणूस शांतपणे चालला असला तरी विचारतात -- काय गडबड ?

अशी श्रद्धा कुणाला असू शकते ? -- बुद्धिप्रामाण्यवाद्यांना ! आणि बुद्धिप्रामाण्यवाद हीही एक अंधश्रद्धाच असते ! ( आता कसे ते विचारू नका कारण यावर माझे बऱ्याच वेळा लिहून झालेले आहे. )

तुम्ही वेळेत स्टेशनवर पोचणाऱ्या असाल तर जनरली वेळेत येणाऱ्या गाडीचे बुकिंग करा -- तुम्हालाच उशीर होत असेल तर जनरली लेट येणारी गाडी बघा ! युअर चॉईस !

आपल्या मनाच्या ' काही ' घडामोडी मित्रमैत्रिणींशी बोलायला काहीच हरकत नाही -- एवढाच विचार -- ' सगळ्या ' घडामोडी तर कुटुंबियांशीही बोलल्या जात नाहीत -- त्याने काही बिघडतही नाही --

' कारण ' शेवटच्या ओळीतच दडलेले दिसतेय !

बरे, नवाच एखादा धर्म काढण्याबाबत आणि त्याला कायदेशीर मंजुरी मिळवण्याबाबत काय तरतुदी आहेत ?

नुसत्या भराभर प्रतिक्रियांच्या राजकारणाला कुणी परिपक्व राजकारण म्हणणार नाही -- वाट लागेल !

नुसत्याच स्वयंचलित प्रतिक्रियांचे स्वरूप पाहणे महत्त्वाचे आहे -- तसेच जगावे की काय ते जो तो पाहील --

राग आल्यावर न रागावणे, या कृतीचे स्वरूप ढोबळ- एकच असते, असे काही नाही --

माझ्या प्रतिक्रिया या माझ्या विशिष्ट, मर्यादित प्रोग्रामिंगमधून, माझ्या जनुकनकाशाच्या प्रभावाखाली आणि लाखो इतर प्रभाव घेऊन चालतात -- त्यांत सत्य वगैरे नसते -- त्या अर्धवटच असणार -- हे पाहणे चाललेय फक्त -- कुठल्याही लह्लूने कुठल्याही पंजूला, योग्य काय, जगणे म्हणजे काय, हे सांगायचा प्रश्नच नाही.

प्रत्येक प्रतिक्रिया समजा कोणत्या ना कोणत्या कारणानेच घडते -- त्या प्रतिक्रिया इथे स्टेटस बनतात -- मग ते कारण जगते की फेसबुक जगते की आपण जगतो ?

मूळ स्टेटसमध्येही उपरोध आहे पण तो कुणाकडे व्यक्तिगत रोखलेला नाही -- तो, मी धरून सर्वांसाठी असू शकतो !

ती बटणे तशी प्रेस केली तर काय होईल ते आधी सांगून ठेव -- नाही तर तुझ्या सांगण्यावरून मी जायचो करायला तसे आणि सगळा डेटाच जायचा उडून ! " मै कौन हूँ ? " विचारायची पाळी यायची !

अप्रतिम स्टेटस ! बुद्धिवादी, श्रद्धावादी, विचारवादी, विवेकवादी, आस्तिक, नास्तिक -- सगळे बोंबलायला विचाराच्याच क्षेत्रात फिरणारे ! या स्टेटसमध्ये जे आले आहे, त्याहून वेगळे काय शक्य आहे ?

स्वप्रतिमा ( self image ) पक्की आणि अतिमहत्त्वाची म्हणजे सर्वत्रच संवादाचा अभाव. हे असेच असणार, असे गृहीत धरून जे चालू इच्छितात त्यांचा हा प्रश्नच नाही --

संवदाची शक्यता म्हणजे मुलांचेच ऐकायचे, असे नव्हे -- संवाद व्हावा असे मुलांना वाटणे --

उदा आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय मैत्री वा विवाह नको -- असे मत असणे --

होय -- अज्ञाताचे भय, हा मुख्य भाग दिसतो --

.वेदनारहित मृत्यू असतो की नसतो ? मरणाचे भय ही एक मुख्यतः काल्पनिक गोष्ट आहे. वेदनेतून, त्रासातून सुटण्याची धडपड ही वेगळी गोष्ट आहे.

वेदना-यातनांचे भय आणि मरणाचे भय एकच समजावे का ?

करमणूक आणि उपयुक्तता सोडून काय असेल अशा कलेला अर्थ ?

अप्रत्यक्ष अनुभवामुळे समज वाढते ? मुळात अनुभवाने समज वाढते का ?

' ओपन मॅरेज ' नामक एक प्रकार वाचनात आला -- त्यात विवाहबाह्य संबंधही चालतात -- अट एकच -- बायकोचा बाह्य पार्टनर नवऱ्याच्या ओळखीतला नसावा -- तसेच नवऱ्याची बाह्य पार्टनर बायकोच्या ओळखीतली नसावी.

ते बरोबर आहे -- पण ज्याची खात्री पटवून देता वा घेता येऊच शकत नाही, त्या तत्त्वाचे करावे काय, असा प्रश्न आहे --

आज साफसफाई करत होतो. जुनी मासिके वगैरे काढून टाकू ह्या विचाराने. त्यात सत्यकथेचे काही जुने अंक निघाले . एखाददुसरा तर माझ्या जन्माच्याही आधीचा . मौजेच्या अभिरुचीच्या नावाने कितीही आगपाखड केली असली तरी अंक रद्दीत फेकायला जीव धजावेना . वानगीदाखल एका अंकाची अनुक्रमणिका देतो. माझे म्हणणे कळायला पुरेशी आहे ती ! भावनिकता खूप कमी असलेल्या माझ्या लेखनपद्धतीला विनायक पडवळने बळ दिले ! माझी ' इतिहास ' ही एकांकिका, जी फक्त वाचायला चांगली आहे, असे काहीजण म्हणत होते, ती त्याने रंगभूमीवर प्रचंड प्रभावी करून दाखवली !

विनायक पडवळ या माझ्या जिगरी दोस्ताच्या संपादनाखाली निघालेले ' भरतशास्त्र ' चे अंक खरोखरच संग्राह्य होते !

इतके बिनचूक मुद्रितशोधन ! दरमहा ! सतत !

डीएनए तपासणीचे चीनमध्ये पेव फुटले तेव्हा तिथले बरेच नवरे डोक्यांना हात लावून बसले होते -- अशी बातमी मी वाचलेली होती !

जिया खान गेली.... तिने आत्महत्या केली !

हा प्रश्न मनच विचारते आहे -- ' मन बाजूला ठेवून ' मनालाच काही करायचे आहे, असे तर नाही ना ?

आमचे जवळचे मित्र , प्रभाकर वाडेकर यांचे आज दुःख्खद निधन झाले. अंत्यसंस्कार 6.30 वाजता होणार आहेत.
अरे, काय झाले एकदम आपल्या या यंग मित्राला ? चिंटू अमर केला त्याने !

मी म्हटले, अहो, एखादी कविताही त्याच दर्जाची असू शकते -- तिला मात्र पाचपन्नासात भागवता, हे कसे काय ? तर उत्तर आले, कविता काय, ती कुणीही, कुठेही स्वस्तात छापू शकतो -- चित्र मात्र ' तेच ' असावे लागते ! कवीचे लोकांनी घ्यायचे काय विकत ?

It is exactly the other way round in H. G. wells' ' In The Country Of The Blind '

METAMODERNISM -- a continuous oscillation, a constant repositioning between attitudes and mindsets that are evocative of the modern and of the postmodern but are ultimately suggestive of another sensibility that is neither of them; one that negotiates between a yearning for universal truths and relativism, between a desire for sense and a doubt about the sense of it all, between hope and melancholy, sincerity and irony, knowingness and naivety, construction and deconstruction.[25]

The prefix 'meta' here refers not to some reflective stance or repeated rumination, but to Plato's metaxy, which intends a movement between opposite poles as well as beyond.[

नखरे खरे असले म्हणजे झाले !

ते मते मिळावीत म्हणून लोकांच्या फायद्याची कामे करतात, आम्ही तशीच कामे लोकांच्या हितासाठी करतो !

त्यांचे लांगूलचालन, आमचा आपद्धर्म !

हिंदीतल्या नटनट्यांना बऱ्याचदा हिंदी शब्द आठवत नाहीत -- आपल्यालाही मराठी शब्द आठवत नाहीत असे झाल्याशिवाय आपल्याला स्टारव्हॅल्यू कशी येणार, असे मराठी कलाकारांना वाटते, हे स्पष्ट आहे ! थोडक्यात, भिकारडी कॉपी मारतात !

कोणतीही फिक्स कल्पना द्वंद्वात्मकच असते -- ही तर माझी नेहमीची थीम --

कुणाच्याही मान्यतेची मानसिक याचना सोडता येणे, हाच मार्ग ! याचा अर्थ उद्धट व्हावे, असा मुळीच नाही.

' ए, आपण चहा घ्यायचा ? ' या माझ्या नाटकाचा उत्तम प्रयोग ' अभिनय ' या अभिजितच्या टीमकडून सादर केला जातो ! हे नाटक लिहिल्याचा भरपूर आनंद मला या टीममुळे मिळाला -- मिळत आहे ! हे सगळे माझे मित्र असल्याने ' धन्यवाद ' म्हणत नाही !

' अर्थ ' ही किरकोळ मानवी बुद्धीची गरज असेल -- विश्वभान हे ' निरर्थक ' च असू शकेल !

' आपुले मरण पाहिले म्या डोळा ' म्हणणारा तुकाराम समजून घेतला तर !

.प्रत्येकाला आपापल्या आकलनाप्रमाणे जगावे लागणार, हे समजून, फालतू प्रतिक्रिया कमी करता आल्या तर ? !

अशा मार्गाने माझा फारसा अभ्यास नाही पण वरील प्रतिपादन स्वच्छ विचाराचे आणि सखोल वाटले ! बुद्धाने सांगितलेला धर्म आणि आंबेडकरांनी दिलेला बौद्ध धर्म यांतल्या तुलनेकडे इथे लक्ष जायला हवे, असे वाटले.

विजयजी, एकच कावळा ओरडत होता ! तुम्ही म्हणता तसे इतर पक्षीबांधवांनी जमा होणे मीही अनेकदा पाहिले आहे. ती पद्धत फक्त सूर्योदयानंतर चालते, असे तर नसेल ? रात्री जागा सोडायलाच पक्षी घाबरत असतील का ?

जोशीजी, टिवल्याबावल्या आणि गंमतीजंमती करणारे कावळे ओळखू येतात -- हा वेगळा होता -- तुम्ही कविता कुणासाठी लिहीत होतात, ते तुमचे तुम्ही शोधून काढा -- ( पक्षी,प्राणी वा माणूस यांच्या वेदना तरी टिवल्याबावल्यांतून वगळाव्यात -- )
" मला आज सारखी कॉफी प्यावीशी वाटतीय -- मला आज सगळे निळेच आवडतेय -- मला आज समुद्रप्रवास करावासा वाटतोय -- मला आज दुःखात राहावेसे वाटतेय -- "

Human mind as we know it is complexity.

Ina, innumerable truths means no TRUTH !

.तसे तर आयुष्यही संपेल हो ! एका विशिष्ट मनःस्थितीची ही पोस्ट आहे --

जिवाची मुंबई करणारे कुठेही गेले तरी ती करतच असतात -- मुंबईत जीव मुठीत घेऊन सडके आयुष्य जगणारेच म्हणतात, " मुंबईबाहेर अजिबात करमतच नाही ! "

लाईफ-फिक्सिंग करता यायला हवे -- त्यासाठी कुणी कुणाला किती पैसे द्यावे लागतील ?

.प्यायच्या पाण्याचे जग उत्पादन करायची आमची योजना होती -- कंपनीचे नाव ' जग ' ठरले होते आणि जग ( पृथ्वी ) हे त्याचे बोधचिन्ह ठरले होते. त्याची जाहिरात अशी ठरली होती -- " जगात जग, एकच जग -- जग जग ! "

A person authorized to examine books, films, or other material and to remove or suppress what is considered morally, politically, or otherwise objectionable. -- या अर्थी सेन्सॉर हा शब्द वापरला आहे.

बुद्ध जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!
दुःखाचा शेवट होऊ शकतो, हे महान आश्वासन आपल्याला देणारी व्यक्ती !

प्रत्येक संघटनेला विचारवंत आणि कार्यकर्ते यांची गरज असते. त्या दोहोंत दरी असते. दोघांनाही वाटत असते, आपणच संघटना चालवतोय !

भावनांशी फ्लर्टिंग असणे हे कवितेचे अपरिहार्य लक्षण नाही. तसे फ्लर्टिंग असूही शकते. ते असल्याने वा नसल्याने कस कमीजास्त होत नाही. कस ही वेगळी गोष्ट आहे. फ्लर्टिंगच्या ऐवजी भावनात्मकता म्हणू, म्हणजे 'वाईट ' सूचकता टाळता येईल.

असा काही संबंध नसतो हे मांडण्यासाठीच मी ' कवितेतील अ-भाव ' हा लेख लिहिला होता.

मूळ अर्थ काहीही असो, काळाच्या ओघात आज त्या शब्दाचा अर्थ काय आहे किंवा एखादा विचारवंत तो कोणत्या अर्थाने वापरतो आहे, हे पाहणे महत्त्वाचे आहे. ' सौंदर्य ' हा शब्द जेके कोणत्या अर्थाने वापरताहेत ते वेगळे समजून घ्यावे लागते.

शब्दकोषात -- सुसंस्कृत, उच्च -- असे अर्थ दिलेले आहेत. कलेत उच्च म्हणजे तरी काय ? जगण्याबाबतची परिपक्वता व्यक्त करणारी, आपापल्या जगण्याचे भान वाढवणारी आणि यंत्रवत न जगता, जगणे समजून घेण्याची निकड देणारी कलाकृती.

समजा, ' मोरूची मावशी ' अजूनही लोकांना आवडते किंवा पु ल देशपांडे आणखी काही वर्षे आवडत राहतील – यांना ' अभिजात ' म्हणावे का ?

हा फोटो गिरीश पतकेचा भाऊ श्रीनिवास पतके याने काढलेला आहे.

होय, एकदा लंडनला गेलो होतो, तेव्हाचा फोटो आहे.

' आपल्याला हितावह वाटणाऱ्या ' -- यही तो है ! कुठाय बुद्धिप्रामाण्यवाद ?

तुम्ही काय, मी काय किंवा आणखी कुणी काय स्वतःच्या सात्त्विक संतापाचे प्रदर्शन करून काय उपयोग ? मग कुणाचा सात्त्विक संताप महत्त्वाचा, हे पॉवरवर ठरेल ! उदा महाराष्ट्रात समाजवादी, कम्युनिस्ट कुठे आहेत ?

वैज्ञानिक पद्धतीने सांगा -- समाजवादी की कम्युनिस्ट ?

आपण किती सत्यवान हे सगळ्यांनाच वाटते हो, पण मग हजारो सत्ये कशी ?

म्हणजे, एक तर सगळेच मान्य किंवा दुर्बुद्धी कोणती हे ठरवायचे अधिकार कुणीच कुणाला देणार नाही -- हे मान्य !

बुद्धिप्रामाण्यवाद्याला वाटते, जगात फार खोटेपणा आहे, त्यामुळे त्याला सात्त्विक संताप येतो ( बुद्धिप्रामाण्यवाद्यांना एकमेकांचेही सात्त्विक संताप येऊ शकतात ) पण त्याला हे कळत नाही की सर्वांनाच आपापले संताप हे सात्त्विक संतापच वाटत असतात ! आणि एकदा मनाचा आहे असा वापर मान्य केला की कुणाच्याच सात्त्विक संतापाला किंमत राहात नाही. तुम्ही बुद्धीने वागा, कुणी अस्मितेने वागेल, तुम्ही श्रेष्ठ कशावरून ?

अविनाश, मीही देवधर्म, श्रद्धा, पूजाअर्चा, मंदिरे, जत्रायात्रा वगैरे मार्ग स्वीकारत नाही -- पण याचा अर्थ बुद्धीच्या मर्यादा पाहाणेच नाकारायचे, असा नाही --

बुद्धिचाच वापर करून लोक शोध घेत गेले आणि काय सापडले ते पाहा ना -- बुद्धीनेच दिसणारे पाहायला घाबरणारा बुद्धिप्रामाण्यवाद काय कामाचा ?

.त्यामुळे, ठिकऱ्याच श्रेष्ठ, विदीर्णताच महान ! -- बुद्धिप्रामाण्यवादाची हीच गोची आहे ! जगात तो लयाला गेला पण इथे त्याचे अंधश्रद्ध शिलेदार अजून झेंडे फडकवत आहेत !

.मी एका गांभीर्याने हा उपक्रम सुरू केला होता, पण बऱ्याचजणांना हे आवडत नसावे, हे लक्षात घेऊन तो बंद करत आहे.

.आपल्यासारखे नसलेल्यांना धोपटू इच्छिणारे, त्यांना ' बोंबलत बसा ' असे म्हणणारे तथाकथित विवेकी लोक आणि आपल्यासारखे नसलेल्यांना पाखंडी, पापी म्हणाणारे एखाद्या धर्माचे लोक यांत काय फरक सांगता येईल ? ' अंधश्रद्धा ' या शब्दाची नीट व्याख्या व्हायची गरज दिसते !

संवेदनशीलतेचा अर्थ, हळवे, भावनाप्रधान, एवढ्यातेवढ्याने डळमळणारे, टची आणि थोडेफार वेडे ( बॅलन्स गेलेले ) -- असा केला जातो की काय, ते पाहायला हवे.

.डावा मेंदू अधिक प्रभावी असणे वा उजवा मेंदू अधिक प्रभावी असणे -- यांमुळे पडणारे फरक, असे काही वाचल्याचे आठवते.

हाच विषय पुढे आणखी विचारात घेतला तर -- स्त्रियांना त्यांची आकलनपद्धती दडपायला लावणे आणि पुरुषांची आकलनपद्धती सक्तीने स्वीकारायला लावणे -- हेच घडत आलेले असावे. त्यामुळे स्त्रियांच्या आकलनपद्धतीला वाव मिळेल अशी कार्यक्षेत्रेच फारशी तयार झाली नसावीत. स्त्रियांना कायमच मागे ठेवण्याचे हे नकळत घडलेले षडयंत्र आहे, असे म्हटले तरी एकूणात मानवजातीचे यात नुकसानच झाले असण्याची शक्यता आहे. आता स्त्रियांनीच अशा शक्यता निर्माण करण्याची गरज वाटते. कल्पना थोडी मोकळी सोडली तरच वेगळे काही घडू शकेल.

पुरुषांच्या प्रभावाखालीच मानवजात चाललेली असल्याने स्त्रियांच्या वेगळ्या आकलनपद्धतीला नीट वावच मिळालेला नाही, असे म्हणता येते. हे प्रचंड नुकसान झालेले असण्याची शक्यता दिसते.

स्त्रियांची समज एकात्म असते आणि पुरुषांची विश्लेषणात्मक -- असे काही संशोधन कुणाच्या माहितीत आहे का ?

-- थोडक्यात पण अत्युत्तम ! पृथ्वीवर स्त्रियांची गरजच नाही -- त्या नकोतच -- असे समजणाऱ्या सर्व गाढवांना खूप महत्त्वाचा डोस !

स्त्रीची उत्स्फूर्तता ही पुरुषाच्या तर्कापेक्षा अधिक विश्वासार्ह असते -- असा अर्थ.

याचच अर्थ, कट्टर विचारसरणीवर, धर्माग्रहावर, हुकूमशाहीने, पूर्वग्रहाधारित अशा चालणाऱ्या सर्व शक्ती व सत्ता आपल्याला समर्थनीय वाटतात ! त्यांतून घडणारी हिंसा, विनाश योग्य वाटतो !

थोडक्यात, मी श्रेष्ठ, आणि जे माझ्यासारखे नाहीत ते वाईट वा नालायक !

मते आणि मानसिक सवयी आणि स्वभाव यांतून होणारे मूल्यमापन मला कुचकामी वाटते ! त्यामुळे, कोट अमान्य !

" वो बहुत नालायक है साला, रिश्वत नही लेता ! " -- असे एक वाक्य ' सत्यकाम ' नामक सिनेमात होते.

' Power corrupts ! ' -- असे वाक्य समजा स्टेटस म्हणून दिले तर काय प्रॉब्लेम होतो ? काही वेळी असे होत नाही किंवा दुसऱ्याही काही कारणांनी हे होऊ शकते -- ओके -- आता यातल्या अर्थाची सत्यासत्यता, तसे का घडत असावे, यावर बोलायलाच नको ? सामान्यीकरण असलेली अशी शेकडो, हजारो वाक्ये आहेत ज्यांवर विचार व्हावा ! त्यामुळे, बहुसंख्य स्टेटस हे सामान्यीकरणयुक्तच असणार -- एखाद्या विशिष्ट, व्यक्तिगत अनुभवावर इथे काय बोलणार ? त्यामुळे, ' नसावे, सामान्यीकरण नसावे ‘ -- याला काही अर्थ नाही.

स्वतःच्या श्रेष्ठत्वाचा भ्रम बाळगणारी व्यक्ती सामान्यतः दुसऱ्या अनेकांना नालायक ठरवताना दिसत नाही ? मग, सामीन्यीकरणाबद्दल एवढे टची का व्हावे ? त्यापेक्षा, यातल्या मानसिक वर्तणुकीवर का बोलू नये ? -- अपवादांचे स्तोम माजवण्यापेक्षा ? किंवा न्यूनगंडवालेही असे करू शकतात, हे सांगण्यापेक्षा ? अशा तंत्रांनी मूळ विषय फिजल आऊट होतात ! -- आता हेही आणखी एक सामान्यीकरण झाले, यावर बोलून तेच तंत्र पुढे चालू ठेवता येईल ! ( हलकेच घ्या, जोशीजी ! )

अभ्यास करू नये, अशा प्रचारासाठी ही पोस्ट नसून शहाणपण / परिपक्वता अभ्यासावर अवलंबून नसतात, इकडे लक्ष वेधण्यासाठी आहे.

नीलेश, आपला विषय माणसाचे मन विभक्त असणे, त्यातून ते विदीर्ण होणे, त्यातून हिंसक होणे, वेडे होणे -- हा चालला आहे --

गायकवाडजी म्हणताहेत ते खरे आहे -- इकडे तडजोड कर, तिकडे आपद्धर्म म्हण, इकडे काणाडोळा कर, तिकडे सवलती दे -- हे खूप करावे लागते लोकशाहीत -- नुसते चांगले विचार असून उपयोगच होत नाही – अन्यथा, पुन्हा निवडून येण्याचे चान्सेस जाऊ शकतात -- याचा दोष अमुक एका व्यक्तीला वा मध्यमवर्गाला ( जो आता पस्तीस टक्क्यांच्या वर आहे -- आणि जनतेतला एवढा मोठा भाग षंढ -- वर म्हटल्याप्रमाणे -- असेल तर लोकशाही कसली ती ? ) वा दलितांना वा अल्पसंख्याकांना वा राज्यकर्त्यांना केवळ देता येणार नाही -- या दृष्टीने विचार यावेत म्हणून ही पोस्ट चर्चेला दिलेली आहे -- जनरली, याला दुसरे कोण जबाबदार आहेत ते सांगण्यातच आपली खूप हुशारी दिसते -- पण हा आपला सगळ्यांचा प्रश्न आहे, असे पाहणारे खूप कमी -- हाही, लोकशाही या फॉर्मचाच दोष म्हणावा का ?

हे लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य आहे ही भावना कमी कमी होत जाणे, निवडणुकीला उभे राहणे हे गरीबाचे कामच नाही असे होणे, साध्या सामान्य माणसाला ज्याची शिक्षा होते त्याला सत्ताधारी आणि श्रीमंत घाबरत नाहीत असे दिसणे, कोणत्याही पक्षाचे सरकार असो, भ्रष्टाचाराची मोठमोठी प्रकरणे सारखीच बाहेर येत राहणे, काही लोक सात्त्विक संतापाने सगळ्याच गोष्टींची समर्थने करताहेत आणि काही लोक तशाच सात्त्विक संतापाने सगळ्याच गोष्टींवर टीका करताहेत असे दिसणे, छोट्या कामापासून काहीही सरळ न होणे, रोजच्या जगण्यात हरघडी अनेक त्रास सहन करावे लागणे, गुंडगिरी आणि माज यांचा प्रभाव वाढत चालल्याची जनतेची भावना होणे, आणि याला पाडून त्याला निवडले तरी हेच होणार असे समजणे -- यातून एक अगतिकता येणे -- या सगळ्याबद्दल मिळून ही पोस्ट आहे.

अहो, चांगल्या लोकांनी राजकारणात यावे, असे अजूनही म्हणतात लोक -- कुठले चांगले लोक ?

बरे, सामान्य जनता मते कशावर आधारित बनवणार -- वर्तमानपत्रे, टीव्ही चॅनेल्स, लेख, बातम्या, भाषणे --यांवरच ना ! -- हे सगळेच हलकट, नालायक आहेत असे आपण म्हणू लागलो तर उपाय काय ?
यात पत्रकार, मध्यमवर्गीय, दलित, राजकारणी, दलाल, उद्योगपती, सिनेनट यांपैकी कोणत्या एखाद्याच समूहाला दोष द्यावा का ?

ठीक -- लोकशाहीत, मला जे चांगले, अक्कलवान वाटतात त्यांच्या हाती सत्ता असावी, असे मला वाटणारच पण बहुसंख्य लोक वेगळा निर्णय घेऊ शकतात -- ते ठीकच आहे -- तरीही, रोजच्या जगण्यातलेही काहीच ठीक का नाही ?

लोकशाहीत अशी सगळ्यांची अक्कल, शिक्षण काढायचे नसते -- एक माणूस एक मत -- आणि कुणी कुणाला अडाणी म्हणू नये --

कुठल्याही इतर फॉर्मपेक्ष लोकशाहीच चांगली, असेच मलाही वाटते --

मुळात हे मूलभूत विषय नाहीत -- तरीही, त्या तथाकथित नोकरदारांचा आहे काही प्रभाव ? की सरकार ऐवजी त्यांना टार्गेट करण्यात हुशारी मानावी ?

' मध्यमवर्ग ' हा शिवीसदृश शब्द न वापरता वस्तुस्थितीवरही बोलले जावे --

म्हणजे तुम्हाला ओके वाटतेय सगळे ? कोणतेच पक्ष विश्वासार्ह न वाटणे, राज्यकर्त्यांवर जनतेचे नियंत्रण न राहणे ?

जगातले सगळे अनुभव प्रत्यक्ष घेऊन कुणीच निवड करत नसते -- ऐकलेले, वाचलेले, अनुभवलेले, असे सगळेच असते निवडीत ! निवड ही नेहमी अर्धवट ज्ञानावरच होत असते !

हुकूमशाहीचा कैवार नाही -- लोकशाही वस्तुतः ते टाळण्यासाठी स्वीकारली जाणारी प्रणाली आहे -- इथेही तेच ? -- असा प्रश्न आहे --

विचार, अनुभव, त्यांतून घडत जाणारा स्वभाव यांतूनच सगळे ठरत असते. एका ब्रेकपने कोसळण्याचा एक काळ होता, आता लग्ना आधी तीन ब्रेकप नॉर्मल समजावेत, असा काळ आलेला आहे.

कित्येक हिंदी सिनेमांत नायक गाणे म्हणता म्हणता त्याची टोपी वा जॅकेट फेकून देतो आणि गाणे म्हणत नायिकेबरोबर बराच लांब जातो ! आपल्याला वाटते ती टोपी आणायला त्याला परत तिकडे जावे लागणार !

विश्राम गुप्ते हे स्वतःचे चिंतन मांडणारे अलिकडच्या काळातले उत्तम विचारवंत वाटतात. त्यांचा हा सदरचा लेखही खूपच विचारप्रवृत्त करणारा आहे. फक्त मला, माझ्या आकलनाप्रमाणे, व्यक्ती-समाज हे द्वंद्वच संशयास्पद वाटते. आणि दुसरे

म्हणजे, या लेखात ' अस्तित्ववादी ' हा शब्द फारच ढिलेपणाने, चुकीच्या अर्थाने वापरला गेला आहे ( असे मला वाटते ). पण महत्त्वाचा, ज्यावर चर्चा व्हावी, असा लेख !

जे धोका पत्करायचे टाळू इच्छितात ते प्रेम करू शकतात का, असा एक दुय्यम प्रश्नही इथे विचारून ठेवू !

प्रेम करणे ही तर सहजप्रेरणा आहे हो ! वो तो होगा ही !

थोडेफार ' लिव्ह इन ' चेच तत्त्वज्ञान ! अपनी सेफ्टी देखो !

जी स्त्री पत्नी असेल ती मात्र वामांगी !

आपण ' सभ्य ' असल्यामुळे काही अनैतिक, हिंसक, गुन्हेगारी विचार, मनात आले तरी, आपण दडपलेले असतात -- ते सगळे मिळून एक गुन्हेगार असतोच मनात !

अहो, सूचक विनोद अश्लील असतात !

अगदी सांगायच्या बेतात होतो -- नकोच ते -- माझी काही इमेज आहे की नाही ?

Champra Deshpande commented on a post.

कमरेखालचा एकही शब्द न वापरता समावेशक विनोद होऊ शकतात -- मजा येते -- वाव ठेवा --

नाटकात सुरुवातीला गरीब गाय वाटणारी ही मुलगी पुढे अफाट काम करते ! थोड्याच दिवसांत ही स्टार होईल, तेव्हाही हिची ओळख सांगायची सोय हिने ठेवावी हीच सदिच्छा ! नेहा जोशी !

.

या कथा एखाद्या काळातले स्वीकृत विचार मांडणाऱ्या नाहीतच -- अनेक मने, आपापल्या पद्धतीने जगत, एकूण जगण्याचे काय करतात, त्याच्या या कथा आहेत !

मी ' तथाकथित ' वेगाने बदलणारे वास्तव, म्हणतोय, कारण, बाहेर कितीही वेगाने बदल होत असले तरी मन वापरण्याची पद्धत तीच आहे -- आणि या कथा त्या पद्धतीबाबतच्या आहेत !

जरा नीट विचार करू या -- बिनचूकच करू ना -- माझ्या मते इतर कर्मकांड राहू दे -- तीर्थ-प्रसाद हे असले की झाले !

तुमचा मोक्षाचा ब्रँड कोणताही असू दे -- चलेगा --

.आता मोक्षच मिळवायचा आहे तर लुंगीचा रंग कुठला का असे ना ! मोक्षाची सोय तुमच्यातर्फे !

मी वाचले त्याप्रमाणे काही प्रक्रियांमुळे, विषारी द्रव्ये काढून टाकण्याच्या खर्चामुळे किंमत वाढते --

सारांश, सगळ्यांचे म्हणणे असेच दिसतेय की मूळ माल एकच असतो -- पॅकिंग बदलून त्याची किंमत वाढवली जाते ! प्रतिष्ठेसाठी देशी दारूच ( किंवा हातभट्टीची म्हणू ) वेगळ्या नावाने, जास्त किंमत देऊन घेतली जाते ! कोणत्या प्रक्रियांमुळे दारूची किंमत वाढते हे माहीतच नसावे किंवा असे काही असते, हे मान्यच नसावे ! मला हे पटत नसल्याने, मी आता थांबतोय !

कुणीही जरा शांतपणे पाहा -- किती आजूबाजूला भरकटतेय ही चर्चा ! साधा प्रश्न आहे -- दारूच्या किंमतींत जशी प्रचंड तफावत दिसते तशी त्यांच्या दर्जातही असते की नसते आणि दारूचा दर्जा कशामुळे ठरतो ? -- हे सोडून बाकी सगळे चालू आहे !

म्हणजे, हातभट्टीची आणि स्कॉच यांचा दर्जा एकच असतो !

तोच साधा प्रश्न विचारतोय -- सगळे आत्मवंचनेच्याच मार्गाने जाताहेत --

.

दर्जा अशी काही गोष्ट असते की नाही ? अधिक चांगली दारू असते की नसते ? मानवी शरीराच्या दृष्टीने आणि शास्त्रीय दृष्ट्या ?

सॉरी, मला हे पटत नाही -- ओसी आणि ॲंटिक्विटी यांच्या दर्जात फरकच नाही ?

तुम्ही तिप्पट पैसे देऊन निरमाच एरियलच्या नावाने घेणार का ?

.निरमा आणि एरियल यांमध्ये काहीच फरक नसतो, असे कळले तरीही पॅकिंग छान आहे म्हणून कितीजण एरियल घेतील ?

होय -- ते वाचूनच बोलतोय -- कॉस्ट वाढण्याची नेमकी कारणे कुणीच का देत नाही ?

भ्रामक, काल्पनिक, प्रतिष्ठेची कारणे ठीक -- खरोखर खर्च वाढवणारी काही कारणे असतात की नसतात ? नुसती बाटली छान आहे म्हणून ४०० ची फुल १००० ला बाजारात राहील ?

हं -- ये चाहिये -- वाचतो --

ते आपले मित्रच आहेत -- यातून ते निवृत्त झाले ते ठीक --

त्याच विषयावर मोकळेपणाने बोलणारे आपण ! क्षमा कसली !

.म्हणजे माहितीवर, अनुभवावर आधारित मानवी प्रश्नांचे आकलन, असे म्हणताय का ?

म्हणजे कसे ? मला समजले नाही --

तर अविनाश, आपल्या सगळ्यांच्या माहितीतून आपल्याला आपण स्वतः काय करायचे हे कळावे, एवढेच --

समजा मला कळले की व्हाईट रममध्ये अशुद्ध द्रव्ये कमी असतात -- मी ती ट्राय करून पाहीन -- हे माहितीमुळेच घडेल --

.

अविनाश, होतेय काय, किंमतींत फरक आहेत, हे सगळ्यांना माहीत आहे, पण ते का, कशामुळे आहेत, हे नीट कुणी सांगू शकत नाहीय -- हा आहे प्रश्न --

संदेश देणे हा कुणाचाच अधिकार नाही -- पण, समजा मी स्वस्तातली पितोय तर काय काळजी घेऊ शकतो -- हा विचारच नको ?

विवेक, तुमचे चाललेल्या चर्चेकडे नीट लक्ष नाही, असे मला वाटते आहे --

दारूतली अशुद्ध द्रव्ये, शरीर विष म्हणून ट्रीट करते -- हे माहितीच नको ?

मित्रांनो, या पोस्टचा हेतू -- माहिती असावी -- जमेल ते जमेल -- पण पाणी प्यावे, हे फायद्याचे नाही ?

अरे मित्रांनो, याचा जगण्यामरण्याशीही आहे ना संबंध ! नीट माहिती झाल्याने चार वर्षे अधिक पिता आली तर काय वाईट आहे ?

अहो, कॉस्ट वाढण्याची काही कारणे असतात की नाही ? ती कोणती, हा साधा प्रश्न आहे --

--व्हिस्की डिस्टिल केल्यामुळे तीत अशुद्धता राहण्याचा प्रश्न येत नाही, असे तुम्ही म्हणता -- तिचा जुनेपणा वगैरे जाऊ द्या -- पण एक व्हिस्की चारशेला आणि एक हजाराला -- असे कशामुळे होते ?

congeners -- ही अशुद्ध द्रव्ये फर्मेंटेशनच्या प्रक्रियेत तयार होतात. अनेकदा डिस्टिलेशन करून ती काढून टाकणे खर्चाचे असते, त्यामुळे दारूची किंमत वाढते. डार्क ( गडद रंगाच्या ) दारूत ही अशुद्ध द्रव्ये अधिक प्रमाणात असतात. या अशुद्ध द्रव्यांचा मुख्य दुष्परिणाम शरीराचे डिहायड्रेशन ( निर्जलीकरण ) होण्यात होतो. दारू पिण्यापूर्वी, पीत असताना व नंतरही पाणी पीत राहणे, यामुळे हे दुष्परिणाम कमी होऊ शकतात. -- मला मिळालेली माहिती माझ्या शब्दांत दिली आहे.

बाकी सगळे मान्य -- पण एक साधा भौतिक प्रश्न आहे -- दारूचा दर्जा कशावरून ठरतो ? स्वस्तातली दारू शरीराची नासाडी जास्त आणि अधिक वेगाने करते का ? मला जे थोडे सापडले ते वर दिले आहे. अधिक कुणाला काही माहिती आहे का ?
अनेकदा डिस्टिल करून दारूतली अशुद्ध द्रव्ये काढून टाकण्याच्या प्रक्रियेने किंमत वाढते, असे दिसते. एक तर स्मूथ सावकाश परिणाम होणे आणि दुसऱ्या दिवशी हँगओव्हरचा, डोकेदुखीचा त्रास न होणे -- हे दर्जाचे फायदे दिसतात

आमच्या मित्रांतही, " आयला, काय रंडीबाज बॉलपेन ! " असे म्हटले जात असे !

मला, आमचे सर शंकर वैद्य यांची ' दणदण मुसळ ' ही कविता आठवते. ती त्यांच्या तोंडून ऐकण्यात वेगळीच गंमत आहे !

सुमारे ५-७ वर्षांपूर्वी मुद्रितशोधन याच विषयावरच्या एका मेळाव्याला उपस्थित होतो. चांगले मुद्रितशोधक मिळणे खूपच अवघड होत चालल्याचा त्या वेळी सूर होता. सध्या काय परिस्थिती आहे, माहिती नाही. कामाचे महत्त्व जाणून तसा मोबदला दिला जातो का त्यांना ?

' फलाशा न धरता कर्म करावे ' ! -- सगळ्यांना मान्य ! -- भ्रष्टाचार वाईट ! -- सगळ्यांना मान्य !

जगण्यासाठी माणसाला लागतं तरी काय ! अन्न . . . वस्त्र ( व्यक्ती सापेक्ष जरा विचार करावा लागेल ) . . . निवारा . . आणि फेसबुक .
प्लीज -- फेसबुकच्या आधी पाणीही लागेल हो -- मग आहेच ना फेसबुक !

.सगळेच द्विधा मनाचे -- कुणीच खरा नाही -- आणि सगळेच खरेपणाला ग्रेट, सुंदर म्हणताहेत ! ढोंग ही गोष्ट दुःखनिर्मितीच करते, यावरही मतभेद आहेत का ?

माझ्या निरीक्षणाप्रमाणे मन नेहमी द्विधा असते -- खरे मन असे काही नसतेच -- तरीही आपण सगळेच खरेपणाचे गोडवे गातो -- त्याच्या अभावाचे त्रासही भोगतो -- मग आपण एकत्रितपणे यावर बोलायला काय हरकत आहे ?

इतरांबरोबरच, मी जे चांगले म्हणून मान्य करतो तसे मी जगत नाही पण तसे जगत असल्याचे भ्रम निर्माण करतो !

.वर्तमान हा असू दिला तर असतो -- पकडायला गेलात तर नसतो !

महाप्रचंड, ग्रेट काम करून गेलेले श्री. मारुती शिवरामपंत कांबळी !

तो सांस्कृतिक अंश कुणाला आणखी एखाद्या मार्गाने वा संगीत, चित्र अशा दुसऱ्या एखाद्या कलेतूनही साधत असेल -- इथे वाचनमार्ग विचारात घेतलेला आहे --

.खूप जणांचे तसे असू शकते -- नुसते वर्तमानपत्रही पुरे, असे ! सदर पोस्ट जगण्यात सांस्कृतिक अंश असण्यावरही भर देणारी आहे.

त्या वाचनाचा साठा वा विश्लेषणात्मक आढावा घेता येणे, याची गरज नाही, या अर्थी --

ही पोस्ट उघडच साहित्याच्या वाचनाबद्दलची आहे. कोणतेच बाह्य साधन वा वस्तू न लागता बसल्या ठिकाणी सखोल होणारेही असतील. वाचनाच्या मार्गाने जाताना, जगात अत्युत्कृष्ट म्हणावे असेही खूप असल्याचे लक्षात येते आणि आपण त्या मानाने खूप कमी वाचतो आहे, टिपणे ठेवत नाही, वाचलेले, त्यावर बोलता यावे, इतपतही लक्षात ठेवत नाही -- असे विचार येऊ शकतात -- त्यांना उद्देशून ही पोस्ट आहे. ' ठायीच बैसोनि करा एकचित्त ' यांच्यासाठी नाही !

द्वेषरोगात प्रेमरोग मिसळला की नॉर्मल-रोग तयार होईल !

मनाचा नियंत्रकच दुखावल्यावर नियंत्रित कप्पे कुठले नीट राहणार ?

हा मानवी जगण्यातला सगळ्यात जुना रोगट प्रश्न ! पुनरावृत्ती !

मोठे काय लिहायचे ते लिहाच पण हाही पोचणारा जाळ आहे ! कोणत्या ना कोणत्या कारणाने माणसे एकमेकांशी हलकटपणे वागतातच आणि त्याला आपापल्या अनुभवांचे आधार आणि समर्थने देतात ! माणसाचे जगणे शोकात्मच, च्यायला !

सखोल भावनिक आसक्तीचे नाते तुटले तरच त्याला ब्रेक-अप म्हणत असावेत, या भाबड्या समजुतीने मी बोलतो आहे -- निव्वळ मौजमजेसाठी एकत्र येऊन विभक्त होणाऱ्यांचेही ब्रेक-अपच म्हणतात काय, ते माहिती नाही !

नदी, मुळात मनाची एक जखम अशी बाजूला एका कप्प्यात ठेवता येते का ? हाताला फोड झाला तरी आख्खे शरीर डिस्टर्ब होते !

-- आणि ती जी गुणधर्मांची निवड होत असेल, तीही ठरण्याची काही कारणे असतील ! इथे अनेकांना प्रश्न पडतो की हा नियतीवादच म्हणावा की काय ? जे घडायचे ते जर परस्पर घडत राहते तर माणसाचे स्वातंत्र्य म्हणजे काय ? आणि त्याच्या कृतींची जबाबदारी तरी त्याची कशी ?

नक्कीच ! वेगळ्या अडचणींतून आणि वेगळ्या कुवतीनेही तो जगत असतो ! माणसाच्या जगण्यातली ग्लॅमर पद्धत ही एक गलिच्छ गोष्ट आहे !

पोर्तुगीज कवी फर्नांडो पेसोआ ७२ टोपणनावांनी लिहीत असे --

एकाच, सवयीच्या, रटाळ आयडेंटिटीतून क्षणभर तरी बाहेर पडता येऊ शकते का, या दिशेने चर्चा जावी --

मानवी बुद्धी निर्माण होणे हे अशा एका शक्तीचे काम आहे जी बुद्धी नाही -- ती बुद्धीच्या कक्षेत येऊ शकेल ?

' भ्रष्टाचार नसावा ' या वाक्याला सगळ्यांचा पाठिंबा असतो, पण सगळे भ्रष्टाचारी असतात !

मग गप्पा मारून उपयोग काय, कितपत होणार ? मुळातला प्रश्न डावलून खूप विचारमंथन करणे, कितपत कामाचे आहे ?

प्राची, नुसता बौद्धिक आदर्शवाद कामाचा नाही -- मनातली मानापमानाची यंत्रणा नष्ट होणे, ही तुला एक नुसती बुद्धीने पटण्याची गोष्ट वाटते ?

माझ्या पोस्टमधला मी म्हणजे फक्त मी नव्हे -- मी, तू, तो, ती, सगळे !

"Suffering" in Ambedkar's interpretationis in the form of sorrow, misery or poverty that is caused by the"exercise of power by one person or class over another" (Tejani2007: 63). Queen views these alternations and rejections as ways to create a message of social activism in Buddhism. For these reasons the goal of the eightfold path is "to remove injustice and inhumanity that man does to man" rather than "nirvana"

भूतकाळ ही सेफ वाटणारी आयडेंटिटी ( सुरक्षित वाटणारी ओळख ) असते !

.Ambedkar also made a radical reinterpretation of Nirvana. According to him nirvana is not a metaphysical or psychological state or attainment, but a society founded on justice and peace. Thus he brought the transcendent view of Nirvana down to earth. It is an engaged Buddhism which disregards notions of another world and translates that into a society based on equality.

पती दुसऱ्या स्त्रीवर लाईन मारतोय किंवा पत्नी दुसऱ्या पुरुषाला लाईन देतेय -- हे आत्मसन्मानविघातक आहे -- समजा -- असे वाटतेय, तर काय ?

.पुन्हा सांगतो -- पहिल्या दोनांबद्दल प्रश्न नाही -- ' छुपे ' या प्रकाराबद्दल काही व्यक्ती म्हणतात, ही प्रतारणा आहे, भ्याडपणा आहे, क्षुद्रपणा आहे ! आणि हे जगभर आहे ! असंख्य कलाकृतींचे हे विषय झालेले आहेत ! -- यावर मते यावीत --

.गेल्याच आठवड्यात चंद्रमोहनांच्या स्टुडिओवर जाऊन त्यांच्याशी दीड तास गप्पा मारल्या ! त्यांची अनेक चित्रेही पाहिली ! अतिभारी व्यक्ती !

मुळात सारखे कुणालातरी कंडेम करणे, हे मला फारसे अर्थपूर्ण वाटत नाही आणि शोध लावणारे वा म्हणी निर्माण करणारे हे सध्या जगत असलेल्या आपल्यापेक्षा फार काही श्रेष्ठ होते, असेही मला वाटत नाही. जगण्याचे मूळ प्रश्न पाहात जगून गेलेले प्रसिद्ध नसतीलही झालेले, पण तेच खरे अर्थपूर्ण ! तसे कुणी होऊन गेले का ते कसे कळणार ? आणि सध्या जगणाऱ्यांत तसे कुणी नसतीलच, हे तरी कसे म्हणणार ? प्रगती, प्रसिद्धी आणि जगण्याचे मूल्य यांचा संबंध काय, कितपत महत्त्वाचा असतो, हा मला महत्त्वाचा प्रश्न वाटतो !

.संजयजी, उपहास, अन्याय, आकुंचन हे असले काहीच माझ्या मनात नसलेले तुम्हाला दिसते आहे, हे दुर्दैव ! तरीही, नकळत असे काही झाले असेल तर दिलगीर आहेच ! पण तुम्ही म्हणताय असे काही इतर कुणालाच जाणवलेले दिसत नाही !

हृषिकेष, परिपक्व आणि चंचल -- हे दोन्ही शब्द रद्द करू ! सुंदर -- हा एकच शब्द !

स्त्री-सौंदर्य पुरुषाने प्रतिसादावे की जिंकावे, कोण जाणे !

आणि आता मग एकच प्रश्न राहतो. बिईंग इन इटसेल्फ आणि बिईंग फॉर इटसेल्फ यांतला फरक काय ? ' बिईंग फॉर इटसेल्फ ' म्हणजेच -- अस्तित्व,स्वातंत्र्य, रिकामीक का ? ये बतानेवाला कोई तो हरी का लाल विद्वान होगा इस दुनियामे !

साधे प्रश्न आहेत ः--

१. ' अस्तित्व ', ' स्वातंत्र्य ', आणि ' रिकामीक ' ( तुकारामाचा शब्द ) हे अनुक्रमे existence, freedom and nothingness यांसाठी मराठीतले प्रतिशब्द आहेत. या शब्दांचा अर्थ एकच आहे की यांचे वेगवेगळे अर्थ आहेत ?

२. ही फक्त एका काळातल्या मोजक्या लोकांची मनःस्थिती असते की कधीही मानवी आकलनात येऊ शकणारे असे हे सत्य असते ?

३. अनेक प्रभावांनी घडणाऱ्या माणसाच्या स्वभावाचा हा भाग असतो का ? तसे असेल तर त्यावर एवढी बडबड करायचे कारण काय ?

--- हे प्रश्नच न पडणारे, यांबद्दल काहीच बोलू न शकणारे विद्वान यावर कशासाठी लिहितात, हा खरेच माझ्यासारख्या बिगरविद्वानाला प्रश्न पडतो. ( यावर, मलाच विद्वान व्हायला सांगणे, हा उपाय कृपया कुणी सुचवू नये ! माझे कामाचे क्षेत्र वेगळे आहे.) पण विद्वान असलेल्यांना खरेच हे साधे प्रश्न पडलेच नसतील ? की तिकडच्या पाट्या उचलून टाकल्या इकडे की झाली विद्वत्ता ?

मी सगळ्यांचे सगळे वाचलेले नाही पण जे वाचले त्यात उपरोल्लेखित प्रश्नांची उत्तरे सापडत नाहीत. तसे विवेचन कुणी केले आहे का याची मी माहिती विचारतो आहे. खैरनारांच्या बोलण्यातून आणखी एक नेहमीचा ' गैरसमज ' पसरतो आहे की ' अस्तित्ववाद ' हा परिस्थितीचा परिणाम होता ! त्या पाचांनाही परिस्थिती तीच होती का ? आणि अस्तित्व हे जर नुसता एक ' स्वभाव ' असेल तर त्याचे काय एवढे कौतुक आहे ? सगळी मानवजात कायमच अस्तित्ववादीच राहात आलेली आहे, असे का म्हणू नये ? आणि जगण्याचे आकलन हे प्रत्येक बौद्धिक साच्याने आणि विभिन्न प्रभावांनी बदलत असेल तर अगदी लेटेस्ट लेखकांची तरी चर्चा करायची काय गरज आहे ? की मूल्य असे काही नसतेच ? यावर कुणाला काही मजकूर सापडला तर हवा आहे.

समजा पाच महत्त्वाचे अस्तित्ववादी आहेत -- त्यांनी आपापल्या पद्धतीने मांडणी केलेली आहे -- कुणी देव मानणारे, कुणी देव न मानणारे ! जगातल्या एकूणच आणि विशेषतः मराठीतल्या ( मे पु रेगे धरून ) सर्व विद्वानांनी त्या पाचांचे तसे तसे मांडण्यापलीकडे काय काम केले आहे ? ' नथिंगनेस ', ' अस्तित्व ' आणि ' स्वातंत्र्य ' यांचे वेगवेगळे अर्थ आहेत का ? ही व्यक्तिवैशिष्ट्ये असतात का ? यावर प्रकाश टाकणारा महाभाग कुठे आहे का ? असल्यास तज्ज्ञांनी कृपया निदर्शनास आणावा !

होय -- तो शब्द हेतूपूर्वकच योजलेला आहे -- माझ्या सुरक्षिततेच्या विचारांची चक्रे मला घेरून असतात -- मी स्वतःच अमुक एक समाजमान्य आहे म्हणून गृहीत धरायला तयार होतो -- कोण काय म्हणेल, कशाचे काय परिणाम होतील -- या विचारांनी माझी अभिव्यक्ती मर्यादित होते -- आणि मी त्याचे समर्थन करू लागतो -- समाज तर तुम्हाला स्वातंत्र्य द्यायला कधीच राजी नसतो --

आभास, पॅटर्नखेरीज जगणे असू शकते का, हा प्रश्न आधी मी विचारेन -- शक्य नाही, असे मला माहीत नसलेले निष्कर्ष धरून चालणार नाही --

त्या आधी, हे परमेश्वरा, हे सगळे न दडवण्याचे धैर्य आम्हा मानवांना लाभो !

सगळे विश्व एकपणे असते, असे पाहिले तर घटना कुठल्या असणार ? आणि मग काळ म्हणजे काय ?

सर्व फ्रेंडसना खरेच नम्र विनंती -- नसेल जमत कुणाचे कुणाशी तर छान निरोप घेऊ पण असले उद्योग टाळले जावेत ! कुणाला कुणाचा खूपच राग असेल तर अनफ्रेंड करायची सोय आहे ना ! मी कुणाला अनफ्रेंड करणार नाही पण माझ्या काही मतांचा कुणाला व्यक्तिगत त्रास झाला असेल वा होत असेल तर त्यांनी मला अनफ्रेंड करावे ही विनंती. कारण अशा व्यक्तिगत वादांचे माझे कधी उद्देश नव्हते आणि नाहीत.

.व्यक्तिगत कटुता टाळून इथे आपण भेटू शकलो तर फारच समृद्ध काही घडत राहील !

नथिंगनेस, अस्तित्व, स्वातंत्र्य -- यांचे तुकडे होऊ शकतात ? प्रत्येकाच्या स्वभावाप्रमाणे हे वैशिष्ट्यपूर्ण आणि मर्यादित असतात ?

आळस, ढोरमेहनत, तासंतास कुठल्या ना कुठल्या रांगेत उभे राहणे, राजकारणातले ( अजिबात कळत नसलेले ) डावपेच उलगडत चर्चा करणे, निरनिराळ्या भ्रष्टाचाराच्या पद्धती आणि आकडे यांवर बोलत राहणे आणि आपल्या नोकरीच्या वा कामाच्या क्षेत्रातल्या गोष्टींची चर्चा करणे -- असे खूप आहेत आमचे शत्रू ! या सर्वांवर आमचे प्रेम आहे !

या स्टेटसमध्येच माझ्याकडून एक, म्हटले तर, हलकटपणा झालेला आहे -- " मते म्हणजे काही ' सत्य ' नव्हे ! " हे वाक्य वापरण्याचा ! हेच माझे आकलन आहे, पण सॉरी म्हणतो !

दोन कम्युनिस्टांमध्ये असते ते मतांतर आणि कम्युनिस्ट आणि भाजपा मध्ये असतो तो मतभेद !

मला ज्यांनी अनफ्रेंड केलेले नाही त्यांना मी मित्रच समजणार -- की यात काही वेगळे धोरण लागते ?

प्रश्न असा येतो की मला माझ्या आकलनातूनच बोलावे लागणार -- त्याचे रागलोभ, जिंकणे-हरणे असे व्हावे का ?

.किरकोळ विनोद, गप्पाटप्पा, सहली, सत्यनारायण, सीरियल्स यांत जगणे हाही एक पर्याय आहे -- पण सगळ्यांनाच तो झेपेल, असे नाही !

Arun Bhalerao -- यांनी अस्तित्ववादाचा संदर्भ आणला आहे ते योग्यच आहे. अस्तित्ववादाचे मूलतत्त्व स्वातंत्र्य हे असून ते प्रत्येक व्यक्तीने जगण्यात जागे ठेवायचे असते. ते नथिंगनेस म्हणजे अमर्याद असते. प्रभावग्रस्त नसते. म्हणजेच ते एकूणच मानवी जगण्याचे अमर्याद मूलतत्त्व असते. ते नसेल तर नुसत्या प्रभावग्रस्त जगण्याने विखंडितता येते. तुकडे पडतात. एका माणसाचे मन विखंडित होण्याची आणि एकूण माणसाचे मन विखंडित होण्याची प्रक्रिया एकच असते. एका माणसात जसे एका वेळी साधक, बाधक, आशावादी, निराशावादी वगैरे सगळे विचार असू शकतात तसेच एकूण माणसाचे होते. यातून एखाद्या डेस्परेट ( अति-निराशा ) क्षणी एक माणूस जशी आत्महत्या करणे शक्य असते त्याच पद्धतीने एकूण माणसाचीही आत्महत्या होऊ शकते.

आपण वेगवेगळे असणे हे खोटे असून सर्वांचा मिळून कॉन्शसनेस एकच आहे, असे लक्षात येते, त्यातून आलेले हे स्टेटस आहे.

मते सगळीच अर्धवट, अपूर्णच नव्हे तर भ्रामकही असू शकतात -- ते तर जगणेच आहे -- मग, या प्रक्रियेची गरजच नाही, असे जगणे असू शकते का -- हा प्रश्न समोर येतो --

स्वतःच्या प्रतिमा सादर करत आणि इतरांनाही आपल्या वागण्याने निरनिराळ्या प्रतिमांत गुंतवत जगणे, हे अनैतिक वा evil जगणे.
सारखे नुसते कुणाचे तरी उतारे शोधण्यापेक्षा हे असे स्वतःच्या जगण्यातून आलेले स्टेटस महत्त्वाचे !

प्रॉब्लेम हा आहे की मला हा प्रॉब्लेम जाणवलेलाच नाही ! माझ्यातच काही प्रॉब्लेम तर नसेल ! ?

सुखाच्या आशेला आणि तीतल्या भावनिक आंदोलनांना प्रेम म्हणायची पद्धत आहे -- त्या पद्धतीचे उदात्तीकरण करण्यात फारसा अर्थ नाही -- हे सत्वर लक्षात घेणे बरे !

आधी स्वातंत्र्य -- त्यातून कृती -- असा Existence precedes essence चा अर्थ आहे. इथले नैतिकतावाले कुठल्यातरी बौद्धिक पॅटर्नबद्दल बोलत असतात. त्या पॅटर्नला बांधील राहण्याला ते नैतिकता म्हणतात. अस्तित्ववादातले स्वातंत्र्य हे बौद्धिक पॅटर्न या स्वरूपाचे नसते.

' आम्हांसी ते सदा रिकामीक ' किंवा ' आपुले मी रितेपणे ऐसे ' .

Nothingness म्हणजे despair किंवा शून्यवाद किंवा निराशावाद कसा असेल ? हे सगळे something नाही का ? बौद्धिक मांडणी नाकारणे, हे तर अस्तित्ववादाचे प्रमुख लक्षणच आहे, याचे कारण बौद्धिक मांडणी ही मर्यादित, सदोष असते, हे आहे. जसे प्रेत पाहिल्याचा परिणाम म्हणून बुद्ध धर्म नसतो तसेच महायुद्धाचा परिणाम म्हणून अस्तित्ववाद नसतो. नथिंगनेस हा व्यक्तीत जागृत असणे, हे महत्त्वाचे. तेच मूलभूत अस्तित्व आणि तेच स्वातंत्र्य. त्या स्वातंत्र्यातून कृती घडणे महत्त्वाचे. हा काय म्हणेल, तो काय म्हणेल वा परंपरा वा सामाजिक चौकट यांतून नव्हे. या नथिंगनेसबद्दल तुकारामाचेही अभंग आहेत. ती निरर्थक गोष्ट नाही.' तुका म्हणे पोते । देवे भरिले, नव्हे रिते ।। '

The authentic act is one that is in accordance with one's freedom. -- नैतिकतेसाठी हे वाक्य विचारात घ्यावे.

नथिंगनेस्स ! -- अस्तित्ववादी !

नैतिक कृती म्हणजे कोणत्या तरी वैचारिक पॅटर्नशी एकनिष्ठ राहणे, असा अर्थ असेल तर ते सगळे आंतरविरोधात्मकच असणार.

.याला म्हणतात अस्तित्ववादी प्रश्न !
अरे, हे मला माहितीच नव्हते ! नगरला आम्ही एकदा एका हॉटेलात राहिलो होतो तेव्हा या व्यक्तीने माझी ' सत्यकथे ' त आलेली पहिली कविता पाठ म्हणून दाखवली होती -- तेव्हा मला चढलेले मूठभर मास अजून घेऊन फिरतोय ! काय बोलणार ! प्रिय मित्र !

दुसरे काहीच मिळत नाहीय हे विसरायला दारू हवीच हो !

Sanjay Bhaskar Joshi --- तुम्ही ज्या पुस्तकाची भलावण केलेली आहे ते वाचूनच ही चर्चा सुरू केलेली आहे, हे कृपया लक्षात घ्या --

जिथे मते, पूर्वग्रह घट्ट असतात तिथे संवाद अवघड / अशक्य असतो.

जिंकण्याहरण्यासाठी जो नसतो -- तो वाद नव्हे, संवाद ! आपण एकत्रितपणे समजून घेत आहोत, अशा पद्धतीचा संवाद जरूर असावा !

' अस्तित्ववादाची लक्षणे असलेल्या किंवा अस्तित्ववादाशी नाते सांगणाऱ्या ' लेखकांचा अस्तित्ववादाशी काही संबंध असतो का ? ही कोणती कॅटेगरी आहे ? आणि जर नसेल संबंध तर अस्तित्ववादी असल्याचे दाखवण्याचा भिकारडेपणा कशासाठी ?

.मी माझ्या कादंब-यांच्या आलेखाकडे वळून पहातो, त्या वेळी किती वेगवेगळ्या विषयांना मी हाताळले आहे, हे मला सांगावेसे वाटते. डोंबा-याचा खेळ, करंटा (कामगार चळवळ), वैतागवाडी (गृहहिनांची समस्या), वासूनाका (रोडसाईड रोमिओज), बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर (परात्म व्यक्तिमत्व), अग्रेसर (कनिष्ठ मध्यम वर्गातील मुलीचे जीवन), राडा (बेछूट तरुण व्यक्तित्व), वणवा (नवश्रीमंत व निसर्ग), होमसिक ब्रिगेड (शैक्षणिक विकासाचे प्र कल्प), वॉर्ड नं. ७ सर्जिकल (एका निर्मितीक्षम कलावंताच्या समस्या). प्रत्येक कादंबरीमध्ये मी आहे म्हणून या कादंब-यांमध्ये एक अदृश्य धागा आहे. मी जर पुढे मागे लिहीत राह्यलो तर तो धागा पुढे वाढत चालणार आहे. मी पाह्यल्या त्या मिशनलेस संस्था (कामगार चळवळ, शिक्षण प्रकल्प), घनघोर अंधाराने भरलेले आभाळ (वैतागवाडी, राडा) नव-श्रीमंतांचा उद्दामपणा व आत्मघातकीपणा (वणवा), अस्तित्व विचार (बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर) हे पेश करताना माझ्या व्ह्यू- पॉईंटमध्ये वाचकाला इंटरेस्ट वाटतो की नाही, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मी जे कादंबरीमधून विधान करतो, त्यामुळे वाचक सिरीअसली स्टीम्युलेट होतो की नाही हा प्रश्न आहे. -- गणेश दिघेच्या स्टेटसमधून भाऊ पाध्ये यांची वाक्ये.

अस्तित्ववादी लेखक एक तशी कादंबरी लिहून इतरत्र दुसरेच काही लिहीत बसतो ?

.ते नथिंगनेसला अस्तित्व म्हणतात आणि माणूस त्याच्या निवडींनी जे जगत जातो, ते इसेन्स -- असे दिसते.

अस्तित्व म्हणजे व्यक्ती नव्हे -- इसेन्स म्हणजे व्यक्ती --

नाही, अरुणजी -- नाही पटत --

संजयजी, तुम्ही म्हणताय ते पुस्तक वाचूनच हे प्रश्न पुढे आले आहेत -- उदा अस्तित्ववादाची लक्षणे, अस्तित्ववादाशी नाते सांगणे -- हे काय प्रकार आहेत ?

मराठी भाषेतच सेक्सशिवाय लिहिणारी माणसे मोठी होतात. -- हे एक विशेष निरीक्षण आहे -- याचे स्वतंत्र स्टेटस होऊ शकते !

सांगा मग --

आता गंमत सोडून जरा नीट बोलू या -- एकाकीपणा, बापाशी न पटणे, स्त्रीसंपर्क कमी असणे -- अशी काही लक्षणे सांगता येतील का ?

अहो, म्हणजे त्यातला उपरोध दुर्लक्ष्याच ना तुमने !

.अशी कुठलीतरी बाह्य लक्षणे दाखवून अस्तित्ववादी ठरायची हौस हवीय कशाला पण ?

.नेमाड्यांना परवडले, त्यांनी वाढवल्या मिशा पण भाऊ पाध्ये, नगरकर, मनोहर शहाणे, विलास सारंग -- हेही मिशावाले आहेत का ? आणि मुख्य म्हणजे नेमाड्यांच्या भक्तालाच मिशा नाहीत !

अस्तित्ववादी ठरायची !

तसे नाही, मला आशा आहे --
काहीही पैसे खर्च न करता, सगळ्या गरीब-श्रीमंत हॉटेलांतल्या वेटर्सना एक सक्तीचे ट्रेनिंग, नोकरीला घेतानाच, देणे शक्य आहे की, कामावर असताना केस खाजवणे, नाक साफ करत राहणे अथवा दातांनी नखे कुरतडत उभे राहणे, हे त्यांनी करता कामा नये !

In Marathi, a saint says in his poem that you have to burn the seed !

धर्म, विचारसरणी, संस्कृती, भाषा, देश, प्रांत, जात, घराणे यांच्या अस्मिता ही मतेच असतात !

पीटर शेल्डाल नामक कवीच्या ' रिलीज ' या माझ्या आवडत्या कवितेचा मीच केलेला अनुवाद ः --

माझे आयुष्य राहत आलेले आहे कंटाळवाणे
गोंधळलेले आणि कधीकधी अत्यंत घृणास्पद
आणि उद्रेकमय
परंतु मी कधीच काहीच उच्चारलेले नाही मुद्दाम,
अतिशय प्रामाणिकपणाशिवाय .

माझे स्वतःशीच असणारे मतभेद म्हणजे
असतात गैरसमज
एका बधिर आशावादाने पेललेले

बहुधा मी बाळगत नाही माझी मते
काही तासांहून जास्त काळ.

स्वतःच्या तंत्राने चालणाऱ्याला तरी स्वतंत्र म्हणता येईल ? स्वतःच्या पूर्वग्रहांचे सेन्सॉर पाळून लिहिणारा लेखक स्वतंत्र म्हणता येईल ?

कारण सामान्यांसह सर्वांना पाण्यापेक्षा सामन्यांच्या करमणुकीची तहान जास्त आहे !

आपापल्या स्वभावाने वागण्याचे डावपेच म्हणजे स्वतंत्रता, असे म्हणताय का तुम्ही ?

खेळाडूंना सवलती असतात -- कलावंत हे शक्य तो चेचून काढायचे, हे निश्चित ठरलेले असते -- निव्वळ करमणुकीच्या कलेत प्रावीण्य मिळाले तर नोकरीची गरज राहात नाही -- यातूनही, उत्कटता शिल्लक राहिली तर जरूर काही करून दाखवा -- बरे वाटले तर बक्षीसही मिळेल !

दृष्टिकोण, विचारसरणी, श्रद्धा, नीतीकल्पना -- या सगळ्यांनी प्रत्येक माणसाचा एक, काहीसा बदलता पण स्थिर साचा बनत जातो -- आशावाद वा निराशावाद, हे त्याचेच भाग असतात. त्या साच्याला, स्वीकृत मनःस्थितीला, मी मूड म्हणतो आहे. स्वीकृत भरणा !

जीव द्यायची हल्ली गरज नसते -- जीव घेणाऱ्याची जरा खोडी काढायची, की काम फत्ते !

स्वतःच्या पूर्वग्रहांशी बद्ध राहून वागण्या / जगण्याची मुभा जो घेऊ शकतो, त्याला आपण सामान्यतः स्वतंत्र माणूस म्हणतो. अशांची संख्या बऱ्यापैकी वाढत चालली की तसे स्वतंत्र लोक एकमेकांचे स्वातंत्र्य धोक्यात आणतात ! एरवीही, दुसऱ्यांचे स्वातंत्र्य जो धोक्यात आणू शकतो, तोच खरा स्वतंत्र, असेच दिसते !

कुणालाच काही माहिती नाहीय आणि तुमच्या सच्चेपणावर सगळ्यांचा विश्वास आहे ! हाणा बिनधास्त !

विशेषतः, कुठल्याही कलाकृतीचा शेवट हा पिसाळलेल्या कुत्र्यासारखा अंगावर आला पाहिजे !

आणि सगळ्या ऑडिटर मित्रांनो, खाऊन पिऊन घ्या याच काही दिवसांत ! तुम्हारे दिन हैं !

पालक आणि लग्नाची मुलं यांच्यात होणाऱ्या अनेक मतमतांतरांत हा संवाद बऱ्याच वेळा घडतो. पालक म्हणतात, ‘अगं/अरे सगळं अपेक्षेप्रमाणे तर आहे या स्थळात. नाकारण्यासारखं काहीच दिसत नाहीये. शिवाय, ओळखीतून माहितीही कळालीय; मग तुझा नकार का?’ याला अनेक वेळा मुला-मुलींकडून उत्तर मिळतं, ‘नकार देण्यासारखं काही दिसत नाहीये; पण क्लिक होत नाही...

' आवडणे ' याची सामान्य परिमाणे वा मानक सापडणे अवघड आहे -- त्यामुळे, पालकांना सर्वगुणसंपन्न वाटणारे स्थळही ' क्लिक न होणे ' असे घडू शकते -- याकडे समजुतदारपणे कसे पाहता / हाताळता येईल, याची ही चर्चा नक्कीच उद्बोधक आहे.

मूडमध्ये माणूस थांबतो -- त्याची शक्ती वाया जात राहते -- मूडची गरज नाही, असे जगता येते का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे -- ( कोणताही मूड धक्के खाण्यासाठीच तयार होतो. )

आशा, निराशा हे दोन्ही प्रतिक्रियारूप मूडस आहेत -- दोन्हींतही फारसे तथ्य नाही --

दाढी दिसत नव्हती ना, मग ती कळणारी असणार कविता ! तुम्हाला नाही कळली म्हणून काय झाले !

त्या स्वप्नात तुम्हाला दाढी होती का, एवढेच सांगा --

धोका पत्करणे याचा अर्थ पहिल्याच धोक्याला खतम व्हायला तयार असणे ! यशस्वी लोकांच्या चरित्रात असतात तसे पार होऊन गेलेले धोके नव्हे !

कुणी वाचो न वाचो, बक्षिसे मिळाल्याच्या बातम्या तर वाचतील !

अहंकार आणि भेद -- दोन्हींना ' नासा ' म्हटले आहे -- भेद म्हणजेच अहंकार -- अशी ही मांडणी दिसते !

खरे आहे -- मानवी मन अपरिहार्यपणे विषमताच जन्माला घालते !

आभासी दुःखही भोगावे लागणार ! झोप मात्र खरी उडणार !

अभिवाचनात, आवाजातले चढउतार आणि बदल, चेहऱ्यावरचे हावभाव, हातांच्या अनुकूल हालचाली, हे सर्व आणि अभिनयासाठी मनाने जे जे केले जाते, ते सर्व असते.

बिल्डर, दुकानदार, कारखानदार -- अशा लोकांना सामाजिक बांधिलकी बद्दल ऐकून घ्यायला वेळ नसतो, तरीही सांगायला गेलात तर ते लाथ घालून हाकलून देतात, तेवढी ताकद असते त्यांच्याकडे ! पण साहित्यिक ( त्यातही, कवी ), डॉक्टर, शिक्षक -- अशांना सामाजिक बांधिलकी असायलाच हवी ! ताकद नसलेल्या सर्वांना ती असायलाच हवी !

.अवकाश कलामंच, पुणे या आमच्या संस्थेतर्फे काल प्रिया जामकर आणि सुनील गोडसे यांच्या कथाभिवाचनाचा कार्यक्रम झाला. गौरी देशपांडे, सुनील गोडसे, दि. बा. मोकाशी आणि कमल देसाई यांच्या कथांचे उत्तम अभिवाचन झाले. फेसबुक फ्रेंडसपैकी डॉ. श्रीनिवास देशपांडे आणी अजिंक्य दर्शने उपस्थित होते. कथाभिवाचनाचे असे कार्यक्रम वारंवार व्हावेत, असे

उपस्थितांचे मत व्यक्त झाले. अभिवाचनानंतर सर्व उपस्थितांत, वाचलेल्या कथांच्या अनुषंगाने चर्चा झाली. कार्यक्रम सर्वांना खूपच आवडला !

Rajan Khan -- तुमच्या ' रस-अनौरस ' मध्ये तत्त्वज्ञान आहेच -- तुम्हाला भंपक तत्त्वज्ञानाची मुळीच गरज नाही --

तुकारामाच्या म्हणण्याप्रमाणे ' एकविध मन ' हाच देव आणि हाच धर्म ! आणि ' देव अंतरे ते पाप । ' असे तो म्हणतो.देव म्हणजे माणसासारखी बुद्धी असलेले एखादे अस्तित्व ही आपली एक कल्पना आहे. तुकारामाच्या म्हणण्याप्रमाणे कदाचित आपण सगळेच पापी असणार. समजा मी पापी आहे, म्हणजे काय ? माझे मन एकविध नाही -- विदीर्ण आहे. आता या पापाचे निर्दालन करायला देव येणे म्हणजे काय ? एकविधता -- एकात्मता येणे. ती येऊ शकते, असे तुकारामाचे आश्वासन आहे. आपली बुद्धी आणि तीतून मिळणारी विदीर्णताच आपल्याला महत्त्वाची वाटत असल्याने आपणच पाप वाढवत आहोत !

बाजारात सँडपेपर मोठ्या प्रमाणात उपलब्ध ठेवलेले आहेत !

मुळात, लेखन राजकीय किंवा राजकारणावर असणे म्हणजे काही तरी ग्रेट, हा भ्रम आहे -- ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक तसेच राजकीय, ही नुसती एक माहोलाची कल्पना देणारी, सोयीसाठी केलेली विभागणी आहे. सगळे लेखन शेवटी संबंधरचनांचा आवाका घेणारेच असते. राजकीय माहोलाचे लेखन कमी असणे, हा काही विशेष महत्त्वाचा मुद्दा नाही.

नेमाडेंना इतिहासाची शिस्त नको, पण इतिहास हवा तसा वळवायचा आहे.

...

हे सगळे इत्थंभूत समजून घेणे मला जमणारे नाही. पण एक म्हणता येईल की नेमाडे हे लेखक म्हणून बौद्धिक / एकरेषीय असल्यामुळे, विद्वत्ता कितीही असली तरी त्यांचा आवाका लहान होतो.

आच आणि सातत्य या गोष्टींचे महत्त्व निर्विवाद आहे ! आपल्या आवडीच्या गोष्टीत तरी ते राहावे. काळाच्या ओघात खूप काम होऊ शकते. शुभेच्छा !

संचय या स्वरूपातली संस्कृती प्रतिबिंबित होते, हे ठीक -- पण ललित कृती ही एक सांस्कृतिक कृती असते, ते कोणत्या अर्थाने ?

काहीजण त्यांच्या आवडत्या गोष्टींशी आयडेंटिफाय होतात आणि त्यांच्या अस्मिता तयार करतात ! त्यामुळे संस्कृती मातीत जाते !

बेकेट आणि टी एस एलियट यांना नोबेल पुरस्कार आहेत -- त्यांना नेमाड्यांनी दुय्यम साहित्यिक म्हटलेले आहे -- माझ्या मते ते दोन्ही ग्रेट साहित्यिक आहेत !

कारण मानवी मन या विषयाच्या खोलात न गेलेला, फक्त मतमतांतरे या क्षेत्रात खेळणारा, हा विद्वान पण निरुपयोगी समीक्षक आहे.

.लेखक म्हणून नेमाड्यांचे मूल्यमापन होईल, तेही व्हायलाच हवे -- पण, समीक्षक ? नेमाड्यांसारखेच शेरेबाजीचे स्वातंत्र्य घेऊन मी म्हणतो -- मराठीतला हा विद्वान पण भुक्कड समीक्षक आहे !

कादंबरी वास्तव हवी -- ठीक -- समोर ' ट्रायल ' आहे. सांगा ना, ती का फालतू ते !

त्यांना फक्त तथाकथित वास्तववाद कळतो -- त्यांना जे कळत नाही त्या सगळ्यांना ते दुय्यम किंवा फालतू म्हणतात -- ही त्यांची समीक्षा ! बेकेट दुय्यम आहे ना, ठीक आहे -- बोला ना मग ' वेटिंग फॉर गोदो ' वर आणि जगालाच द्या दाखवून हे कसे फालतू नाटक आहे ते !

मुळात लिखित समीक्षा काय आहे त्यांची ? आशयाच्या जंजाळात आणि खोलात ते कधी उतरलेत ?

आधीच तरुणी, त्यात दुर्बोध !

.दुःख, ताण, असमाधान -- हे अपरिहार्य आहेत का ? -- हा प्रश्न समजा घेतला, तर हा नुसता भात ?

नेमाड्यांनी बरीचशी समीक्षा ताशेरेवजा, सटरफटर मतप्रदर्शनाच्या पद्धतीने केली -- त्याच्या प्रतिक्रिया स्वीकारायची तयारी ठेवावीच लागणार ! त्यांना सगळे माफ, असे असू शकत नाही !

एलियटला मोठा म्हणणाऱ्या समीक्षकांना नेमाड्यांनी ' भाबडे ' म्हटले होते, मग आता त्या भाबड्यांना पावन करून घ्यावे का ?

.आभास, विसंगती असू द्या हो, पण पहिले काय कशामुळे होते आणि आता काय कसे बदलले, हे कळू द्या -- असे म्हणायचे आहे. समीक्षा म्हणजे लहरी मतप्रदर्शन, असे होऊ नये !

१. ' अवकाश ' चा सल्लागार सभासद या नात्याने मी आपणा सर्वांना या कार्यक्रमाला निमंत्रित करत आहे.
२. सदर कार्यक्रमाला प्रवेशमूल्य नाही.

समीक्षेच्या क्षेत्रातले नेमाड्यांचे काम म्हणजे ' काहीही बोलले तरी त्यात थोडे तथ्य असतेच ' या तत्त्वाचा मनोरंजक आविष्कार आहे !

पाली या बारीकसारीक किडे वगैरे खात असल्याने, त्या आपले घर स्वच्छ राखतात, म्हणून त्या मारू नयेत, असेही म्हटले जाते.

नीट वाचल्याशिवाय बोलता येणार नाही -- कारण काही महिन्यांपूर्वीच जयंत पवारांनी वास्तवाबद्दल वेगळे विचार मांडले होते आणि त्यावर मी ' खेळ ' मध्ये लेखही लिहिला होता.

अमोल, काय लिहिले याला महत्त्व नसावे -- खडूची पावडर हा एक उपाय आहेच. शिवाय अंड्याची टरफले, तंबाखू जाळणे, हेही उपाय आहेत. सगळ्यात भारी उपाय मोरपीस हा असल्याचे सांगतात. नाही तर मांजर पाळणे !

आपण आपापल्या प्रतिमा घेऊन जगतो. त्या स्थितिशील असतात, त्यांचे स्वरूप, अपेक्षा, चांगले-वाईट, नीती-अनीतीच्या कल्पना हे ठरलेले असते -- आणि दोन प्रतिमा एक असू शकत नाहीत, त्या वेगळ्याच असणार. म्हणजेच या ना त्या प्रकारचे अन्याय होतच राहणार, असे दिसते !

मी वर एक उदाहरण दिले आहे -- त्यावर प्रतिक्रिया देताना समाजमत असे दिसू शकते -- मनात माझ्या काहीही गोंधळ असो, मी समाजमताचाच आहे, असे दाखवत राहतो --

अहो, समाज जनरलाईज करतो आणि व्यक्ती म्हणते, तसे नको, हाच तर प्रश्न आहे --

म्हणजेच, आपण जे समूहमान्य निकष म्हणतो, त्यांना फारसा अर्थ नाही -- पण प्रत्येक व्यक्तीच्या जगण्यावर ते प्रभाव गाजवतातच --

माणसे छुपेपणा करतात तो समूहमान्य कल्पनांमुळेच ना --

म्हणजे, ' चांगली व्यक्ती ' ही समाजाने वा समूहाने ठरवायची गोष्टच नाही, असे म्हणावे का ?

उदा विवाहित पुरुष आणि अविवाहित स्त्री यांचे प्रेम असणे --

कोणताही मार्ग पूर्ण मनासारखा नसल्याने संघर्षमयच / आतरद्वंद्वात्मकच असतो -- त्यामुळे मार्गावरून सकसता ठरवणे अवघड आहे.

-- आणि इथल्या चर्चांतून अमुक एक निष्कर्ष निघायची गरज नाही -- त्या विषयाच्या अधिकाधिक बाजू समोर याव्यात, हाच हेतू चांगला, असे मला वाटते --

अरुंधती, आपण प्रतिमांनी जगत असतो -- प्रतिमा स्थितिशील असतात, प्रवाही नसतात. नियंत्रण-केंद्र आणि नियंत्रण करण्याचे प्रदेश व हजारो गोष्टी -- असे हे चालू असते. मनासारखे नियंत्रण न होण्याची भीती -- हे भीतीचे मूळ स्वरूप असते. स्वतः नष्ट होणे, आजारपण येणे, अपमान होणे, जवळची व्यक्ती दुरावणे, अपयश येणे, आहे ते सुख न टिकण्याची वा हरपण्याची शक्यता -- अशा अनेक प्रकारच्या भीती त्या प्रतिमेत अध्याहृतच असतात. प्रतिमा म्हणजे अपरिहार्यपणे हे सगळे असते.

.मी निव्वळ प्रोव्होक करण्यासाठी लिहीत नाही --

क्षणोक्षणी कळो न कळो, पण मनःस्थितीचे द्विधा स्वरूप हे भीतीयुक्तच असते -- समोरून वाहन आल्यावर पटकन बाजूला होणे, हे ठीक आहे -- पण, असा काहीच शारीरिक धोका नसूनही मन भीतीयुक्तच असते --

मनाचे कधीच काहीच पूर्ण नसते -- ते नेहमी द्विधा अवस्थेत असते -- त्या द्विधा अवस्थेचा तात्पुरता विसर म्हणजे खुशी, बाकी सर्व गम !

अतिरेकी, धर्मवेडे असे काही अपवाद सोडले तर मन असणे याचा अर्थच भीतीयुक्त असणे !

फ्रेंडस, मनाबद्दलच्या माझ्या बऱ्याच पोस्टस या प्रत्यक्ष निरीक्षणावर आधारित असतात -- शास्त्राच्या अभ्यासावर अथवा पुस्तकांवर आधारित नव्हे --

उदा अपराधी भावनेचा प्रश्न -- तोच घोळत ठेवला तर कधीच संपत नाही -- पण त्याबाबतचे सर्व प्रयत्न सोडून दिले तर मन त्यातून मुक्त होते -- असे एक क्षण झाले तरी त्या प्रश्नाची शक्ती संपते --

खरे तर यावर नीट बोलले जायला हवे -- जन्माला येऊन काय करणे महत्त्वाचे ? नगरसेवक होणे ? कवी होणे ? दुकानदार होणे ?

जगण्यातले क्रौर्य आणि कला-तत्त्वज्ञान या जणू असंबद्ध गोष्टी आहेत आणि कला-तत्त्वज्ञान ही फक्त मजेत जगणाऱ्यांची चैन आहे -- अशी मांडणी वारंवार का होत राहते ? -- हे करताना कोणती कला, कोणते तत्त्वज्ञान आपल्या नजरेपुढे असते ?

और समीक्षक वही जिसके घर लेखक चक्कर काटे ।

ते ठीक आहे, पण बक्षीस मिळवायच्या युक्त्या आम्हालाही सांगून ठेवा !

मूलभूत प्रश्नाबाबत ' बघू नंतर ' हे धोक्याचे !

ही जबरदस्त चर्चा अजून चालू आहे -- मधेच -- या चर्चेला एफबीवरच्या लक्षणीय चर्चा निवडताना नामांकन मिळेल, हे नक्की !

We live with images and relate with images only. Actual total seeing means the existence of nothingness !

या चर्चेत उपस्थित झालेले मुद्दे पाहता हा किती महत्त्वाचा विषय आहे, हे स्पष्ट होते. प्रगत म्हटल्या जाणाऱ्या समाजांमध्ये याबाबत काय परिस्थिती आहे, तेही माहीत असलेल्यांनी सांगावे.

.एकनिष्ठपणा मानसिक की शारीरिक -- हा प्रश्न पहिल्याच कॉमेंटमधून आलेला आहे --

" तिच्याकडे पोचायचे आहे असा विचार जरी मनात आला तरी ती ढुंकूनही पाहणार नाही ! " -- असे गालिब म्हणाला असता !

मला असे दिसते की तो त्रासदायक अनुभव पीळरूपात शारीरिक होतो -- हा शारीरिक पीळ घालवण्याचा आणि त्या अनुभवाचा संबंधच नसतो -- उलट, जितके तुम्ही तो-अनुभव-केंद्रित व्हाल, तेवढा तो पीळ वाढत जातो --

Wholeness is nothingness.

खूप धाक, खूप भीती तयार करून, साधे, मस्त, मजेचे जगणे मारले जाऊ नये !

अभिनय, कल्याण निर्मित ए, आपण चहा घ्यायचा? उद्या दि.७ मार्च २०१३ एन.सी.पी.ए. सायं. ६:३० वा. वेळ मिळाल्यास जरूर या!!
प्रयोग आज आहे -- तारीख-वार पाहावा !

काय काय आल्टर करून देणार ?
सुंदर बनवायचे दहा हजार, बुद्धिमान बनवायचे दहा लाख आणि शहाणे बनवायचे एक कोटी !

आम्ही बरे की मग त्यापेक्षा -- आमची नाटके आली कधी, गेली कधी -- हे काहीच आम्ही कुणाला कळूही देत नाही !
जे माहीत नाही त्याचा निष्कर्ष नको -- या क्षणी हा पीळ जाऊ शकेल का, असा प्रश्न तरी यावा --

ना. स. का. पाटलांना अत्रे नासका पाटील म्हणत असत !

राजकारण, अंडरवर्ल्ड, ब्लॅकचे धंदे, टोळ्या, खंडण्या, अपहरण, खून, धमक्या -- अशा सगळ्या गोष्टींत प्रभाव वाढवल्याशिवाय स्त्रिया त्यांचे महत्त्व कसे वाढवणार ?

वापरात नसलेली भाषेची क्षमता जिवंत राहते की नाही राहात -- हा प्रश्न आहे. शेवटी शब्दसंग्रह, अभिव्यक्तिपद्धती, असंख्य विचार, मनाच्या हालचाली, हे सगळे भाषेत येऊ शकणे -- यात अनेक वर्षांचे अनेकांचे योगदान असते. सगळ्याच गोष्टींचे ३०२ होत नाही. त्यामुळेच तर भाषा वाढत, प्रगत होत जात नाही का ?

Arun Bhalerao -- फारच छान विवेचन ! माझा प्रश्न थोडा अनुत्तरित राहिलाय -- ज्ञानेश्वर, तुकाराम, आरती प्रभू, कोलटकर यांचे काव्यलेखन समजून घेणेच बंद पडत जाणे -- यामुळे सापडलेल्या क्षमतांचा प्रदेश हातचा जात नाही का ? -- हा मुद्दा राहिलाय --

माहितीची भाषा आणि सूक्ष्मार्थ अभिव्यक्तीची भाषा ( उदा कवितेची भाषा ) यांतला फरक पाहिला तर काय म्हणता येईल ?

काफ्काने त्याच्या वडिलांना लिहिलेले ५० पानी पत्र या संदर्भात जरूर वाचावे.

तुम्ही म्हणता तशी व्याकरणाची चूक आहे -- कॅमेरा झटकन त्या दुसऱ्या व्यक्तीत गेल्यामुळे ती झालेली आहे -- ललित लेखनात अशा मानसिक क्रियांमुळे व्याकरणाच्या चुका होऊ शकतात -- पण त्या तशाच राहू द्याव्यात, असे मला वाटते, कारण त्यातल्या मानसिक प्रक्रियाच महत्त्वाच्या असतात !

सश्रद्ध असो की अश्रद्ध, सगळेच मर्यादित वैचारिक मत या स्वरूपातच असतात. इथे अकलेचा, शहाणपणाचा संबंधच काय ? कोणत्याही प्रकारची शक्तीच ( सामूहिक, आर्थिक ) महत्त्वाची ठरणार ! ' सहिष्णुता ' हा नुसता एक स्वप्नील शब्द आहे !

चिं. त्र्यं. खानोलकरांच्या ' माकडाला चढली भांग ' या वगनाट्यातला भालेकरांचा अभिनय ज्यांनी बघितला आहे, ते त्यांना कदापि विसरणे शक्य नाही ! एक महान नट !

आपल्या लेखनात कुणी इंटरेस्ट घेत आहे हे पाहून अर्थातच आनंद वाटतो !

मूलभूत निरर्थकता म्हणजे मनाचा एखादा मूड नव्हे.

जरा उदात्तीकरण करायचे तर असे म्हणता येईल -- " नियती चाहती है कि मेरा टाईम वेस्ट हो ! "

भीती वाटणे, क्रोध येणे, टेन्शन घेणे -- यांना साधे बोलताना आपण मनाच्या कृती म्हणतो. त्याच अर्थाने, हा मनाचा एक वेगळा प्रश्न म्हणून इथे पाहिला आहे. वैज्ञानिक सत्य -- शरीराशिवाय मन नाही -- असेच आहे.

__________/________ " किस्त्रीम " ने एक पिढी घडवलीय , सामाजिक भान,वैज्ञानिक दृष्टीकोन जपणारी,उद्योगशिलतेला चालना देणारी किस्त्रीम मधली लेखक मंडळी आजही मनात आहेतच …किर्लोस्कर समूहाच्या प्रकाशनान मध्ये हे सारे ज्यांच्या द्रष्टे पणा मुळे झाले ते मुकुंदराव किर्लोस्कर …याना विनम्र श्रद्धांजली !
सुमारे सहा महिनेच फक्त मी तिथे होतो. अधिक बऱ्या पगारासाठी मी बँकेतली नोकरी घेतली. दत्ता सराफ, श्रीभा महाबळ, विद्या बाळ, वगैरे -- अशी आमची संपादकीय टीम होती. सराफ मुख्य संपादक होते -- त्यांच्याशी आमचा जास्त संबंध येत असे. इथे आपल्या फ्रेंडपरिवारात सराफही आहेत -- ते जास्त सांगू शकतील.

बजेटच एक फार मोठा फायदा आपण लक्षात घेत नाही -- दुसऱ्या दिवशीचे ( म्हणजे बजेट वृत्तांकन असलेले ) पेपर चटकच वाचून होतात !

युनिकोड देवनागरी न वापरणे हा आळस की अट्टहास की ते खूप अवघड आहे म्हणून ?

मला एक साधा प्रश्न आहे -- भाषेच्या शक्यता आणि क्षमता वापरात असणे आणि समजून घेण्याच्या प्रक्रियेत असणे -- हे जेव्हा कमी कमी होत जाते तेव्हा त्या प्रमाणात ती भाषा मरत चालली, असे म्हणावे की नाही ?

कोणतेही मत, मग ते बुद्धिप्रामाण्यवादी असो की परंपरावादी असो की अस्मितावादी असो -- ते मर्यादित आणि हिंसकच असते !

तुम्ही चित्रपट सृष्टीत गेलात की, वेड्यासारखे दिसले तरी चालेल, तुमच्या बोलण्यात इंग्लिश शब्द येणे, चुकीची इंग्लिश वाक्ये बोलली जाणे आणि मराठी शब्द आठवायला तुम्हाला खूप त्रास होतोय असे दिसणे, हे घडावेच लागते !

" दर वर्षी मी साईबाबा, गजाननमहाराज आणि गोंदवलेकर महाराज एवढे करतोच ! गेल्या वर्षी माझे साईबाबा राहिले तर फार चुटपुट लागून राहिली ! " -- एक ऐकलेले वाक्य.

नथिंगनस आणि समथिंगनेस यांतला घोळ सुटल्याशिवाय काही समजणे अवघडच दिसतेय !

फ्रेंडस, लाईक्स, कॉमेंटस मिळवण्याची वा कोणताही डंका पिटण्याची मुळीच हौस नसूनही, मीही मधून मधून असे स्टेटस देत असतो -- मानवी जगणे समजून घेणे, काही महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधणे, अशा प्रकरचे हेतू असतात. मुळात जगण्यातला हा अत्यंत महत्त्वाचा प्रदेश आहे, टाळता येणारा नाही. त्यामुळे अनेकांच्या मनांतले या बाबतीतले प्रश्न इथे चर्चेला येऊ शकतात -- त्यांची हेटाळणी करू नये वा त्यांना प्रतिबंधही करू नये, असे मला वाटते. भरपूर लाईक्स आणि कॉमेंटस येणारे आणखी कोणकोणते विषय आहेत, तेही पाहिले पाहिजे -- आणि हा एकच विषय तसा असेल तर यावरच्या भरपूर चर्चेची गरज त्यामुळे अधोरेखित होते.

आभास, या प्रश्नाचा वेध घ्यावा लागणार आणि तो सवयीच्या क्षेत्रात घेऊन उपयोग नाही, हे लक्षात आल्यावरही, उरलेल्या सगळ्याला अध्यात्मिकच म्हटले जाते, हा प्रॉब्लेम आहे !

मोबाईलला भ्रमणध्वनी किंवा चलभाष का नाही रूढ झाले ? शेवटी त्या त्या काळातल्या माणसांना जे आत्मसात होते ते खरे ! शुद्धतेबद्दल वा ' आपल्या ' शब्दांबद्दल फार टची राहायचे कारण नाही.

ज्ञानपीठ न मिळालेले मंगेश पाडगावकर, गदी, वपु, पुल आणि जीए -- हे सुलक्षित म्हणता येतील --

अत्यंत प्रसिद्ध, मध्यम प्रसिद्ध, अप्रसिद्ध, अत्युच्च पुरस्कारप्राप्त, मध्यम पुरस्कारप्राप्य, किरकोळ पुरस्कारप्राप्त -- अशा सगळ्यांनाच जर आपण दुर्लक्षित आहोत, असे वाटत असेल तर सुलक्षित कोणाला म्हणावे, हा प्रश्न येतोच !

स्वामित्वभावनेची तीव्रता जितकी अधिक तितके विश्वासाचे प्रमाण कमी !
मनाची सवय प्रश्नांकित करणे आणि त्या सवयीचे उदात्तीकरण करणे -- असा तो फरक आहे ! अनंत, दोन्ही एका वेळी नाही होऊ शकत ! सक्ती नसली तरी निवड होणारच !

त्रास, त्रागा नव्हे -- हे फक्त जगण्यातले महत्त्वाचे प्रश्न फ्रेंडसशी शेअर करणे !

माळ्याने जसे नेले तसे पाण्याने जावे -- असे ज्ञानेश्वर म्हणतात. माळी म्हणजे लाईफ !

श्रीरंजनने हा लेख अनेक प्रभावांचा वेध घेत आणि अंतर्विरोधाच्या नेमक्या प्रश्नाचा निर्देश करत लिहिला आहे. जे आहे ते स्वच्छपणे समजून घेणे, हीच कोणत्याही प्रश्नाबाबतची पहिली कृती असायला हवी. प्रश्न नीट मांडण्याचे महत्त्वाचे काम त्याने उत्तम केलेले आहे. तो आपला मित्र असणे हे नक्कीच विशेषत्वाचे आहे.

सोड, मी या जगासाठी नाहीये, सगळीकडेच मिसफिट आहे मी;

सगळे मिसफिटच असतात, बऱ्याच जणांना आपण ' जनरल ', ' नॉर्मल ' आहोत, असा आविर्भाव टिकवणे जमते, एवढेच !

Satish Tambe -- नेमाडे हे समीक्षक नाहीत, यावर आपले एकमत झाले, असे समजतो --

नेमाड्यांना आशयाच्या अंगाने फारसे काही समजत नाही म्हणून बोलताही येत नाही -- असे मी म्हणतो आहे -- हे सैद्धांतिक किंवा दुसरी कसलीही समीक्षा करतात म्हणजे काय करतात, असा माझा प्रश्न आहे --

अरे, आशयाबद्दल ज्याचे काहीच भाष्य नाही तो कसला भाष्यकार ? बेजबाबदार समीक्षक !

मूर्तिभंजक लोक स्वतःच्या मूर्त्या घडवत बसले !

नेमाडे हे ढोंगी, निर्बुद्ध समीक्षक आहेत -- हे माझे जबाबदारीने उच्चारलेले वाक्य आहे !

नेमाडे , समीक्षक म्हणून काय आहेत, यावरून एक तर हा विषय समजेल आणि नंतर नेमाड्यांसह सगळ्यांकडेच नीट पाहता येईल -- होऊ दे ना हे --

उगीच हवेत गप्पा नकोत म्हणून एक प्रश्नच समोर ठेवतोय -- दिलीप चित्र्यांच्या ' कवितेनंतरच्या कविता ' या कवितासंग्रहाला भालचंद्र नेमाडे यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतली ही वाक्ये आहेत -- त्यांनी मराठी कविता खऱ्या अर्थाने भावोत्कट केली. नवी शब्दकळा कवितेत रूढ केली. शब्दकळेचा अतिव्यय हे त्यांचे जगण्याचा उत्सव साजरा करण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. ......... भाषेला सतत कवितेच्या सार्वभौमत्वाचे भान देणे ... ( म्हणजे काय, हे कृपया कुणीही

सांगावे ) ---- या सगळ्याला सैद्धांतिक समीक्षा म्हणावे की ढोंगी शाब्दिक समीक्षा म्हणावे ? मराठीतला हा महान समीक्षक आशयाच्या अंगाने एक शब्दही बोलू शकत नाही -- हीही सैद्धांतिक समीक्षा ?

।। आमंत्रण ।। " अभिनय, कल्याण निर्मित " ए, आपण चहा घ्यायचा?....( दोन प्रयोग ) शुक्रवार दि.२२.२.१३ सायं. ७ वा. बालगंधर्व रंगभवन, पेट्रोकेमिकल टाऊनशिप, नागोठणे. ------------------------------------------------- नवी मुंबई म्युझिक ॲन्ड ड्रामा सर्कल आयोजित रविवार दि.२४.२.१३ सायं. ७ वा. कम्युनिटी हॉल, सेक्टर ३, वाशी - नवी मुंबई फ्रेंडस, अभिजितने प्रयोग चांगला बसवलेला आहे, त्याची टीमही चांगली आहे -- ज्यांना शक्य असेल त्यांनी मुळीच चुकवू नका !

सैद्धांतिक समीक्षेचे निकष शेवटी ' मानवी श्रेयस ' या संकल्पनेवर आधारित असतात. सामाजिक बांधिलकी, रूपवाद, ॲब्सर्डिटी, अतिवास्तववाद, किंवा नेमाडे म्हणतात तो वास्तववाद, वगैरे पद्धतींनी होणारी समीक्षा म्हणजे सैद्धांतिक समीक्षा -- हे बरोबर आहे का ? की आणखी काही अभिप्रेत आहे ?

मी तेच करणार होतो कारण भालेरावांचा आणि माझा ' संस्कृती ' चा अर्थ वेगळा असावा, अशी शंका यायला लागली. विशिष्ट संस्कारांनी मन घडवत जाणे याला मी ' संस्कृती ' म्हणत नाही. मनाची अलगता जाऊन जगण्यात समावेशकता येणे म्हणजे संस्कृती. ती नुसती एक विकसित मानसिक अवस्था नसते वा निव्वळ बौद्धिक वाढही नसते. ती भानाच्या रूपात असते. यालाच मी ' समग्रावधान ' असे म्हणतो.

वेदना, दुःख, विध्वंस -- हे सगळे आवडत असेल तर तसे जरूर म्हणावे !

संस्कृतीचा स्पर्श असेल तर मन आणि संस्कृती हा भेद नसतो, त्यामुळे त्यांच्यांत तरतमही असू शकत नाही ! मन हे अलगतावादी आणि सतत संघर्षमय आणि हिंसक असते ( ते कुणाशी जुळणारे असो वा नसो. ) त्यामुळे त्याचे स्वतंत्र महत्त्व नाही.

मन आणि संस्कृती यांचे साहचर्य असायला हवे -- भेद असू नये --

आणि मी किती माणुसकीचा भोक्ता, हेही सिद्ध होत राहणे, बरेच की !

या प्रकारचे आज काय आहे -- यावर फारसे काही इथे आले नाही -- त्यामुळे आज, परिपक्व वाटून घेण्याऐवजी परिपक्व असण्याचा काळ आलेला आहे, अशी सुवार्ता सगळीकडे पसरवायला हरकत नाही !

पण ' लिव्ह विथ व्हाट इज ' हे जेकेंचे मला शिरसावंद्य आहे !

इथे लोकांचे ब्रेनवॉशिंग झालेले आहे -- ' तू व्यापतापाने दमलेला, खचलेला, बोंबललेला माणूस आहेस ! दोन घटका करमणूक -- एवढी संस्कृती तुला खूप झाली ! ' जणू जगात इतरत्र सगळी नीट व्यवस्था असल्यावर, ताण-व्याप नसल्यावरच सांस्कृतिक कृती घडतात !

भाषाच पंक्चर होत चाललीय !

' भूमिका नुसती घेणे ' म्हणजे ? ड्राय नको किंवा त्याबरोबर चखणा असावा -- असे का ?

असह्य होणाऱ्या ' एकाकीपणा ' या मानसिक अवस्थेबाबतची ही पोस्ट आहे.

सॉरी मित्रांनो -- तुम्ही देवनागरीचा वापर का करत नाही ?

' जिंदगी ' आणि ' दुनिया ' या नावांचे पूर्ण चित्रपटही येऊन गेले ! शिवाय, हे शब्द असलेल्या अनेक नावांचेही !

सखोल, प्रदीर्घ, समजुतदार, एकमेकांच्या थोड्याफार चुका माफ करू शकणारी, कॉमन इंटरेस्टस असलेली, आणि प्रेमभावनेचा अंश असलेली, अशी मैत्री म्हणतोय मी -- ती लग्नापर्यंत जावो न जावो --

ही चर्चा नीट झालेलीच नाही -- कदाचित माझी शब्दयोजना अपुरी असेल -- इथे पोस्ट खूप मोठ्या नसाव्यात, असे माझ्यापुरते मी ठरवल्यामुळे हा घोटाळा झाला असेल --

अजून तरी यात ज्ञानात भर म्हणावे असे फारसे काही आलेले नाही -- उदा० आजची सत्यता --

अनंत फक्त तंबोऱ्याची चौकशी करताहेत म्हणजे मेन गायक त्यांनाच व्हायचेय, असे दिसतेय !

एकाकीपणा ही विकृतीकडे नेणारी एक त्रासदायक / नकोशी वाटणारी अवस्था आहे -- तीतून बाहेर पडावे यासाठी धडपड होते -- अशा वाईट, दुःखमय अवस्थेबाबत ही पोस्ट आहे. एकाकी मन एकाकीपणावर मात करायचा प्रयत्न करते तेव्हा तो एकाकीपणाच अधिक तीव्र होतो !

.संबंध न समजणे, त्यांबाबत गोंधळ असणे, गैरसमजांतून वागले जाणे, अनावश्यक संघर्षमयता असणे, असुरक्षित / भयग्रस्त असणे -- हे सगळे कशामुळे घडते मग ? या समस्या नाहीत ?

उदा. अनेक देश युद्धाची जय्यत तयारी राखत शांततेची / दोस्तीची बोलणी करतात !

.आभास, तुम्ही म्हणताय ती तुच्छता अलगतावादामुळेच आहे -- अलगता आहे पण तुच्छता नाही -- हे होणे नाही --

कुठलाही महात्मा बाहेरच्या महात्म्याची वाट पाहात नसतो -- महात्मा हा जर आपला आदर्श असेल तर आपण का बाहेरच्या महात्म्याची वाट पाहावी ? अनाहूत सल्ला -- ' वेटिंग फॉर गोदो ' वाचा --

जगणे समजून घेणे हे खूप गंभीरच असले पाहिजे, असे काही नाही -- हसतखेळतही गंभीरपणा असू शकतो !

बच्चन अमर नाही, अँथनी आहे !

।। आभार ।। आकार आयोजित अव्वल एकांकिका स्पर्धेत अभिनय, कल्याण निर्मित " वेडिंग एनीवर्सरि " ....a tale ऑफ loneliness अव्वल एकांकिका अव्वल लेखक: विद्यासागर अध्यापक अव्वल दिग्दर्शक: अभिजित झुंजारराव अव्वल अभिनेता: रितेश घाडी अव्वल अभिनेत्री: नेहा अष्टपुत्रे अव्वल प्रकाश योजनाकार: जयदीप आपटे सर्व रसिक प्रेक्षक, कळत न कळत मदत करणारे अनेक हात आणि हितचिंतक ह्यांचे ऋणी आहोत. धन्यवाद !!!
पुण्यात येशील तेव्हा चहाबरोबरच हाही प्रयोग लावता येतो का ते बघ.

मला वाटत होते -- ' जाग रे राजसा, प्रीत ढेपाळली ' !

बाप रे ! अकल्पनीय परिवर्तन ! मला तर वाटते, भविष्यात एक काळ असा येईल की, पूर्ण आयुष्य जगून झाले आहे, असा क्षण, आत्ताच आणून दाखवा !

.

( जातीपातीभेद आणि गावातले एकमेकांचे हाडवैरी असलेले दोन गट -- या सर्वांचा मी मित्र होतो ! -- आणखी खूप सांगता येईल -- )

मान्य ! आणि शेपाचशे मित्र जमवणे अवघड नाही ! ( आता तुम्हाला एक गंमत सांगतो -- लेखनाचा संबंधच नाही -- माझी एका खेड्यातून बदली झाली तेव्हा जामिनावर सुटून आलेले सरपंच तर तडक मला भेटायला आलेच पण आजूबाजूच्या दहा गावांचे सरपंच आले -- तुम्ही इथे राहा म्हणाले -- त्यासाठी तुमच्या बँकेला किती सह्या हव्यात ते सांगा म्हणाले ! म्हटले, मी मुलांना लांब ठेवले आहे, त्यांच्या जवळ जातो आहे, मलाच जायची इच्छा आहे -- मग ठीक, म्हणाले ! )

.संधी न मिळाल्यामुळे वा भीतीमुळे खूप वर्षे एखाद्याकडून अनैतिक म्हणण्यासारखे वागलेच गेले नाही तर तो माणूस तथाकथित नैतिक पॅटर्नमध्ये फिट होतो -- मग त्याला तेच सेफ वाटायला लागते -- आणि तसे नसणाऱ्यांना तो दूषणे देऊ लागतो !

अरुणजी, तुमची मांडणी खूप इंटरेस्टिंग आहे पण एकाकीपणा हा तुम्ही एकटे आहात की दुकटे की अनेकांबरोबर -- यावर ठरत नाही, हा प्रॉब्लेम आहे !

. भोवतालचे लोक आणि मी यांत भेद असणे, मी स्वतःला अलग समजणे -- हे मूळ कारण आहे. असेच जगायला समाजाचे प्रोत्साहन नव्हे, सक्ती आहे. या अलगतेतून सगळीकडे संघर्षमयता येते, असे दिसते. याचे समाजशास्त्र म्हणजे काय करायचे ?

साशंक माणसे नक्कीच आशावादी असतात ! ( समाज आपल्याला आकार देऊन निकम्मा करत असतो आणि आपण ते स्वीकारत असतो ! )

खैरनारजी, कॉलेजजीवनाचा आणि प्रेमाचा असा काही एक्स्क्लुजिव्ह संबंध नाही. जन्मापासून मरेपर्यंत नेहमी नवी आणि ताजी राहणारी ही गोष्ट आहे -- त्यामुळे, तिच्यातले ' चमत्कार ' तत्त्वही कधीच कमी होणार नाही.

.अगदी झाडाचे पान तयार होणे, हाही चमत्कारच आहे, म्हणून ' विशेष ' म्हटले -- पण ' विशेष ' हा शब्द मानवी बुद्धीमुळे आला आहे -- तो कितपत ग्राह्य आहे -- हा आक्षेप कसा कुणी घेतला नाही, अजून ?

एकाकीपणा ही त्रासदायक अवस्था आहे -- प्रमाणाबाहेर गेल्यास त्याला रोगच म्हणावे लागते --

मनाचा कंटेंट हा द्वंद्वात्मक अवस्थेत असतो -- तो मूल्यात्म नसतो. म्हणूनच नुसते अनुभव प्रक्षेपित करणारी कलाकृती मूल्यात्म नसते.

मनाची सततची द्वंद्वात्मक, तणावग्रस्त अवस्था लक्षात घेतली तर या अर्थाने मन हे फक्त पापीच असू शकते. पुण्यवान मन, असे काही नाही.

' तसे ' म्हणजे खटकणारे -- संताप, हिंसा निर्माण करणारे. असत्य आणि अन्याय यांची निर्मिती करणारे, या अर्थाने मनाला पापी म्हटले आहे.

ज्याचेत्याचे आदर्श वेगवेगळे -- असे म्हणू फार तर --

मेघना पेठे यांच्याबद्दल लेखिका म्हणून मला अत्युच्च आदर आहे पण वर दिलेले विवेचन खूप अपुरे वाटते. पूर्ण भाषण तर ऐकलेले नाही. सामान्यीकरणाला खूप मर्यादित अर्थ असतात हे समजूनही एक लक्षात घ्यावे लागते की आधी सत्ताधारी बदलत नाहीत -- आधी शोषितच बदलतात. तरीही, सामान्यीकरणाच्या स्तरावरही, पुरुषही खूप बदलत चालले आहेत, असे दिसते. मुळात हे प्रत्येक नात्यात घडणारे वेगळे जगणे आहे. माणसाच्या प्रत्येक नात्यात प्रश्न निर्माण होण्याची जी कारणे आहेत तीच इथे आहेत -- फक्त स्त्री-पुरुष या नात्याची वैशिष्ट्यपूर्णता समाजातच खूप तीव्र आहे, हे दुर्लक्षिता येणार नाही. त्यातूनही, समजुतदारपणा वाढतो आहे की नाही, हे पाहणे महत्त्वाचे आहे -- ते जास्त अर्थपूर्ण होईल.

माझ्या आठवणीप्रमाणे अरुण खोपकर हे चिं त्र्यं खानोलकरांना काही निवडक पुस्तके वाचायला देत असत --

मृत्यूनंतर ते जास्तच प्रसिद्धिपराङ्मुख होतात !

' जो भी है वो ठीक है, फिक्र क्यों करें ' -- असे काही तरी गाणे होते पूर्वी -- ते आजही अमर दिसतेय !

माझ्या एका नाटकातला ' होऊ घातलेला लेखक ' म्हणतो, " आणि शेवटी मी लिहिणार उपोद्घात ! " -- तो विनोद ( त्याला ' उपसंहार ' म्हणायला हवे, हे विसरून ) या पुस्तकातही घडलेला आहे. इथे पूर्ण पुस्तक-परीक्षणाचा हेतू नाही.

अनुभव विसरायचे नाहीत -- त्यांचे व्रण, भलेबुरे प्रभाव विसरायचे !

बरोबर-चूक, चांगले-वाईट असे पूर्वग्रह न बाळगता माणसाचे जगणे त्याच्या सर्व प्रभावांसह पेललेले असणे -- हे मला साहित्यकृतीच्या मूल्यात्मकतेचे प्रमुख लक्षण वाटते. ते इथे आहे. वपु आठवणे हा मोठा अन्याय होईल. इथे सुभाषिते नाहीत. काही पाने त्या दर्जाची नसणे, असे होऊ शकते, पण लेखकाने जी उंची गाठलेली आहे, तीच त्याची योग्यता समजावी. आता, बरीच पाने नायिकेच्या उपस्थितीची असताना मधेच तिच्या अनुपस्थितीत इतर पात्रांचे चित्रण करणारी पाने असणे -- याला तांत्रिक दोष म्हणावे की नाही, हा मुद्दा विवाद्य असू शकतो.

या निमित्ताने का होईना ही ग्रेट कादंबरी वाचली जावी ! पण, अमर, कदाचित गरज नसेलही याची !

प्रियकर-प्रेयसींना वाटणे -- आपले प्रेम कायम टिकेल ना -- काही विचित्र तर नाही ना घडणार -- हा विचार भीतीदायकच असणार -- कारण हे कायमचे हवे आहे, हे ठरलेले असते -- ( पुढचे दोन प्रश्न -- यापुढे काहीच नाहीत -- )

कर्नाडांची काही नाटके मी पाहिली आहेत ! हे ग्रेटच ! ' हयवदन ' !

अमर, स्पर्शसंवेदनेबद्दल अतिशय्महत्त्वाचे विचार व्यक्त केल्याबद्दल धन्यवाद ! ' स्त्रियांना प्रेम नुसते स्पर्शातून नव्हे तर शब्दांतून व्यक्त झालेलेही खूप आवडते ' असा पोस्टचा मजकूर आहे -- भाषेचेही महत्त्व वाढवणे, हा हेतू !

भाषेला कोणतीही शिस्तच नको असे म्हटले तर तिची संपर्कक्षमताच नष्ट होण्याचा धोका निर्माण होईल. सध्या जी प्रमाणभाषा म्हटली जाते ती अधिकाधिक लवचिक आणि स्वीकारशील करत जाणे, हा मार्ग वाटतो. ( मी भाषेचा शास्त्रशुद्ध अभ्यासक नाही, त्यामुळे मी इथे जे काही बोललो आहे ते बिचकत बोललो आहे, असे समजावे. )

जशी कोल्हापूरची किंवा जळगावची मराठी तशी पुण्याची मराठी म्हणताय की प्रमाणभाषा म्हटली जाते ती म्हणताय, ते स्पष्ट व्हावे --

08:53 MF: बायदवे, चंद्रकांत देशपांडेंनी 'चॅटिंग इंटरेस्टिंग कसं करायचं' असला काहीतरी धागा टाकलेला आहे. तिथे आपल्या चॅटलॉग्जची झलक टाकावी असा विचार आला होता.

How to make chatting interesting ? -- हे नेटवर असणारच -- आपल्या अनुभवांतून काही मिळते का, हे पाहणे जास्त अर्थपूर्ण ठरले असते, असे वाटल्याने ही पोस्ट दिली होती -- आपण का हा शोध घेऊ नये, असा विचार होता --

चॅटिंग हाच चॅटिंगचा विषय होऊ शकत नाही -- गुप्ततेचे क्षेत्र गुप्तच राहणार -- आहे खरा हा प्रश्न !

स्वयंपाक-पाणी-जेवणे उरकल्याशिवाय या विषयात काहीच मोलाची भर पडणे शक्य दिसत नाही --

कुठे गेल्या सगळ्या तडफदार मुली, स्त्रिया ?

सतीश, एक्स्पर्ट कॉमेंट लागेलच !

.फ्रेंडस, मी काही अज्ञ बालक नाही पण ज्ञानग्रहण आणि ज्ञानप्रसार यांवर माझा विश्वास आहे !

पुरुषाला आणि स्त्रीला आवडणारे असे काही कॉमन विषय असतात का की एकमेकांना आवडणाऱ्या विषयांत इंटरेस्ट घ्यायचे असते ?

.आभास, मी नम्र आहे, अजूनही मी विद्यार्थीच आहे --

.अधिक तरबेज होण्यासाठी म्हणू --

मराठी स्त्री-पुरुषांनी तरबेज व्हावे यासाठी हा विषय खोललाय --

काय विचार करत असेल हा इसम ? लांबून नेतोय बहुतेक...8-10 रुपये ला बुक्का बसणार जास्तीचा !! ...किंवा काय ? एकदा याने सहज एका रिक्षावाल्याला नाव विचारले -- रिक्षावाला टरकला -- माहिती आहे बहुतेक याला आपले नाव, या विचाराने त्याला घाम फुटला -- " बोलो, बोलो " -- हा अमिताभ म्हणाला. रिक्षावाल्याने रिक्षा थांबवली, बंद केली आणि तो खाली उतरला. " बख्तावर ! " असे नाव सांगून रिक्षा तशीच सोडून तो धूम पळत सुटला !

काय विचार करत असेल हा इसम ? लांबून नेतोय बहुतेक...8-10 रुपये ला बुक्का बसणार जास्तीचा !! ...किंवा काय ?

आपण अमिताभ आहोत असे समजून वावरणारा हा माणूस पुण्यातला आहे. अनेकांना माहीत आहे. रिक्षावाले त्याच्या जास्त नादी लागत नाहीत कारण वेळ पडल्यास तो मारामारीही करतो ! त्याला जवळच्या रस्त्याने सोडून मिळतील ते पैसे घेऊन ते पळ काढतात !

संजय, तुमच्या एफबी मैत्रीचा आणि इथल्या भेटीगाठींचा आनंद आहे -- पण एक विनंती आहे -- तुम्ही लौकरात लौकर देवनागरीचा वापर सुरू करावा -- इथली देवाणघेवाण अधिक बहारदार होईल --

दुसऱ्या एका खेड्यातले सांगतो -- एक अश्लील म्हणून गाजलेले तमिळ पिक्चर होते -- पिक्चरच्या पेट्या आमच्यामार्फतच येत -- मी सहज म्हणालो होतो की आज हे बघायला मी येणार आहे -- तर मी येणार म्हणून शो थांबवून ठेवण्यात आला होता -- घरी बोलवायला आले -- लगेच गेलो मग !

मी एक खेड्यात ब्रँचमॅनेजर असताना मला नावाने हाक मारून के एम बापू पाटलांनी एकदा असेच चकित केले होते ! ती काही त्यांची ट्रिक नव्हती -- सहज होते ते. त्यांच्या थोड्या खाजगी गप्पा ऐकायचाही मला एकदा योग आला होता. अत्यंत अभ्यासू आणि बुद्धिमान व्यक्ती, असेच ते माझ्या लक्षात आहेत.

स्त्री-पुरुष नात्यातला जगण्याचा एक आदर्श फॉर्म शोधतो आहोत का आपण ?

' म्हणून तर मी तुमच्याबरोबर आहे ' हे माझे पूर्ण सत्य नव्हे ! पण मनाच्या लेव्हलवर पुरुषी हरामीपणा, चांगुलपणा, प्रगल्भपणा -- असे सगळेच आहे ना ! आता बोला !

मला नातीच जास्त आहेत -- म्हणून तर मी तुमच्याबरोबर आहे !

काय भंकसगिरि आहे ? स्त्रियांना वैचारिक आव्हाने चालत नाहीत ?

मी असे एक वाक्य वाचले ( ज्यावर माझा विश्वास नाही ) स्त्रियांना विचार करायला लावणारा पुरुष आवडत नाही !

आशावादी मन -- ही मला अत्यंत खोटारडी, भंगार आणि कायमची निरर्थक कल्पना वाटते !

सर्व बाजू -- चांगला वकील देता येणे, स्वतः हलकटपणे बुद्धिमान असणे, धमक्यांना घाबरायची गरज नसणे, न्यायप्रक्रियेबाहेरचे सर्व शक्य डावपेच रचता येणे -- असे सगळे हो ! शक्तिमान म्हणजे फक्त आर्थिक स्वावलंबी, ही बावळट कल्पना आहे --

समजा लिव्ह इन आहे -- इथेही स्वामित्वाचे प्रश्न येतातच --लैंगिक स्वातंत्र्य असते का ? -- या फॉर्ममध्ये समजा काही प्रॉब्लेम आला -- निराकरण कसे होणार ? शक्तिमानाच्या बाजूने !

फॉर्म फक्त बदलतो, अन्याय तोच तसाच चालू राहतो -- हे दुर्लक्षून नव्या फॉर्मवर नुसती चर्चा करून काय निघणार ?

' आम्ही वाट लावू शकतो, बरबाद करू शकतो ' ही जाणीव देऊनच स्त्रियांनी प्रेम करावे !!!

माणसांच्या भंगार जगात माझे उत्तर ' होय ' असे आहे -- महायुद्ध जसे भीतीमुळे होत नाही -- तसेच हे जमवावे --

डावपेच, हलकटपणा, क्रूरपणा यांत स्त्रियांनी अधिक तरबेज व्हावे का ?

फ्रेंडस, मी जर एक जनरल विधान कले की ' न्याय हा शक्तिमानांच्या बाजूने असतो, कमकुवतांच्या बाजूने नसतो ' -- तर यावर तुमची प्रतिक्रिया काय आणि हे खरे असेल तर यावर उपाय काय ?

तुम्हाला फिलॉसॉफिक म्हटलेले आवडेल, न आवडेल -- अशी धाकधूक होतीच जरा !

होतेय काय, पोस्टमध्ये मांडलेला प्रश्नच एक तर तुम्हाला खोटा वाटतोय किंवा पोचत नाहीय -- आणि तो प्रश्न खरा आहे असे समजा काहींना वाटतेय, तर काय करावे ?

म्हणजे भाषा जीवघेणी होण्याची लेव्हल आली की एक तर भाषेने मरा किंवा अबोलीत कोंडून मरा -- असे का ?

नाट्यस्पर्धेच्या निकालाबाबत उत्सुकता फक्त -- धक्का बसणे-बिसणे नाही !

अहो, सगळ्यांनी मिळून ही जटिल अवस्था एकत्रितपणे समजून घ्यायचा प्रयत्न करू या, म्हणून तर दिलीय ना ही पोस्ट !

मला तसे मुळीच वाटत नाही -- ' मला सगळे समजते ' अशी सुरुवात करण्यापेक्षा गंभीर प्रश्नांच्या बाबतीत ' मला समजत नाही ' अशी सुरुवात करता येते आणि तीच श्रेयस्कर !

तुम्हाला निष्कर्ष सगळे माहीत आहेत आणि हमखास उपयोगी वाटतात तर ही चर्चा तुमच्यासाठी नाही, असे फार तर म्हणता येईल. इथे मूक सोसण्याचा पुरस्कार केला जातोय, हेही गृहीत धरताय कारण तुम्हाला तुमचे निष्कर्षच ' इलाज ' वाटताहेत !

अहो, नुसती जटिलता नसते ती -- गांडीला जाळ लागतो ! ' कुणीतरी सोडवा मला यातून ', असे म्हणायची वेळ येते ! स्वीकार, पराभव, भिडणे -- हे नुसते शब्द ठरतात ! सारखी निष्कर्षांची घाई -- ही सवय सोडून, याकडे पाहायला हवे !

संजयजी, हे बरे, ते बरे -- हे सगळे, डोस सुसह्य आहे तोवर ! टॉर्चर व्हायला लागले की ' बरे ' म्हणता येत नाही !

माझ्या एका नाटकात असा संवाद आहे -- " चल, पटापट विश्रांती घे आणि कामाला लाग ! "

बाप रे ! एकमेकांचे असणे म्हणजे पॉवर टु हर्ट असणे ! पण हे खरेही दिसते !

आज तब्येत नॉर्मलला आलीय, त्यामुळे वॉर्मिंग अपसाठी दोन विनोद करून घेतले !

' साहित्याने वाचकाला निराश करता कामा नये ' हेच मला साहित्याचे पायाभूत तत्त्व वाटते !

तांबेजी, त्यांना असे शब्दार्थ देऊन भागले नसते -- कवितेचा अर्थ म्हणून एक सुपर-दुर्बोध उतारा द्यावा लागला असता ! तेव्हा कुठे ( पोलिसी छळात ज्याप्रमाणे गुन्हा कबूल केला जातो, त्याप्रमाणे ) कविता कळल्याचे वाचकांनी कबूल केले असते !

घसा बिघडणे, ॲंटिबायोटिक्स यांच्या त्रासामुळे मी इकडे फारसा आलो नाही.

' उथळ ' आणि ' गंभीर ' हा जो फरक आपण समजतो, त्यात कितपत तथ्य आहे, हे तपासण्यासाठी दिलेली ही पोस्ट आहे.

.वापरातले शब्दच वापरले आहेत, मूल्यात्मक म्हणून नव्हे.

शहाणपण हे कष्टपूर्वक कमावलेले कौशल्य वा सवयीचे व्यक्तिवैशिष्ट्य असेल तर तेही गुगलता यायला हवे !

चाललेल्या मुद्यावर बोलू या -- ब्राम्हणी अनुभवक्षेत्र म्हणजे श्रेष्ठत्व नव्हे -- हा प्रकार इतरांना का लागू पडत नाही, ते सांगा --

शिक्षक, डॉक्टर या आदर्श व्यवसायांतले लोक विचारतात, " फ्लॅट घेताना आम्हाला ६० / ४० तून सवलत असते का ? "

निव्वळ कच्च्या मालाच्या स्तरावरच घुटमळणारे साहित्य ते सदाशिवपेठी साहित्य म्हणावे -- मग ते ब्राम्हणी असो की दलित असो की मराठा असो. अनुभवक्षेत्र कोणते वापरलेले आहे यावर साहित्याची श्रेष्ठकनिष्ठता ठरत नाही.

निळू फुल्यांचा मी फॅन कसला, भक्तच म्हणा ! सगळ्यांना खाऊन टाकले असते त्यांनी !

बुद्धिप्रामाण्यवादाशी बांधिलकी नसलेले असे समीक्षक कोण आहेत, त्यांच्या नावांची यादी खरेच यावी एकदा -- जगात सगळीकडे संशयास्पद झालेल्या, नव्हे नाकारल्या गेलेल्या प्रणालीच रेटत राहणे जास्त दिसते !

काही किरकोळ अपवाद वगळता, एकमेकांशी बोलताना स्त्री-पुरुषांचे अहंकार खूप कमी होतात, हे एक कारण असावे, संवाद अधिक चांगला होण्याचे !

दैनंदिन जगण्यात थोडी सहानुभूती, थोडी आपुलकी यांना स्थान दिले गेले तर सगळ्यांनाच खरे तर किती दिलासा मिळेल ! त्यासाठी फार मोठा त्रास वा त्यागही लागणार नाहीय !

सत्य-असत्याशी मन केले ग्वाही । मानियले नाही बहुमत ।। या अंगाने हे पाहता येईल.

पूर्ण नायक किंवा पूर्ण खलनायक हे फक्त पिक्चरमध्ये असतात ! वास्तवात सगळे मिक्स्चर !

ज्यांचे आपल्या प्रायोगिक रंगभूमीला प्रचंड योगदान आहे ते काकडेकाका !

इमेजमधून आणखी एक इमेजच बाहेर पडली तर आधीच्या इमेजच्या अभिमान-तिटकाऱ्याचा प्रश्न राहील. आपल्या अनेक इमेजेस असल्याने अमुक इमेज माहीत असून उपयोग नाही. आणि इमेजच्या एका भागाला पूर्ण इमेजचे भान येणार नाही. इमेजेस निर्माण होण्याची रचनाच टाकली जाऊ शकते का, हा खरा प्रश्न असावा.

त्या वेळी मी हा विचार केल्याचे आठवते. किंकाळीपेक्षा मला किंचाळीत कर्कशपणा जास्त वाटला, म्हणून मी तो शब्द निवडला. यास्मिन शेख यांचे ' मराठी लेखन मार्गदर्शिका ' हे पुस्तक पाहिलेत तर प्रकरण ९ वे -- ' हे शब्द असे लिहा ' -- असे आहे. त्यात किंकाळी आणि किंचाळी -- हे दोन्ही बरोबर दिलेले आहे. आता शास्त्रीयदृष्ट्या कर्कशपणा कुठे जास्त मिळतो हे कळले तर माझी निवड बरोबर होती की नव्हती ते कळेल.

एक गगनभेदी किंचाळी १) किंचाळी का किंकाळी ? शब्दकोशात किंकाळी आहे, किंचाळी असा शब्द नाहीय. किंचाळणे हे क्रियापद मात्र आहे. गंमत म्हणजे किंकाळी हा शब्द आहे शब्दकोशात व मराठी वापरात पण किंकाळणे असे क्रियापद नाहीय़. आवाज मोठ्याने येणे ह्यासाठी कि पासून सुरू होणारे इतर काही शब्द असे आहेत : किंक ( म्हणजे किंकाळी ) ; किंकट ( म्हणजे हत्तीचा चित्कार, आरोळी ) ; किंकणी ( म्हणजे घुंगरू ) ; किंकाळणे ( म्हणजे कर्कश स्वराने ओरडणे ) ; किंकाळी ( म्हणजे आरोळी ) ; किंकिणी ( म्हणजे घुंगरूमाळ ) ; किचकिच ( दाताखाली आलेल्या खड्याचा आवाज ) ; किंचाळणे ( किंकाळ्या मारणे ) ; किटकिट ( म्हणजे भुणभुण ) ; किनरी ( बारीक उंच आवाज ) ; किन्नर ( म्हणजे स्वर्गातील गायक ) ; किंपुरुष ( देवातील एक गायक ) ; किरकिर ( कटकट ) ; किर्र ( रानातला आवाज ) ; किलबिलाट ( पक्ष्यांचा आवाज ) ; किळच ( किंकाळी ) ; खिंकाळी/खिंकाळणे ( घोड्याचे ओरडणे ). वरील सगळ्या आवाजात मोठ्याने ऐकू येणारे आवाज कि पासून सुरू होणारे असून ह्यात किंचाळी येत नाही. अर्थात खूप लोक किंचाळी म्हणतात हे मात्र खरे आहे. कि व अनुस्वार ह्यानंतर क येऊन होणारे आवाजाचे शब्द आहेत पण किं नंतर च येणारे शब्द नाहीत. फक्त किंचाळणे हे क्रियापद मात्र वापरात आहे. तसेच किंकाळणे असे क्रियापद वापरात नाही. जर कोणी सर्वे घेतलाच तर मला वाटते किंकाळी म्हणणारे लोक ज्यास्त निघतील. किंकाळी ह्या शब्दात वाढत जाणारा नाद/घोष आहे जो किंचाळीत किं नंतर लगेच भंग पावतो. तुमच्याकडे Audacity नावाचा प्रोग्रॅम असेल तर त्यावर दोन्ही शब्द म्हणून पहा व कोणते सोनोरेंट वाटते ते ठरवा. तुमच्या सोयीसाठी मी इथे त्याचा एक फोटो देत आहे. किंचाळी त च च्या फ्रिक्वेन्सीज ळीच्या फ्रिक्वेन्सीएवढ्याच दिसतात, पण किंकाळीत का च्या फ्रिक्वेन्सीज ळी पेक्षा कमी दिसून ळी च्या फ्रिक्वेन्सीज मोठ्या ठरतात. त्यामुळे किंकाळीला ज्यास्त भारदस्तपणा येतो, किंचाळीपेक्षा.

कल्पना / विचारव्यूह स्थितिशील असतो तर जगणे प्रवाही असते -- प्रवाहाला स्थितीत जखडण्याचा हा प्रयत्न असतो -- हमखास हार होण्याची लढाई !

तेच -- आधी कल्पना आणि मग कृती यांतले द्वंद्व ! ते कधीच मिटणार नाही ! ढोंगाशिवाय काही निपजणार नाही !

फलाशा न धरता कर्म करावे -- हा मान्यताप्राप्त विचार असणे आणि प्रत्यक्ष जगणे तसे नसणे -- त्यातलाच हा प्रकार ! आधी नीतीकल्पना आणि मग तिला सुसंगत कृतीचा प्रयत्न !

स्मरणरंजन-कलाचाळीशी पुरुषोत्तम करंडक.१९७१.एकांकिका -- लिफ्ट.उपविजेते. मी,vasudeo palande,महान अभिनेते कै.मामा पेंडसे.(टोपीतले), शेवटी मोहन गोखले .
वासुदेव पाळंदे यांची आठवण जागी झाली ! ते, प्रि. बीना इनामदार आणि मी एका नाट्यलेखन स्पर्धेला परीक्षक होतो ! उत्तम स्मरणरंजन !

नेमाडे नुसती मते सांगतात -- आशयाच्या अंगाने मूल्यमापन करू शकतात का ?

तुम्हाला बोलायचे तेव्हा बोला -- पण मी अत्यंत निरुपद्रवी, बिगरविद्वत्तावाला, ठाम मते नसलेला बऱ्याचदा -- असा माणूस आहे -- एवढेच सांगून ठेवतो --

.अहो, ' चांगले दिले की लोक येतात ! ' हे कोण म्हणते, हेही पाहण्यासारखे आहे ! ' चांगले ' म्हणजे काय हवे आहे ? तेही सांगितले जायला हवे --

तो विभागच बंद ! ( मी स्वतः ' इराक ' हे नाटक लिहिले आहे. ही माझ्यातली विसंगती म्हणा ! )

मीही तज्ञ नाही हो -- हा नुसता मित्रांशी संवाद !

इतिहास आणि पुराण यांची मला ॲलर्जी असल्याचे मी इथे आधीही सांगितले आहे. त्यामुळे ' स्वामी ' ही कादंबरी, माझ्या मते, जगात अस्तित्वातच नाही. ' कोसला ' मी वाचलेली आहे, अर्थातच. ती 'स्वामी'च्या हजारपट चांगली असणारच, यात शंका नाही. राहिला प्रश्न खपाचा आणि आवृत्त्यांचा. पलायनवादी आणि करमणूकप्रधान पुस्तके जास्त खपतच राहणार, त्याला इलाज दिसत नाही. त्यातही, इथल्या काही लेखकांनी / कलावंतांनी मराठी माणसाला हे पटवून दिलेले आहे

की ' रोजच्या व्यापतापांनी तू कंटाळलेला, थकलेला असतोस -- तुला फक्त दोन घटका विरंगुळा मिळाला की बास ! ' जणू जगात इतरत्र कुणाला व्यापताप नाहीतच ! आपणच सतत एकमेकांना कमकुवत मेंदूचे म्हणून पटवत राहिल्याचा हा परिणाम आहे. शिवाय त्याचे आपण नुसते समर्थन नाही, गौरवही करतो ! आणि हसतो !

अभिनय, कल्याण आभारी आहोत. बाबा वर्दम थिएटर्स, कुडाळ आयोजित कै. बाबा वर्दम स्मृती आंतरराज्य मराठी नाट्यस्पर्धा -२०१३ सदर झालेली नाटके आणि संस्था. "देव परिवारात..." ले./दि. संभाजी सावंत. अवतरण अकादमी, मुंबई "ढिंग चँग ढिचँग" ले. ज्ञानेश मुळे, दि. किरणसिंह चव्हाण. थिएटर ऑफ कम्युनिकेशन, कोल्हापूर "स्मृती विस्मृती" ले. आनंद खरबस, दि. आशुतोष नेर्लेकर. भारत नाट्य संशोधन मंदिर, पुणे "आम्ही लटिके ना बोलू" ले. पु. ल. देशपांडे, दि. सुविद्य कुलकर्णी. अभिरुची, कोल्हापूर "आशानाम मनुष्यानाम" ले. डॉ. समीर मोने, दि. सुनील गुरव. समाराधना, सोलापूर "ए, आपण चहा घ्यायचा?" ले. चं. प्र. देशपांडे दि. अभिजित झुंजारराव. अभिनय, कल्याण "एक रिकामी बाजू" ले. प्रदीप वैद्य दि. श्रीकांत भिडे. ध्यास, पुणे सर्वोत्कृष्ट नाटक चं.प्र.देशपांडे लिखित, ए, आपण चहा घ्यायचा?-- "अभिनय, कल्याण" सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन प्रथम:- अभिजित झुंजारराव सर्वोत्कृष्ट अभिनय प्रथम:- अभिजित झुंजारराव सर्वोत्कृष्ट अभिनय तृतीय:- आदित्य हळबे सर्वोत्कृष्ट अभिनेत्री द्वितीय:- प्रिया कटके सर्वोत्कृष्ट नेपथ्य द्वितीय:- तृप्ती झुंजारराव सर्वोत्कृष्ट संगीत प्रथम:- विराज झुंजारराव सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना तृतीय:- विराज झुंजारराव सगळ्यांचे मन:पुर्वक आभार.
सर्व टीमचे मनःपूर्वक अभिनंदन ! पुढील प्रयोगांना शुभेच्छा !

अंक ग्रेट झाला आहे -- वाचन सुरू आहे, प्रभुणे सर --

शिवाय मिलिंद, मी स्वतःच जर मुळात अनैतिक असेन तर मी बोंबलायला इतरांना कलेतून, सिनेमातून कसली नैतिकता शिकवणार ?

या फोटोनंतर अमिताभने प्रशांतची सही घेऊन संग्रही ठेवली !

अशा ठिकाणी कॉमेंट द्यायची हुक्की येतेच पण इतक्या स्त्रियांपुढे जरा बुजल्यासारखे होते हो !

मला मेंदू बदलून हवाय -- मला सगळे समजते, माझ्याकडे सगळ्या प्रश्नांवर उपाय आहेत -- असे वाटणारा मेंदू मला हवाय --

माझी ती आवश्यक आवाज-यंत्रणा बिघडलेली आहे -- सॉरी --

My younger grand daughter SHREYA'S drawing.
तुम्हाला दाखवण्यासारखी तिची चित्रे जरूर इथे देत जाईन --

My elder grand daughter POOJA'S drawing -- DREAMHOUSE.
तुम्हाला दाखवण्यासारखी तिची चित्रे जरूर इथे देत जाईन --

मला आता नेमके आठवत नाही, पण एक लेखक असे म्हणाला आहे की त्याचा पूर्ण भूतकाळ त्याला आभासच वाटतो !

अरे वा ! शुभेच्छा ! दुरावले साले मिती-चार वाले ! मला पत्ताच नसतो !

ज्या संमेलनाचा साहित्याशी कवडीचा संबंध नाही, असे माझे मत आहे, त्यावर मी मत कशासाठी द्यावे ? हजारो गोष्टी घडत असतात, मी सगळीकडे मते देत थोडाच फिरतो ? पण हे ' साहित्य ' हा शब्द वापरतात म्हणून मत हवेच असेल तर ' खड्ड्यात गेले ! ' -- एवढेच म्हणू शकतो !

साहित्य वा नाट्य यांतल्या एकाही संमेलनाला मी आयुष्यात कधी गेलेलो नाही. मी साहित्य वा नाट्य या क्षेत्रांशी कवडीचा संबंध नसलेला कवी / लेखक आहे. मोठमोठ्यांनाही त्या संमेलनांची निमंत्रणे जात नाहीत तर मला का येतील ? मी त्यांची दखल घ्यायची गरज मला वाटत नाही.

उज्ज्वल -- उज्वल, आशीर्वाद -- आशिर्वाद, उपाहारगृह -- उपहारगृह.

कोणता क्षण ते सांगावे तर काहींना नाटक माहीत नसणार -- तरीही -- ' जा तिची समजूत घाल आता ' म्हटल्यावर विजय झटकन संतापून उठतो -- आणि क्षणात सौम्यपणे आत जातो -- ती कृती -- त्यात, नाटकातले ते मानसिक द्वंद्व उत्तम ' दिसते ' --

दुसरे कसे वाईट, नादान, बेफिकीर, क्रूर आहेत यावर भर देऊन बोलले की मी तशी व्यक्ती नाही, हे स्वतःलाही पटवता येते आणि इतरांनाही --

त्या दिग्दर्शकाचे नाव सुनील मोझर.

लाख्यांनीही हे नाटक अत्युत्तम बसवले होते -- पुण्यातही विद्यासागरने आणि आणखी एकानेही ( त्याचे नाव जरा स्मरणातून गेले आहे, सॉरी ! ) याचे चांगले प्रयोग केले होते.

'Katharsis' or 'Catharsis' is a word of Greek origin. In the Greek language it has three meanings—"Purgation," "Purification," "Clarifica-tion." Aristotle uses this word in the Poetics only once. While dealing with the function of tragedy, Aristotle says only this much :—
‘’...……..through pity and fear effecting the proper Katharsis or purgation of these emotions."

But he himself does not give any meaning of the term 'Catharsis.' These are the later critics who have interpreted this word in various ways. And this has given birth to various theories.

सुन्न होण्यात ' न कळण्याची निराशा ' हा एक भाग असावा, असे वाटते --

मला एक टेस्ट सुचते, ती सांगतो -- कंटाळा असेल तर बाहेरचे आवाज ऐकले जात नाहीत -- शांतता असेल तर सगळे सूक्ष्म आवाजही ऐकू येतात --

मी कोणत्याही, नाव असलेल्या धर्माचा नाही -- मग आधार कार्डासाठी हिंदू का लिहिलेत -- ही लेव्हल नको -- आणि माझ्या तपासणीचा उपयोग तरी काय ? कुणाचीही बौद्धिक तपासणी हवे ते निकाल देऊ शकते !

याचा अर्थ मी कमकुवत, निरर्थक असू शकतो -- जे असेल ते --

सतीश, आपण एकमेकांशी मानवी जगण्याबद्दल बोलताना आपल्या भाषेत आपण एकत्रितपणे जगणे समजून घेण्याच्या प्रक्रियेत असले पाहिजे, असे वाटते --

मी विद्वान नाही, हे इथे हजारदा सांगूनही माझ्याकडून विद्वत्तेची अपेक्षा का ? मला अमुक एक नावाचा धर्म, ही गोष्टच खोटी वाटते --

आपण वर गुरूगिरीची चेष्टा केली आहे -- नो ऑथॉरिटी --

सतीश, तसे नाही, तुम्ही काय अपेक्षिता ' चांगल्या ' माणसाकडून, हे बोलावे तुम्ही --

कोई भी आदमी अस्सल नही होता -- डुप्लिकेट और लिमिटेड ही होता है --

माणसांच्या जगात तुम्हाला अस्सलाचा शोध घ्यायचा आहे ? शुभेच्छा !

अवतरण चिन्हके बाहर मुझे मिलो -- एकसाथ जायेंगे !

तुम्हाला सगळ्यांना आधी अद्वैत शिकवायला पाहिजे -- देव-दानव, पुण्य-पाप, स्वर्ग-नरक -- असे द्वैत तुम्ही मानत असलात तर मुळात तुम्ही हिंदू आहात का, तेच आधी तपासून घ्या !

त्या देवांना त्यांचे देवत्व टिकवण्यासाठी इथे येऊन करमणुकीची नशा द्यावी लागते आणि काहीजण इथेच करमणुकीची भरपूर नशा देऊन देवत्व प्राप्त करून घेतात ! करमणुकीची नशा न देणारे कितीही महत्त्वाची कामे करत असले तरी देवत्वाला पोचू शकत नाहीत ! करमणुकीची नशा कोण जास्त देतो यावर सगळी चलतीची गणिते आहेत !